अंगेंअनुभवझालामज ॥ संतरजचरणाचा ॥ १ ॥ सुखीझालोंयासेवेनें ॥ दुःखनेणेंयावरी ॥ २ ॥ निर्माल्याचेंतुळसीदळ ॥ विष्णुजळचरणींचें ॥ ३ ॥ तुकाम्हणे भावसार ॥ करूनीफारमिश्रित ॥ ४ ॥ ॥ ३०४० ॥

वैद्ययेकपंढरिराव ॥ अंतरभावतोजाणे ॥ १ ॥ रोगाऐशाद्याव्यावल्ली ॥ जाणेझालीबाधाते ॥ २ ॥ नेदीरुकावेंचूमोल ॥ पाहेबोलप्रीतीचे ॥ ३ ॥ तुकाम्हणेदयावंता ॥ सदाचिंतादीनांची ॥ ४ ॥ ॥ ३०४१ ॥

करितांकोणाचेंहिकाज ॥ नाहींलाजदेवासी ॥ १ ॥ बरेंकरावेंहेंकाम ॥ धरिलेंनामदीनबंधु ॥ २ ॥ करुनिआराणूकपाहे ॥ भलत्यासाह्यव्हावेंया ॥ ३ ॥ बोलेतैसी करणीकरी ॥ तुकाम्हणेयेकहरी ॥ ४ ॥ ॥ ३०४२ ॥

उभाचंद्रभागेतीरीं ॥ कटधरूनियांकरीं ॥ पाउलेंगोजिरीं ॥ विटेवरीशोभलीं ॥ १ ॥ त्याचाछंदआमुच्याजीवा ॥ कायवाचामनेंहेवा ॥ संचिताचाठेवा ॥ जोडीहातींलागली ॥ २ ॥ रूपडोळियांआवडे ॥ कीर्तिश्रवणींपवाडे ॥ मस्तकनावडे ॥ उठोंपायांवरूनि ॥ ३ ॥ तुकाम्हणेनाम ॥ ज्याचेंनाशीक्रोधकाम ॥ हरिभवश्रम ॥ उच्चारितांवाचेसी ॥ ४ ॥ ॥ ३०४३ ॥

आम्हाहेंचिभांडवल ॥ म्हणाविठ्ठलविठ्ठल ॥ १ ॥ सु
खेंतरोंभवनदी॥ संगेवैष्णवांचीमांदी ॥ २ ॥ वाखरा
चेबाण॥ सांडूंहेंजेऊंजेवण ॥ ३ ॥ नलगेवारंवार ॥ तु
काम्हणेवेरझार ॥ ४ ॥ ॥ ३०४४ ॥
आतांमाझ्याभावा ॥ अंतरायनकोदेवा ॥ १ ॥ आलें
भागातेंकरितों ॥ तुझेंनामउच्चारितों ॥ २ ॥ दृढमाझेंम
न ॥ येथेराखावेंबांधोन ॥ ३ ॥ तुकाम्हणेवाटे ॥ नको
फुटोंदेऊंफांटे ॥ ४ ॥ ॥ ३०४५ ॥
कायदेवापासींउणें ॥ हिंढेदारोदारींसुणें ॥ १ ॥ करीअ
क्षराचीआटी ॥ येककवडीचेसाठीं ॥ २ ॥ निंदीकोणा
स्तवी ॥ चिंतातुरसदाजीवीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेभांड ॥ ज
ळोजळोत्याचेंतोंड ॥ ४ ॥ ॥ ३०४६ ॥
मागणेंतेंमागोंदेवा ॥ करूंभक्तित्याचीसेवा ॥ १ ॥ का
यउणेंतयापासीं ॥ रिद्धीसिद्धित्याच्यादासी ॥ २ ॥
कायावाचामनें ॥ करूंदेवाहेंअर्पण ॥ ३ ॥ तुकाम्हणे
विश्वंभर ॥ त्याच्यानेंहेंचराचर ॥ ४ ॥ ॥ ३०४७ ॥
चित्तींनाहींआस ॥ त्याचापांडुरंगदास ॥ १ ॥ असेभ
क्तांचियाघरीं ॥ कामनसांगतांकरी ॥ २ ॥ अनाथाचा
बंधु ॥ असेअंगींहासंबंधु ॥ ३ ॥ तुकाम्हणेभावें ॥ दे
वासत्ताराबवावें ॥ ४ ॥ ॥ ३०४८ ॥
कर्कशसंगती ॥ दुःखउदंडफजिती ॥ १ ॥ नाहींइहनाप
रलोक ॥ मजूरदिसेंजैसेरंक ॥ २ ॥ वचनशेवटावरी ॥
त्यापेंठेऊनिधिक्कारी ॥ ३ ॥ तुकाम्हणेपाईंबेडी ॥ पडली

कपाळींकुऱ्हाडी ॥ ४ ॥ ॥३०४९॥

बीजपेरीशेतीं ॥ मगगाडेवरीवाहाती ॥ १ ॥ बायांगेलें ऐसेंदिसे ॥ लाभत्याचेअंगींवसे ॥ २ ॥ पाल्याचीजतन ॥ तरीप्रांतींयेतीकण ॥३॥तुकाम्हणेअळीं ॥ उदकदेतांलाभेफळीं ॥ ४ ॥ ॥ ३०५० ॥

जाणावेंतेंसार ॥ नाहींतरीदगाफार॥ १॥ डोळेझांकलियारवी॥नाहींऐसाहोयजेवीं॥ २॥बहुथोड्याआड॥निवारितांलाभजोड ॥ ३ ॥ तुकाम्हणेखरें ॥ नेलेंहातींचेंआंधारें॥ ४ ॥ ॥ ३०५१ ॥

मूळींनेणपण॥झालातरीअभिमान ॥ १॥वायांजावेंहेंचिखरें॥केलेंतेणेंचिप्रकारें॥ २॥आराणूकनाहींकधीं॥ झालीतरीभेदबुद्धी ॥ ३ ॥ अंतरलीनाव ॥ तुकाम्हणेनाहींठाव ॥ ४ ॥ ॥३०५२॥

सवसारसातेआलेहोआईका ॥तुटीचेंतेंनकाकोणभरूं ॥१॥ लाभाचाहाकाळअवघाविंचारा ॥ पारखीतेंकरासात्ययेथें ॥ २ ॥ शृंगारीलेंदिसेनकळेअंतर ॥गोवीचापदरउगवेना॥ ३ ॥ तुकाम्हणेखोटेंगुंफताविसरे ॥ हातींचीयाखरेंहातींघ्यावें ॥ ४ ॥ ॥ ३०५३ ॥

सारविलीगाडेधरावासुपंथ ॥ जावेंउसंतीतहळुहळू ॥ ॥ १ ॥ पुढेंजातीयाचेउमटलेमाग ॥ भांबावलेंजगआडरानें ॥ २ ॥ वेंचल्याचापाहेंबराबरझाडा ॥ बळाचानिधाडापुढलीया ॥ ३॥ तुकाम्हणेजैसीदाखवावीवाणी॥तेघावेंभरोनीशेवटला ॥ ४ ॥ ॥३०५४॥

बुद्धीमंदाशिरीं ॥ भारफजीतीपदरीं ॥ १ ॥ जायतेथेअ
पमान ॥ प्रावेहाणीथुंकेजन ॥ २ ॥ खरीयाचापाड ॥
मागेंलावावेंलिगाड ॥ ३ ॥ तुकाम्हणेकरी ॥ कर्मनेणोभ
रोंवरी ॥ ४ ॥ ॥ ३०५५ ॥

पूर्वजांसीनर्का ॥ जाणेतेंऐकेआईका ॥ १ ॥ निंदाकरा
वीतचाहाडी ॥ मनींधरूनिआवडी ॥ २ ॥ मात्रागमना
ऐसी ॥ जोडी पातकाचीराशी ॥ ३ ॥ तुकाम्हणेवाट ॥ कुं
भीपाकाचीतेनीट ॥ ४ ॥ ॥ ३०५६ ॥

वेढीते चिवेढीबहुनचिवेडी ॥ चाखतांचिगोडीचवीनेणे
॥ १ ॥ देहालावीवात ॥ पालव घालीझालीरात ॥ २ ॥ कढि
येमूलभोंवतेभोये ॥ मोकलूनीरडेधाये ॥ ३ ॥ लेंकरेंवित्त
पुसेजगा ॥ माझागोहोकोणतासांगा ॥ ४ ॥ आपुली
शुद्धीजयानाहीं ॥ आणिकाचीतेजाणेकाई ॥ ५ ॥ तु
काम्हणेऐसेजन ॥ नर्काजातांराखेकोण ॥ ६ ॥ ३०५७

आवडीचेंदानदेतोंनारायण ॥ बाहुउभारूनराहीलासे
॥ १ ॥ जेंजयारुचेतेंकरितोसमोर ॥ सर्वज्ञउदारमायबा
पा ॥ २ ॥ ठाईपडलीयातेचिलागेखावें ॥ ठाईचेंचिघ्या
वेंविचारूनी ॥ ३ ॥ बीजपेरुनीयांतेंचिघ्यावेंफळ ॥ डो
रलीसकेळकैसेंलागे ॥ ४ ॥ तुकाम्हणेदेवाकांहींबोल
नाहीं ॥ तुझातूंचिपाहींशत्रुसखा ॥ ५ ॥ ॥ ३०५८ ॥

■ढचणीचेंदार ॥ बाहेरमाजीपैसकार ॥ १ ॥ कायक
रावेंतेंमौन ॥ दाहीदिशाहिंडेमन ॥ २ ॥ बाहिरदावीवे
श ॥ माजीवासनेचेलेश ॥ ३ ॥ नाहींइंद्रियांदमन ॥ का

यमांहिलेंदुकान ॥ ४ ॥ सारवीलेंनिकें ॥ वरीमाझी
अवघेंफिकें ॥ ५॥ तुकाम्हणेअंतीं ॥ कांहींनलगेचीहा
तीं ॥ ६ ॥ ॥ ३०५९ ॥

लयलक्षोनियांझालोंम्हणतीदेव ॥ तोहिनव्हेभावस
त्यजाणा ॥ १ ॥ झालेंबहुश्रुतनलगेआतांकांहीं ॥ न
राहूतेंहिनिश्चितीनें ॥ २ ॥ तपेंदानेंकायमानीसीविश्वा
स ॥ बीजफळत्यासआहेपुढें ॥ ३ ॥ कर्मआचरणयाती
चास्वगुण ॥ विशेषतोगुणकायतेथे ॥ ४ ॥ तुकाम्हणेज
रीहोईलनिष्काम ॥ तरीहोयरामदेखेडोळां ॥ ५ ॥

॥ ३०६० ॥

पुरलीधांवकडियेघेई ॥ पुढेंपाईनचलवे ॥ १ ॥ कृपाळू
वेपांडुरंगे ॥ अंगसंगेंजीवलगे ॥ २॥ अवघीनिवारावी
भूक ॥ अवघ्यादुःखजन्माचें ॥ ३ ॥ तुकाम्हणेबोलवे
ना ॥ लावीस्तनाईश्वरे ॥ ४ ॥ ॥ ३०६१ ॥

जेंजेंमनावाटेगोड ॥ तेंतेंकोडपुरविसी ॥ १ ॥ आतांतूं
चिबाह्याल्कारीं ॥ अवघ्यापरिझालासी ॥ २॥ नाहींसा
यासाचेंकाम ॥ घेतांनामआवडी ॥ ३ ॥ तुकाम्हणेसर्व
सांगे ॥ पांडुरंगेदयाळे ॥ ४ ॥ ॥ ३०६२ ॥

जेथेमाझीदृष्टिजाय ॥ तेथेपायभावीन ॥ १ ॥ असेंत
यासमाधान ॥ पूजामनेंकरीन ॥ २॥ अवघाचिअवघे
देशीं ॥ सुखराशीसंपन्न ॥ ३ ॥ तुकाम्हणेबंधननाहीं ॥
ऐसेंकांहींतेंकरूं ॥ ४ ॥ ॥ ३०६३ ॥

भलाभलापुंडलीका ॥ मानलासीजनलोकां ॥ १ ॥ को

ण्याकाळेंसुखा॥कोणपावतसाऐका॥२॥नातुडेजोक
वणेपरी॥उभाकेलाविटेवरी॥३॥अवघाआणिला
परिवार॥गोपीगोपाळांचाभार॥४॥तुकाम्हणेधन्य
झाले॥भूमिवैकुंठआणिलें॥५॥ ॥३०६४॥
अवघेचुकविलेसायास॥तपराशीजीवानाश॥१॥
जीवदेऊनियांबळी॥अवघींतारीलींदूबळीं॥२॥के
लाभूमंडळीं॥माजीथोरपवाडा॥३॥कांहींनुमगेया
चीगती॥लुटवितोजगाहातीं॥४॥तुकाम्हणेभक्तरा
जा॥कोणपारवर्णीतुझा॥५॥ ॥३०६५॥
प्रमाणहात्याच्याबोला॥देवभक्तांचाअंकिला॥१॥
नपुसतांजातांनये॥खालींबैसतांहीभयें॥२॥अवघा
त्याचाहोय॥जीवेंभावेंसहित॥३॥वदेउपचारवाणी
कांहींमागम्हणउनी॥४॥उदासीनाच्यालागें॥तुका
म्हणेधांवेमागें॥५॥ ॥३०६६॥
कांहींनमागतीदेवा॥त्याचीकरूंधांवेसेवा॥१॥हळु
हळूफेडीरीण॥होऊनीयांरूपेंदीन॥२॥होऊंनशकेवे
गळा॥क्षणयेकत्यानिराळा॥३॥तुकाम्हणेभक्तीभा
व॥हाचिदेवाचा देव॥४॥ ॥३०६७॥
जाणेअंतरींचाभाव॥तोचिकरीतोऊपाव॥१॥नलगे
सांगावेंमांडावें॥जीवेंभावेंअनुसरावें॥२॥अविना
शघ्यावें॥फळधीरधरूनी॥३॥बाळनमागतांभोज
न॥माताघालीपाचारून॥४॥तुकाम्हणेतरी॥येकीं
उल्लंघीलेगिरी॥५॥ ॥३०६८॥

आम्हीनाचोंतेणेसुखें ॥ वाहूंटाळीगातोंमुखें ॥ १ ॥ देव
कृपेचाकोंवळा ॥ शरणागतापाळीलळा ॥ २॥ आम्हा
झालाहानिर्धार ॥ मागेंतारीलेअपार ॥ ३ ॥ तुकाम्ह
णेसंतीं ॥ वर्मदिल्हेंआम्हाहातीं ॥ ४॥ ॥३०६९॥
झालोंनिर्भरमानसीं ॥ म्हणऊनीकळलासी ॥ १ ॥ तु
झेम्हणवितीत्यांस ॥ भयचिंतानाहींआस ॥ २ ॥ चुक
विसीपाश ॥ गर्भवासयातना ॥ ३ ॥ तुझेंजाणोनीयां
वर्म ॥ कंठींधरीयेलेंनाम ॥ ४ ॥ तुकाम्हणेसुखें ॥ विस
रलोंजन्मदुःखें ॥ ५ ॥ ॥३०७० ॥
नकोदुष्टसंग ॥ पडेभजनामधींभंग ॥ १ ॥ कायविचा
रदेखिला ॥ सांगमाझातोविठ्ठला ॥ २॥ तुजनिषेधितां॥
मजनसाहावेसर्वथा ॥ ३ ॥ येकामाझ्याजीवें ॥ वादक
रूंकोणासवें ॥ ४ ॥ तुझेवर्णूंगुण ॥ कींहेराहोदुष्टजन ॥
॥ ५ ॥ कायकरूंयेका ॥ मुखेंसांगम्हणेतुका ॥ ६ ॥
॥३०७१॥
विठ्ठलमाझीमाय ॥ आम्हासुखाउणेंकाय ॥ १ ॥ घेतों
अमृताचीधणी ॥ प्रेमवोसंडलेंस्तनीं ॥ २॥ क्रीडोंवैष्ण
वांच्यामेळीं ॥ करूंआनंदाच्याजळीं ॥ ३ ॥ तुकाम्हणे
कृपावंत ॥ ठेवींआम्हापाशींचित्त ॥ ४॥ ॥३०७२॥
भक्तिसुखेंजेमातले ॥ तेकळिकाळाशूरझाले ॥ १ ॥ हा
तींबाणहरिनामाचे ॥ वीरगर्जतिविठ्ठलाचे ॥ २ ॥ महा
दोषाआलात्रास ॥ जन्ममरणाकेलानाश ॥ ३ ॥ सह
स्रनामांचीआरोळी ॥ येकरेकाहुनीबळी ॥ ४ ॥ नाहीं

आणिकाचागुमान ॥ ज्याचेअंकितत्यावांचून ॥ ५ ॥
तुकाम्हणेत्याचेघरीं ॥ मोक्षसिद्धीहाकामारी ॥ ६ ॥
॥३०७३॥
पंधरादिवसांयेकयेकादशी ॥ कांरेनकरीसीव्रतसार ॥
॥ १ ॥ कायतुझाजीवजातोयेकादीसें॥ फराळाच्यामीसें
घणीघेसी ॥ २ ॥ स्वहिताकारणेंमानवेलजन ॥ हरिक
थापूजनवैष्णवांचें॥ ३॥ थोडेतुजघरींहोतेउजागरे ॥ दे
ऊळासीकांरेमरसीजातां ॥ ४ ॥ तुकाम्हणेकांरेसकुमा
रझालासी ॥ कायजाबदेशीयमदूतां ॥ ५ ॥ ३०७४ ॥
कथाहेंभूषणजगामध्येंसार॥ तरलेअपारबहुयेणें॥ १ ॥
निचियाकुळींचाउंचावंद्यहोय ॥ हरीचेजोगायगुणवा
द ॥ २ ॥ देवत्याचीमाथांवंदीपायधुळी ॥ दीपझालाकु
ळींवंशाचीया ॥ ३ ॥ त्याचीनिंदाकरीत्याचीकुष्टवाणी
मुखसंवदणिरजकाची ॥ ४ ॥ तुकाम्हणेनाहींचोरीचा
व्यापार ॥ विठ्ठलाचेंसारनामघ्यावें ॥ ४ ॥ ॥३०७५॥
टाळघोळसूखनामाचागजर ॥ घोषजयजयकारब्र
ह्मानंदू ॥ १ ॥ गरुडटकेदिंडीपताकांचेभार ॥ आनंद
अपारब्रह्मादिकां ॥ २ ॥ आनंदेंवैष्णवजातीलोटांग
णीं ॥ येकयेकाहुनीभद्रजाती ॥ ३॥ तेणेसूखेंसुटेपाषा
णापाझर ॥ नष्टखळनरशुद्धहोती ॥ ४ ॥ तुकाम्हणेसो
पेवैकुंठासीजातां ॥ रामकृष्णकथाहेचिवाट ॥ ५ ॥
॥३०७६॥
देखोदेखीकरितीगुरु ॥ नाहींठाउकाविचारु ॥ १ ॥ व

मतेंनपडेठाई ॥ पांडुरंगावीणकांहीं ॥ २॥ शिकोंकळा
येती ॥ प्रेमनाहींकोणाहातीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेसार ॥ भ
क्तिनेणतीगव्हार ॥ ४ ॥ ॥३०७७॥
भाग्यवंतम्हणोतया॥ शरणगेलेपंढरिराया ॥ १ ॥ तरले
तरतीहाभरवसा॥नामधारकांचाठसा॥२॥भुक्तिमुक्ती
चेंतेंस्थळ ॥ भोळेभावीकनिर्मळ ॥ ३ ॥ गाईलीपुराणी
तुकाम्हणेवेदवाणी ॥ ४ ॥ ॥३०७८॥
जैसेंचित्तजयावरी ॥ तैसेंजवळीतेंदूरी॥ १ ॥ नलगेद्या
वापरिहार॥ वायांकोरडेंउत्तर ॥ २॥ असेअभ्यंतर॥सा
क्षभूतजवळी ॥ ३ ॥ अवघेंजाणेसूत्रधारी ॥ कोणना
चेकोणेपरी ॥ ४ ॥ तुकाम्हणेबुद्धी ॥ ज्यान्वितयाचते
सिद्धि ॥ ५ ॥ ॥३०७९॥
नाहींपायतनभूपतीसीदावा ॥ धिगत्याकर्तव्याआगी
लागो ॥ १ ॥ मुंगियाच्यामुखागजाचाआहार ॥ नसा
हावेभारजायजीवें ॥ २॥ तुकाम्हणेआधींकरावाविचा
र ॥ शूरपणेंतीरमोकलावे ॥ ३॥ ॥३०८०॥
तीन्हींलोकऋणेंबांधिलेजयानें ॥ सर्वसिद्धीकेणेंतया
घरीं ॥ १ ॥ पंढरीचोहटाघातलेंदुकान॥ मांडियेलेंवा
नआवडीचें ॥ २॥ आषाढीकार्तीकीभरियेलाहाट ॥ इ
नामहेपेंठदेतांघेतां ॥ ३ ॥ मुक्तिकोणीतेथेहातींनेघेफू
का ॥ लुटतीलसूखाप्रेमाचीया ॥ ४ ॥ तुकाम्हणेसंतस
ज्जनभाग्याचे ॥ अनंताजन्मांचेसांठेकरी ॥ ५ ॥
॥३०८१॥

दुःखाचियेसाठींतिथेमिळेसूख॥ अनाथाचीभूकदैन्य जाय ॥ १ ॥ उदाराचाराणापंढरिसीआहे॥ उभारूनी बाहेपालवीतो ॥ २ ॥ जाणतीयाहुनीनेणत्याचीगो डी॥ आलिंगीआवडीकरूनियां ॥३॥ शीणघेऊनीयां प्रेमदेतोसाटी॥ नविचारितूटीलाभकांहीं॥ ४ ॥ तुका म्हणेअसोअनाथदुबळीं ॥ आम्हासीतोपाळीपांडुरं ग॥५॥

॥३०८२॥

आणिकमातमाझ्यानावडेजीवासी॥ कायकरूंयासी पांडुरंगा ॥ १ ॥ मुखातेंचिगोडश्रवणींआवडी ॥ चि त्तमाझेंवोढीतुझेपाईं॥ २ ॥ जयापदींनाहींविठ्ठलाचें नाम॥मजहोतीश्रमआइकतां ३॥आणिकाचेंमजम्ह णवितांलाज॥ वाटेहेंसहजनवोलावें ॥ ४ ॥ तुकाम्हणे मजतूंचिआवडसी॥ सर्वभावेंवीसीपांडुरंगा॥ ५॥

॥ ३०८३॥

कळेलहेंतैसेंगाईनमीतूंज॥ जनासवेंकाजनाहींमाझें ॥ १ ॥ करीनमिस्तुतीआपुल्याआवडी ॥ जैसीमाझी गोडीवाटेजीवा ॥ २ ॥ होऊनीनिर्भरनाचेनमीछंदें॥ आपुल्याआनंदेंकरूनीयां॥ ३॥ कायकरूंकळायुक्ति चाकुसरी॥ जाणीवेच्यापरीसकळीका ॥ ४॥ तुकाम्ह णेमाझेंजयासवेंकाज॥ भोळातोसहजपांडुरंग॥ ५॥

॥ ३०८४॥

तयासीनेणतीबहुआवडती॥ होयजयाचित्तींयेकभा व॥ १ ॥उपमन्युध्रुवहेकायजाणती॥ प्रल्हादाच्याचि

त्तींनारायण ॥ २ ॥ कोळिभिल्लपशुश्वापदें अपारें ॥ कृ
पेच्यासागरेंतारियेलीं ॥ ३ ॥ कायतेगोपाळचांगले
शाहाणे ॥ तयांचक्रपाणीजेवीसवें ॥ ४ ॥ तुकाम्हणे
भोळाभाविकहादेव ॥ आम्हीत्याचेपावधरुनीठेलों ॥
॥ ५ ॥ ॥ ३०८५ ॥

नलगेपाहावेंअवद्ववांकडें ॥ उच्चारावेंकोडेंनामतुझें ॥
॥ १ ॥ नाहींवेळकाळपंडिताचाधाक ॥ होतकांवाचक
वेदवक्ते ॥ २ ॥ वेदींप्रतीपाद्यनकळेपाहातां ॥ तैसी
याअनंताठेऊंनामें ॥ ३ ॥ आपुलियामनाउपजेआनं
द ॥ तैसेकरूंछंदकथाकाळीं ॥ ४ ॥ तुकाम्हणेआम्ही
आनंदेंचिधालों ॥ आनंदचिल्यालोंअलंकार ॥ ५ ॥
॥ ३०८६ ॥

दैन्यदुःखआम्हानयेतीजवळी ॥ दहनहेहोळीहोतीदो
ष ॥ १ ॥ सर्वसुखेंयेतीमानेंलोटांगणीं ॥ कोणयासी
आणीदृष्टिपुढें ॥ २ ॥ आमुचींआवडीसंतसमागमं ॥
आणिकतेंनामविठोबाचें ॥ ३ ॥ आमुचेंमागणेंमागूं
त्याचीसेवा ॥ मोक्षाचीनीदेवाकोणचाड ॥ ४ ॥ तुका
म्हणेपोटींसाठवलादेव ॥ न्यूनतोचिभावकोणआम्हा
॥ ५ ॥ ॥ ३०८७ ॥

काळतोंडासुणा ॥ भलतेंचोरुनिकरीजना ॥ १ ॥ धि
गत्याचेंसाधुपण ॥ विटाळूनिवर्तेमन ॥ २ ॥ मंत्रऐसे
घोकी ॥ वश्यव्हावेंजेणेंलोकीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेथित ॥
नागवलानव्हेहित ॥ ४ ॥ ॥ ३०८८ ॥

विठ्ठलमुक्तिदाता ॥ नव्हेमरोहेबोलतां ॥ १ ॥ भजनसा
हावेकानीं ॥ विषउत्तरलागेमनीं ॥ २ ॥ हरिकथेतेधि
क्कारी ॥ शत्रुमाझातोचिवैरी ॥३॥ सुणाकाळतोंडा॥
जोयादेवाम्हणेधोंडा ॥ ४ ॥ अहंम्हणेब्रह्म ॥ नेणेभाव
भक्तिवर्म ॥ ५ ॥ तुकाम्हणेक्षण ॥ नकोत्याचेंदरुशन॥
॥ ६ ॥ ॥३०८९॥

यमपुरीत्यानेंवसविलीजाणा॥ उच्छेदभजनाविधिके
ला ॥ १ ॥ अवघडकोणीनकरीसांगतां ॥ सुलभबहुतां
गोडवाटे ॥ २ ॥ कायतेनेणतेहोतेमागेंऋषी ॥ आधार
लोकांसीग्रंथकेले ॥ ३ ॥ द्रव्यदाराकोणेंस्थापियेलेंध
न ॥ पिंडाचेंपाळणविषयभोग ॥४॥ तुकाम्हणेदोहींठा
ईंहाफजीत ॥ पावेयमदूतजनाहातीं ॥ ५ ॥ ३०९० ॥

नकळतांकोणीमोडियेलेंव्रत॥तयाप्रायश्चित्तचालेकां
हीं ॥ १ ॥ जाणतीयावज्रलेपझालेथोर ॥ तयांसअघो
रकुंभीपाक ॥ २ ॥ आतांजरीकोणीनाईकेसांगतां ॥त
या शिकवीतांतेंचिपाप॥३॥ कायकरूंमजदेवेंबोलवि
लें ॥ माझेंखोळंबलेंकायहोतें ॥ ४ ॥ तुकाम्हणेजनापा
हाविचारूनि ॥ सुखवाटेमनींतेंचिकरा ॥ ५॥३०९१॥

वाचेविठ्ठलनाहीं॥ तोचिप्रेतरूपपाहीं ॥ १ ॥ धिग्त्या
चेंझालेपण॥भारनसाहेमेदीनी॥२॥नबैसेकीर्तनीं॥ गु
णनायकेजोकानीं ॥ ३ ॥ जातांकंटाळेराउळा ॥ तो
चिसुणामुखकाळा ॥४॥ हरीभक्तिवीण ॥ जळोत्याचें

शाहाणपण ॥ ५ ॥ तुकाम्हणेतेणें ॥ वंशाआणियेलेंउ
णें ॥ ६ ॥ ॥३०९२॥

तारीलेंबहुतचुकऊनिघात॥नामहेंअमृतस्वीकारितां
॥ १ ॥ नेणतांसायासशुद्धआचरण॥यातीकुळहीनना
मासाठीं ॥ २ ॥ जन्मनामधरीभक्ताच्यापाळणा ॥ आ
कारकारणायाचसाठीं ॥ ३ ॥ असुरींदाटलीपापहोतां
फार॥मगफेडीभारपृथिवीचा ॥ ४ ॥तुकाम्हणेदेवभक्त
पणेंसार ॥ कवतुकव्यवहारतयासाठीं॥ ५ ॥३०९३॥

याचियाआधारेंराहिलोंनिश्चिंत ॥ ठेवोनियांचित्तपा
ईंसुखें ॥ १ ॥ माझेंसुखदुःखजाणेहीतफार॥घातलासे
भारपांडुरंगा ॥ २ ॥ कृपेचीपोसणीठाईंचीआंखिली ॥
म्हणउनिलागलीतयासचिंता ॥ ३ ॥ मनराखेहातींघे
वोनियांकाठी ॥ इंद्रियेंथापटीफांकोंनेदी ॥ ४ ॥ तु
काम्हणेयासींअवघडनाहीं ॥ शरणागताकांहींरक्षाव
या ॥ ५ ॥ ॥३०९४॥

उभाउभींफळ ॥ अंगींमंत्राचेंयाबळ ॥ १ ॥ म्हणावि
ठ्ठलविठ्ठल ॥ गोडआणिस्वल्पबोल ॥ २ ॥ कळिकाळा
चिबाधा ॥ नव्हेउच्चारीतांकदा ॥ ३ ॥ तुकाम्हणेरोग ॥
वारेभवाऐसाभोग ॥ ४ ॥ ॥३०९५॥

निवडावेखडे ॥ तरीदळणवोजेघडे ॥ १ ॥ नाहींतरीना
सोनिजाय ॥ कारणआळसेंउरेहोय ॥ २ ॥ निवडावेंत
न ॥ शेतींकरावीराखण॥ ३ ॥तुकाम्हणेनीत ॥ नविचा
रीतांनव्हेहित ॥ ४॥ ॥३०९६॥

दुर्जनाच्यामान॥ सुखेंकरावाखंडण॥ १ ॥ लाताहाणो
नियावरी॥ गुंडावाटशुद्धकरी॥ २ ॥ बहुतांपीडीखळ॥
त्याचाधरावाविटाळ॥ ३ ॥ तुकाम्हणेनखें॥ काढुनिटा
कीजेतींसुखें ॥ ४ ॥ ॥ ३०९७॥
नकाधरूंकोणी॥ रागवचनाचामनीं॥ १ ॥ येथेंबहु
तांचेंहित॥ शुद्धकरुनीराखाचित्त॥ २ ॥ नाहींकेलीनिं
दा॥ आम्हीदूषीलेंसेभेदा॥ ३ ॥ तुकाम्हणेमज॥ येणेंवी
णकायकाज॥ ४ ॥ ॥ ३०९८ ॥
कांहींजडभारी॥ पडतांतेअवसरी॥ १ ॥ तुझेआठवा
वेपाय॥ आम्हीमोकलुनीधाय॥ २ ॥ ताहानपीडीभूक
शीतउष्णवाटेदुःख॥ ३ ॥ तुकाम्हणेलाड ॥ तेथेंपुरेमा
झेंकोड॥ ४ ॥ ॥ ३०९९ ॥
होऊनीकृपाळ॥भारघेतलासकळ॥ १ ॥ तूंचिचालवि
सीमाझें॥ भारसकळहिवोझें॥ २ ॥ देहतुझ्यापाईं॥ ठेउ
नीझालोंउतराई॥ ३॥ कायावाचामनें॥तुकाम्हणेदुजें
नेणे॥ ४ ॥ ॥३१००॥
आतांहोईमाझेबुद्धीचाजनिता॥ आवरावेंचित्तापांडु
रंगा॥ १ ॥ येथोनीयांकोठेंनवजेबाहेरी॥ ऐसेंमजधरीं
सत्तावळें॥ २ ॥ अनावरगूणबहुतांजातींचे॥ नबोला
वेवाचेऐसेंकरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेहीनकोणपेंजातीचें ॥
तुजठावेंसाचेंमायबापा॥ ४ ॥ ॥ ३१०१ ॥
सत्ययामनासीकेंरितोंविचार॥ तोहेंअनावरविषयलो
भी॥ १ ॥ आतांमजराखेंआपुलीयाबळें ॥ नदेखेंहें

जाळेंऊगवीतां ॥ २॥सांपडलोंगळींनाहींत्याचीसत्ता॥ उगळीमागुताघेतलातो॥ ३ ॥ तुकाम्हणेमीतोअज्ञान चिआहें॥ परीतुझीपाहेंवाटदेवा ॥ ४ ॥ ॥३१०२॥
दुर्बळाचेहातींसांपडलेंधन ॥करितांजतननयेत्यासी॥ ॥ १ ॥ तैसीपरिमजझालीनारायणा ॥ योगक्षेमजाणा तुम्हीआतां ॥ २ ॥ खातांलेतांनयेमिरवतांवरी ॥ राजा दंडकरीजनराग ॥ ३ ॥ तुकाम्हणेमगतळमळऊरे ॥ दे खीलीयाझुरेपाहावया ॥ ४ ॥ ॥३१०३॥
मागेंजैसाहोतामाझेअंगींभाव ॥ तैसायेकठावनाहीं आतां ॥ १ ॥ ऐसेंगोहीमाझेंमनमजपाशीं ॥ तुटीमुद लासीदिसेपुढें ॥ २ ॥ पुढीलाचेमनाआणिगुणदोष ॥ पूज्यआपणासकरावया ॥ ३॥ तुकाम्हणेझालीकोंब ड्याचिपरी ॥ पुढेंचीउकरीलाभनेणे ॥४ ॥ ॥३१०४॥
पाहोनीयांअधिकार ॥ तैसेंबोलावेंउत्तर ॥ १ ॥ काय बाउगीघसघस ॥ आम्हीविठोबांचेदास ॥ २ ॥ आम्ही जाणोयेकादेवा ॥जैसीतैसीकरूंसेवा ३॥तुकाम्हणेभा वें ॥ माझेपुढेंपडेलठावें ॥ ४ ॥ ॥३१०५॥
नवजातांघरा ॥ आम्हीकोणाच्यादातारा ॥ १ ॥ कांहे छळूंयेतीलोक ॥ दाटबळेंचीकटक ॥ २ ॥ नाहींआम्ही खात ॥ कांहींकोणाचेंलागत ॥ कळेतैसीसेवा ॥ तुका म्हणेकरूंदेवा ॥ ४ ॥ ॥३१०६॥
मोहरूनीचित्ता ॥आणूहळुचिवरीहिता ॥ १ ॥तोंहेपडती आघात ॥ खोडीकाढीतीपंडित ॥ २॥ समसाराभेणे ॥

कांहींउरसंतीतोपणे ॥ ३ ॥ येखादीयाभावें ॥ तुकाम्हणे जवळीपावें ॥ ४ ॥ ॥ ३१०७॥

कायजाणोंवेद ॥ आम्हीआगमाचेभेद ॥ १ ॥ येकरूप तुझेमनीं ॥ धरुनिराहिलोंचिंतनीं ॥ २ ॥ कोठेअधिका र ॥ नाहींरानटविचार ॥ ३ ॥ तुकाम्हणेदीना ॥ नुपेक्षा वेंनारायणा ॥ ४ ॥ ॥ ३१०८॥

धर्माचेंपाळण ॥ करूंपाखंडखंडण ॥ १ ॥ हेंचिआम्हा करणेंकाम ॥ बीजवाढवावेंनाम ॥ २ ॥ तीक्ष्णउत्तरें ॥ हा तींघेऊनिबाणफिरे ॥ ३ ॥ नाहींभीडभार ॥ तुकाम्हणे सानाथोर ॥ ४ ॥ ॥ ३१०९॥

कितीतुजयासींदेऊंपरिहार ॥ जाणसीअंतरपांडुरं गा ॥ १ ॥ आतांमाझेहातींदेईंमाझेंहित ॥ करींमाझेंचि त्तसमाधान ॥ २ ॥ रागआलातरीकांपूनयेमान ॥ बा ळामायेवीणकोणदुजें ॥ ३ ॥ तुकाम्हणेऐसाहोईललौ किक ॥ मागेवाळभीकसमर्थाचें ॥ ४ ॥ ॥ ३११०॥

लाजवाटेपुढेंतोंडदाखवितां ॥ परिजाऊंआतांकोणापा सीं ॥ १ ॥ चुकलियाकाममागतोंमुशारा ॥ लाजफजि तखोरानाहींमज ॥ २ ॥ पायसांडोनियांफिरतोंबासर ॥ स्वामिसेवाचोरहोऊनीयां ॥ ३ ॥ तुकाम्हणेमजपहिलें दंडीलें ॥ पुढेंहेंघडलेंनपाहिजे ॥ ४ ॥ ॥ ३१११॥

पुढलीयासुखेंनिंबदेतांभलें ॥ बहुतावारलेंहोयदुःख ॥ १ ॥ हेंतोंवर्मआहेमाउलीचेहातीं ॥ हाणिमारीप्रीतीहि तासाठीं ॥ २ ॥ खेळतांविसरेभुकताहानघर ॥ धंरूनीयां

करआणीवळें ॥ ३ ॥ तुकाम्हणेपाळीतोंडींचीयाघास ॥ उदारसर्वस्वेंसर्वकाळ ॥ ४ ॥ ॥ ३११२ ॥
आतांगुणदोषकायविचारीसी ॥ मीतोआहेंराशीपातकाची ॥ १ ॥ पतीतपावनासवेंसमागम ॥ आपुलालाधर्मचालवीजे ॥ २ ॥ घेणेघेईभेटीलोखंडापरीसा ॥ तरीअनारिसानपालटे ॥ ३ ॥ तुकाम्हणेमातीकोणपुसेफुका ॥ कस्तुरीच्यातुकासमागमें ॥ ४ ॥ ३११३ ॥
कृपावंतादुजेंनाहींतुझ्यापोटीं ॥ लाहेंबोलेगोष्टीसुखमातें ॥ १ ॥ घेऊनीभातुकेंलागसीलपाठी ॥ लावीसीलवोठींब्रह्मरस ॥ २ ॥ आपुलीयाकृपेंघालीसीपाखरउदारमजवरकृपाळूतूं ॥ ३ ॥ तुकाम्हणेआम्हाकारणेंगोविंदा ॥ वागवीसीगदासुदर्शन ॥ ४ ॥ ॥ ३११४ ॥
पाळिलेंपोशीलेंजन्मजन्मांतरीं ॥ वागविलेंकरींधरूनियां ॥ १ ॥ आतांकायमाझाघडेलअव्हेर ॥ मागेंदूरवरवागवीलें ॥ २ ॥ नेदीअंगींवारालागोंआघाताचा ॥ घेतलाठाईंचाभारमाथा ॥ ३ ॥ तुकाम्हणेबोलकरितोंआवडीअवीटतेगोडीअंतरींची ॥ ४ ॥ ॥ ३११५ ॥
पांडुरंगाकांहींआयकावीमात ॥ नकरावेंमुक्तआतांमज ॥ १ ॥ जन्मांतरेंमजऐसींदेईदेवा ॥ जेणेंचरणसेवाघडेतूझी ॥ २ ॥ वाखाणीनकीर्तिआपुलियामूखें ॥ नाचेनमीसुखेंतुजपुढें ॥ ३ ॥ करुनिकामारीदासदीनाहुनी ॥ आपुलेअंगणींठावमज ॥ ४ ॥ तुकाम्हणेआम्हीमृत्युलोकींभले ॥ तुझेचिअंकिलेपांडुरंगा ॥ ५ ॥ ३११६

माझेअंतरींचेंतोचिजाणेयेक ॥ वैकुंठनायकपांडुरंग ॥ १ ॥ जीवभावत्याचेठेवियेलापाईं ॥ मजचिंतानाहीं कवणेविशीं ॥ २ ॥ सुखसमारंभेंसंतसमागमें ॥ गाऊं वाचेनामविठोबाचें ॥ ३ ॥ गातांपुण्यहोयआयकतां लाभ ॥ सवसारबंधतुटतील ॥ ४ ॥ तुकाम्हणेजीवतया सीविक्रीला ॥ आणिकविठ्ठलावीणनेणें ॥ ५ ॥ ३११७

कथादुःखहरीकथामुक्तकरी ॥ कथायाचीबरीविठोबा ची ॥ १ ॥ कथापापनाशीउद्धरिलेदोषी ॥ समाधीकथे सीमूढजना ॥ २ ॥ कथातपध्यानकथाअनुष्ठान ॥ अ मृतहेंपानहरिकथा ॥ ३ ॥ कथामंत्रजपकथाहरीताप ॥ कथाकाळींकांपकळिकाळासी ॥ ४ ॥ तुकाम्हणकथा देवाचेंहेंध्यान ॥ समाधीलागोनउभातेथें ॥ ५ ॥ ३११८

कायऐसासांगा ॥ धर्ममजपांडुरंगा ॥ १ ॥ तुझेपाईंपा वेंऐसा ॥ जेणेंउगवेहाफांसा ॥ २ ॥ करीकृपादान ॥ तै सेंबोलवीवचन ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा ॥ माझेअंतरींव सवा ॥ ४ ॥ ॥ ३११९ ॥

भलाम्हणेजन ॥ परीनाहींसमाधान ॥ १ ॥ माझेंतळम ळीचित्त ॥ अंतरलेंदिसेहित ॥ २ ॥ कृपेचाआधार ॥ ना हींदंभझालाफार ॥ ३ ॥ तुकाम्हणेकृपे ॥ अंतरायको ण्यापापें ॥ ४ ॥ ॥ ३१२० ॥

शिकलेतेबोल ॥ बोलेतैसेंनाहींवोल ॥ १ ॥ आतांदेवा संदेहनाहीं ॥ वायांगेलोंयासीकांहीं ॥ २ ॥ येकांता चावास ॥ नाहींसंकल्पाचानाश ॥ ३ ॥ बुद्धिनाहींस्थीर

तुकाम्हणेशब्दाधीर॥ ४॥ ॥३१२१॥

उचिताचादाता॥ कृपावंतातूंअनंता॥ १॥कांरेनघालि
सीधांव॥ तुझेंउच्चारितोंनाव ॥ २॥ कायबळयुक्ति॥
नाहींतुझेअंगींशक्ति॥३॥ तुकाम्हणेतूंविश्वंभर ॥ वो
समाझेंकांअंतर॥ ४॥ ॥३१२२॥

पाहावेतोंपूरीं॥ आतांउचिततेंकरीं॥ १॥ माझीशक्ति
नारायणा॥ कीवभाकितोंकरुणा ॥ २॥ आम्हावोढी
काळ॥ तुझेंक्षीणझालेंबळ॥३॥ तुकाम्हणेगोडी॥ जी
वामातेचियावोढी॥ ४॥ ॥३१२३॥

आतां घेईमाझे॥ भारसकळहीवोझें ॥ १॥ कायकरि
सीहोईवाढ॥ आलोंपोटासींदगड॥ २॥ तूंचिडोळेवा
ती॥ होयदीपकसांगातीं ॥ ३॥ तुकाम्हणेकांहीं॥ वि
चारायाचाडनाहीं॥ ४॥ ॥३१२४॥

असोतहेबोल॥ अवघेंतूंचिभांडवल॥१॥ माझामाय
बापदेवा॥ सज्जनसोयराकेशवा॥ २॥ गाळियेलाभे
द॥ सारियेलेवादावाद॥ ३॥ तुकाम्हणेमधीं॥ आतां
नपडेउपाधी॥ ४॥ ॥३१२५॥

करीनकोल्हाळ॥ आतांहाचिसर्वकाळ॥१॥ आतांये
वोमाझेआई॥ देईभातुकेंविठाई॥२॥उपायासीनाम॥
दिल्हेंयाचेंपूढेंक्षेम॥३॥ बीजआणिफळ॥ हेंचितुकाम्ह
णेमूळ॥ ४॥ ॥३१२६॥

धनासींचधन॥ करीआपणाजतन॥१॥ तुजआळवि
तांगोडी॥ पांडुरंगाखरीजोडी॥ २॥ जेविल्याचेखरे॥

वरीउमटेढेंकरे॥ ३॥तुकाम्हणेधाय॥ तेथेकोठेंउरेहाय॥
॥ ४॥ ॥ ३१२७॥
अनुभवाआलें॥ माझेचित्तींचेंरक्षिलें॥ १ ॥ असेजव
ळीअंतरें॥ फिटेआवडीच्याफेरें॥ २॥ खादलेंचिवाटे॥
खावेंभेटलेंचिभेटे॥ ३ ॥ तुकाम्हणेउभे॥ आम्हीराखि
येलेलोभें॥ ४॥ ॥३१२८॥
पोटींशूळअंगींउटीचंदनाची॥आवडीसुखाचीकोणत
या॥१॥ तैसेंमजकांगाकेलेंपंढरिराया॥ लौकिकहावा
यांवाढविला ॥ २॥ ज्वरिलियापुढेंवाढिलींमिष्टान्नें॥
कायचवीतेणेंघ्यावीत्यांची ॥ ३॥ तुकाम्हणेमडेंश्रृंगा
रिलेंवरी॥ तेचिझालीपरीमजदेवा ॥ ४ ॥ ३१२९॥
वेगडाचारंगराहेकोणकाळ ॥ अंगहेंपीतळनदेखतां
॥ १ ॥ माझेंचित्तमजजवळीचगोही॥ तुझीमजनाहीं
भेटीऐसें॥ २ ॥दासीसुतानाहींपितीयाचाठाव ॥अव
घेंचिवावसांगत्याचें॥ ३॥ तुकाम्हणेमाझीकेलीविटंब
णा॥ अनुभवेंजनायेईलकळों॥ ४ ॥ ॥३१३०॥
मजपुढेंनाहींआणिकबोलतां॥ ऐशीकांहींचिंतावाटत
से॥१॥ याचातुम्हीकांहींदेखापरिहार॥ सर्वज्ञउदारपां
डुरंगा॥२॥कामक्रोधनाहींसांडिलेआसन॥ राहिलेव
सोनदेहामध्यें॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांझालोंउतराई॥क
ळोंयावेंपाईनिरोपिलें॥ ४॥ ॥३१३१॥
सावित्रीचीविटंबणा ॥रडपणाकरितसे॥१॥कायजा
ळावेंतेंनाम॥अवघेंवाक्असेतें॥२॥कुबेरनांवमोळी॥

वाहे ॥ कैसीपाहेफजिती ॥ ३॥ तुकाम्हणेठुणगुणदेखें॥
उगींचमुखेंफुंदतां ॥ ४ ॥ ॥३१३२॥

नगमेसीझालीदिवसरजनी॥राहिलोंलाजोनीनबोला
वें ॥१ ॥ रुचीवीणकायशब्दवाऱ्यामाप ॥ अनादरेंको
पयेतअसे ॥ २ ॥ आपुलियारडेआपुलेंचिमन ॥ दाटेस
माधानपावतसे॥३॥तुकाम्हणेतुम्हीअसाजीजाणते ॥
कायकरूंरीतेवादावाद ॥ ४॥ ॥३१३३॥

मेल्यावरीमोक्षसंसारसंबंध ॥ आराईलाबद्धठेवाआ
म्हा ॥ १ ॥ वागवितसंदेहराहोंकोठवरी ॥ मगकायथो
रीशेवकाची ॥ २ ॥ गाणेंगीतआम्हानाचणेंआनंदें॥प्रे
मकोठेंभेदेंआंगायेतें ॥३॥ तुकाम्हणेकितीसांगावेदृष्टां
त ॥ नसतांतूंअनंतसानुकूळ ॥ ४ ॥ ॥३१३४॥

येकायेकींआतांअसावेंसेंवाटे ॥ तरीचहेखोटेचाळेके
ले॥ १॥ वाजऊनितोंडघातलेंबाहेरी॥ कुल्पेंकरुनिदा
रींमाजीवसा ॥ २ ॥ उजेडाचाकेलादाटोनिअंधार ॥
सवेंहुद्दारचेष्टविला ॥३ ॥ तुकाम्हणेभयहोतेंतेंचिवरी
होतीकांहींउरींस्वामिसेवा॥४॥ ॥३१३५॥

कायनव्हेसीतूंयेक ॥ देखोंकासयापृथक॥१॥ मुंग्याकें
चेमुंगळे ॥ नटनाट्यतुझेचाळे ॥२॥झालीतरीमर्यादा॥
किंवात्रासावेंगोविंदा ॥३॥तुकाम्हणेसाचा ॥ कोठेंजा
सीहृदईचा ॥ ४ ॥ ॥३१३६॥

कांजीवाढविलें॥ नलगतांहेंउगलें ॥ १ ॥ आतांमानि
तांकंटाळा ॥ भोंवतीमिळालियाबाळा ॥२॥ लावोनि

यांसवे ॥ पळतांदिसालबरवें ॥ ३ ॥ तुकाम्हणेबापा ॥
येतांनकळसीरूपा ॥ ४ ॥ ॥३१३७॥
क्षुधेलियाअन्न ॥ द्यावेंपात्रविचारून ॥ १ ॥ धर्मआहे
वर्मांअंगीं ॥ कळलेंपाहिजेप्रसंगीं ॥ २ ॥ द्रव्यआणि
कन्या ॥ तेथेकुळकर्मशोधण्या ॥ ३ ॥ तुकाम्हणेपुण्यगां
ठी ॥ तरीचउचितासीभेटी ॥ ४ ॥ ॥३१३८॥
वेंचावेंतेंजीवें ॥ पूजाघडेऐशानावें ॥ १ ॥ बिगारीची
तेबिगारी ॥ साक्षीअंतरींचाहरी ॥ २ ॥ फळबीजाऐसें ॥
कार्यकारणासरिसें ॥ ३ ॥ तुकाम्हणेमान ॥ लवणा
सारिखेंलवण ॥ ४ ॥ ॥३१३९॥
मजनाहींधीर ॥ तुम्हीनकराअंगीकार ॥ १ ॥ ऐसेंपडि
लेंविषम ॥ बळीदेवाहूनिकर्म ॥ २ ॥ चालोंनेणेवाट ॥
कल्यानपवेबोभाट ॥ ३ ॥ वेंचोंनेणेजीवें ॥ तुकाउदा
सधरिलादेवें ॥ ४ ॥ ॥३१४०॥
तळमळींचित्तदर्शनाचीआशा ॥ बहुजगदीशाकरुणा
केली ॥ १ ॥ वचनीचसंतपावेलस्वरूप ॥ माझेनेदीपाप
योगायेऊं ॥ २ ॥ विठोऐसाकरींभक्तवेवसाव ॥ नपवे
चिजीवसमाधान ॥ ३ ॥ तुकाम्हणेकाईदेशीलविसावा ॥
पांडुरंगींधांवाघेतेंमन ॥ ४ ॥ ॥३१४१॥
हागतांहीखोडी ॥ चलनमोडवितेकाढी ॥ १ ॥ ऐसेअ
नावरगुण ॥ आवरावेंकायम्हण ॥ २ ॥ नाहींजरीसंग ॥
तरीबडबडवीरंग ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा ॥ तुमचीनघडे
चिसेवा ॥ ४ ॥ ॥३१४२॥

देहनिरसेतरी ॥ बोलावयानुरेउरी ॥ १ ॥ येरवाचेचेंवा
ग्जाळ ॥ अलंकारापुरतेबोल ॥ २॥ कांचेतरीखडे ॥ जा
तीऐसेंचित्तवोढे ॥ ३ ॥ विष्णुदासतुका ॥ पूर्णधणीजा
णेचुका ॥ ४ ॥ ॥ ३१४३ ॥

खोट्याचाविकरा ॥ येथेनव्हेकांचहिरा ॥ १ ॥ कायदा
वायाचेंकाम ॥ उगाचवाढवावाश्रम ॥ २ ॥ परीक्षका
वीण ॥ मिरवोजाणेतेंतेंहीन ॥ ३ ॥ तुकापायांपडे ॥ वा
दपुरेहेंझगडें ॥ ४ ॥ ॥ ३१४४ ॥

पंढरीसींघडेअतित्याईमृत्य ॥ तोजायपतीतअधःपा
ता ॥ १ ॥ दुराचाऱ्यामोक्षसुखाचीवसती ॥ भोळीबा
ळमूर्तीपांडुरंग ॥ २ ॥ केलानसाहावेतीर्थउपवास ॥ क
थेवीणदोषसाधनतें ॥ ३ ॥ कलियापेंभेदमानितांनि
वडे ॥ श्रोतियांसीघडेअंत्यजता ॥ ४ ॥ मोहरींसंलज्ज
तेजाणाशिंदळी ॥ काळिमाकाजळीपाववीते ॥ ५ ॥ तु
काम्हणेयेथेविश्वासजतन ॥ पुरेंभीमास्नानसमपाय॥
॥ ६ ॥ ॥ ३१४५॥

चातुर्याच्याअनंतकळा ॥ सत्याविरळाजाणता ॥ १ ॥
हांसेत्यासवेंहासेजन ॥ रडतांभिन्नपालटे ॥ २ ॥ जळो
ऐसेवांजटबोल ॥ गुणामोलभूसमिथ्या ॥ ३ ॥ तुकाम्ह
णेआंधळ्याऐसे ॥ वोंगळपिसेंकौतुकें ॥ ४ ॥ ३१४६॥

नयोवाचेअनुचितवाणी ॥ नसोमनींकुडीबुद्धी ॥ १ ॥
ऐसेंमागाअरेजना ॥ नारायणाविनऊनी ॥ २॥ काम
क्रोधापडोचिरा ॥ ऐसावरसायास ॥ ३ ॥ तुकाम्हणे

नानाछंदें ॥ याविनोदेंनपडावें ॥ ४ ॥ ॥ ३१४७ ॥
माझियादेहाचीमजनाहींचाड ॥ कोठेकरूंकोडआणि
कांचें ॥ १ ॥ इच्छितातेमानमागादेवापासीं ॥ असा
संचितासींगुंफलेहो ॥ २ ॥ देहआम्हीकेलाभोगाचेसां
भाळीं ॥ राहिलेनिराळीमानामान ॥ ३ ॥ तुकाम्हणेजरी
वेंचावेंवचन ॥ नसतातोशीणवाढवावा ॥ ४ ॥ ३१४८
धरितांइच्छादूरीपळे ॥ पाठीसोहळेउदास ॥ १ ॥ म्हण
ऊनिआसक्तमन ॥ नकाखूणसांगतों ॥ २ ॥ आविसा
पासींअवघेंवर्म ॥ सोसेश्रमपाववीं ॥ ३ ॥ तुकाम्हणे
बीजन्यावें ॥ तेथेंयावेंफळानें ॥ ४ ॥ ॥ ३१४९ ॥
वेदशास्त्रनाहींपुराणप्रमाण ॥ तयाचेंवदननावलोका
वें ॥ १ ॥ तार्किकाचेंअंगआपणापारीखें ॥ माजऱ्यासा
रीखेंवाइचाळे ॥ २ ॥ मातानिंदीतयाकोणतोआधार ॥
भंगलेंखापरयाचिनावें ॥ ३ ॥ तुकाम्हणेआडरानेंज्याची
चाली ॥ तयाचीतेबोलीमीठेंविण ॥ ४ ॥ ॥ ३१५० ॥
कस्तुरीचेअंगींमीनलीम्रत्तिका ॥ मगवेगळीकांयेईल
लेखूं ॥ १ ॥ तयापरीभेदनाहींदेवभक्तीं ॥ संदेहाच्यायु
क्तिसरोंद्याव्या ॥ २ ॥ इंधनींतेआगीसंयोगाच्यागुणें ॥
सागरदर्शनेंवोहळतोची ॥ ३ ॥ तुकाम्हणेमाझेसाक्षी
चेंवचन ॥ येथेंतोकारणशुद्धभाव ॥ ४ ॥ ॥ ३१५१ ॥
भक्तितेंनमनवैराग्यतोत्याग ॥ ज्ञानब्रह्मींभोगब्रह्मतनु
॥ १ ॥ देहाच्यानिर्शनेंपाविजेयाठाया ॥ माझीऐसी
कायाजंवनव्हे ॥ २ ॥ उदकअग्निधान्यझाल्याघडेपाक ॥

येकावीणयेककामानये ॥ ३ ॥ तुकाम्हणेमजकळलें
याचणी॥ वडवडीचीवाणीअथवासत्य॥४॥३१५२
श्रीसंतांचियेमाथाठेवींचरणावरी॥ साष्टांगहेकरींदंड
वत ॥ १ ॥ विश्रांतिपावलोंसांभाळाउत्तरीं ॥ वाढलें
अंतरींप्रेमसुख॥ २॥ डौरलींहेकायाकृपेच्यावोरसें॥
नव्हेआतांरिसेंउद्धरिलों॥ ३ ॥ तुकाम्हणेमजनघडतां
सेवा॥ पूर्वपुण्यठेवावोढवला॥ ४॥ ॥३१५३॥
नेणोंकायनाड॥ आलाउचितकाळआड ॥ १ ॥ नाहीं
झालीसंतभेटी॥ येवढीहानीकायमोठी॥ २॥ सहजपा
यांपासीं॥ जवळपावलीयाऐसी ॥ ३ ॥ चुकीझाली
आतांकाय॥ तुकाम्हणेउरलीहाय॥ ४॥ ॥३१५४॥
आणिककांहींनेणें॥ असेपायांच्याचिंतनें ॥ १ ॥ मा
झानव्हावाविसर॥ नाहींआणिकआधार॥ २॥ भांड
वलसेवा॥ हाचिठेवियेलाठेवा॥३॥ करींमानभावा॥
तुकाविनंतिकरीदेवा॥ ४॥ ॥३१५५॥
आरुषमाझीवाणीबोबडींउत्तरें ॥ केलींतींलेंकुरेंसल
गीपाईं॥ १ ॥ करावेंकौतुकसंतींमायबापीं ॥ जीवन
देऊंनिरोपींविस्तारिजे ॥ २ ॥ आधारेंवदलीप्रसादा
चीवाणी॥ उच्छिष्टसेवनींतुमचिया ॥ ३॥ तुकाम्हणे
हेचिकरितोंविनंती॥ मागेंनपुढतीशेवादान ॥ ४ ॥
॥ ३१५६॥
पुरुषाहातींकंकणचुडा॥ नवलदोडवृत्तिया॥ १ ॥पा
ह्यकेसीविटंवणा॥ नारायणादेखिली ॥ २ ॥ जळोऐ

सीब्रिदावळी ॥ भाटवोळीवयणाची ॥ ३ ॥ तुकाम्हणे
पाहोंडोळां ॥ अवकळानयेहे ॥ ४ ॥ ॥ ३१५७॥
विथीयेवढेंसेंपोट ॥ येवढाबोभाटतयाचा ॥ १ ॥ ज
ळोत्याचीविटंबणा ॥ भूकजनानाचवी ॥ २ ॥ अभि
मानशिरींभार ॥ झालेखरतृष्णेचे ॥ ३ ॥ तुकाम्हणेनर
काजावें ॥ हाचिजीवाव्यापार ॥ ४ ॥ ॥३१५८॥
शेवटासीजरीआले ॥ तरीझालेआंधळे ॥ १ ॥ स्वहि
ताचालेशनाहीं ॥ दगडाकांहींअंतरीं ॥ २ ॥ कायपरि
सासवेंभेटी ॥ खापरखुटीझालीया ॥ ३ ॥ तुकाम्हणेअ
धमजन ॥ अवगुणचिवाढवी ॥ ४ ॥ ॥३१५९॥
प्रायश्चित्तदेतोतुका ॥ जातोलोकांसकळां ॥ १ ॥ धरि
तीलतेतरतीमनीं ॥ जातीघाणीवायांत्या ॥ २ ॥ निग्र
हानुग्रहाचेठायीं ॥ देतोघायपाहोनी ॥ ३ ॥ तुकाझाला
नरसिंही ॥ भयनाहींरूपेनें ॥ ४ ॥ ॥ ३१६० ॥
दुर्जनाचेंअंगअवघेंसरळ ॥ नरकाचाकोथळसांठव
ला ॥ १ ॥ खायअमंगळबोलेअमंगळ ॥ उठवीकपा
ळसंघट्टणें ॥ २ ॥ सर्पामंत्रचालेधरावयाहातीं ॥ खळा
चीतोजातीनिखळची ॥ ३ ॥ तुकाम्हणेकांहींनसाहेउ
पमा ॥ आणिकअधमावोखट्यासी ॥ ४ ॥ ३१६१ ॥
ऐकाजीसंतजन ॥ सादरमनकरूनी ॥ १ ॥ सकळांचें
सारयेक ॥ कंटकतेत्यजावे ॥ २ ॥ विशेषताकांघाहुनी
सेवीत्याघाणीआगळी ॥ ३ ॥ तुकाम्हणेज्याचीजोडी
तेपरवडीबैसीजे ॥ ४ ॥ ॥३१६२॥

आज्ञापाळोनियांअसेयेकसरें ॥ तुमचींउत्तरेंसंतांचीं हीं ॥ १ ॥ भागऊनिदेहठेवियेलापाईं ॥ चरणावरीडोई येथूनीची ॥ २ ॥ येणेंजाणेंहोतेंउपाधीच्यामूळें ॥ पूजा तेसकळअकर्तव्य ॥ ३ ॥ तुकाम्हणेअसेचरणींचारज॥ पदींचसहजजेथेंतेथे ॥ ४ ॥ ॥ ३१६३॥

नसांडावाठाव ॥ ऐसानिश्चयाचाभाव ॥ १ ॥ आतांपुरे पुन्हायात्रा ॥हेचिसारूनीसर्वत्रा॥ २॥सन्निधचिशेवा॥ असोंकरोनीयांदेवा॥ ३ ॥ आज्ञेच्यापाळणें ॥ असेंतु कासंतांम्हणे ॥ ४ ॥ ॥ ३१६४ ॥

उपाधीचेंबीज ॥ जळोनीराहिलेंसहज ॥ १ ॥ आम्हारा हिलीतेआतां ॥ चालीदेवाचियासत्ता ॥ २॥पराधीनतें जिणें ॥ केलेंसत्तानारायणें॥ ३ ॥ तुकाम्हणेपाय ॥ खुं टलेआणिकउपाय ॥ ४ ॥ ॥ ३१६५॥

गोविंदावांचोनीवदेज्याचीवाणी ॥ हागवणघाणीपि टपिटते ॥ १ ॥ मस्तकसांडुनिसीसफूलगुडघा ॥ चार तोअवघावावळयाचा ॥ २ ॥ अंगभूतम्हणेपूजितोवा हाणा ॥ म्हणतांशाहाणायेईलकैसा ॥ ३ ॥ तुकाम्हणेवे श्यासांगेसुवासिनी ॥ इतरपूजनींभावेतैसा ॥ ४ ॥ ॥ ३१६६॥

कुतऱ्याऐसेंज्याचेंजिणें ॥ संगकोणेंनकरिजे ॥ १ ॥ जा यतिकडेहाडहाडी ॥ गोन्हावाडीचसोयरी ॥ २ ॥ अवगु णाचात्यागनाहीं ॥ खवळेपाहींउपदेशें ॥ ३ ॥ तुकाम्ह णेकेंचीलावी ॥ ठेंग्याकेवीअंतर ॥ ४ ॥ ॥ ३१६७॥

सर्वदाहिखोटासंग॥ उपजेभंगमनासी॥ १ ॥बहुरंगें
भरलेजन॥ संपन्नचिअवगुणीं ॥ २ ॥ सेविलियानि
ष्कामबुद्धी॥ मगशुद्धिसांडावी॥ ३ ॥ त्रासोनियांबो
लेतुका॥ आतांलोकांदंडवत॥ ४ ॥ ॥३१६८॥
उपचारासीवांझझालों॥ नकाबोलोंयावरी ॥ १ ॥ अ
सेलतेंअसोतैसें॥ भेटीसरिसेंनमन ॥ २ ॥ दुसऱ्याम
ध्येंकोणमिळे॥ छंदचाळेबहुमतें॥ ३॥ येकायेकींआ
तांतुका॥लौकिकायाबाहेरी॥ ४॥ ॥३१६९॥
मीतेंमीतूंतेंतूं॥ कुडकुडहेलाडसी ॥१॥ वचनाचीपडेतु
टी॥ पोटींचेंपोटींराखावें॥२॥ येथीलतेंयेतेथिलयेथे॥
वेगळ्याकुंथेकोणभारें ॥ ३ ॥ याचेंयासत्याचेंत्यास॥
तुक्यानेंकासघातली॥ ३॥ ॥३१७०॥
लाह्याच्याउत्तरींवाढवितीकलह॥ हातोअमंगळजाती
गुण॥ १ ॥ तमाचेशरीरींविटाळचिवसे॥ विचाराचा
नसेलेशतोहि॥ २॥ कवतुकेंघ्यावेलेंकराचेबोल॥ सा
हिलीयामोलऐसेंनाहीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेकायउपदेश
खळा॥ न्हाऊनिकाउळाक्षतेंधुंडी॥ ४॥ ॥३१७१॥
आतांमजदेवा॥ इचेहातींचेंसोडवा ॥ १ ॥ पाठीलाग
लीसेलासी॥ इच्छाजीतेजैसीतैसी ॥ २॥ फेडाआतां
पांग॥ अंगींलपवुनिअंग॥ ३॥ दुजेंनेणेतुका ॥ कां
हींतुंम्हासीठाउका॥ ४॥ ॥३१७२॥
बहुवाटेभय॥ माझेउडीघालादये॥ १॥ फांसागुंतलों
लिगाडी॥ नचलेबळचरफडी॥ २॥ कुंठितचीयुक्ती॥

माझ्याझाल्यासर्वशक्ति ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा ॥ काम मोहेंकेलागोवा ॥ ४ ॥ ॥ ३१७३ ॥

विष्ठाभक्षींतयाअमृतपारिखें ॥ वोंगळासीसखेवोंगळचि ॥ १ ॥ नयेपाहोंकांहींगोऱ्हावाडीचाअंत ॥ झणीटाकासंतदुर्जनापें ॥ २ ॥ भेसळीच्याबीजाअमंगळगुण ॥ उपजवीशीणदरुशनें ॥ ३ ॥ तुकाम्हणेचीथूजयाघरींबंधन ॥ तेथेतेंकारणकासयाचें ॥ ४ ॥ ३१७४ ॥

चळलेंतेंकायनकरीवडबड ॥ नम्हणेफिकेंगोडभुकेलेंतें ॥ १ ॥ उमजल्यावीणनधरींसांभाळ ॥ असोखळखळजनाचीहे ॥ २ ॥ गरज्यानकळेआपुलियाचाडा॥ करावीतेपीडाकोणाकाई ॥ ३ ॥ तुकाम्हणेभोगभोगतीलभोगें॥ संचिततेजोगेंनाहींकोणा ॥ ४ ॥ ॥ ३१७५ ॥

आपुलातोदेहआम्हाउपेक्षित ॥ कोठेजाऊंहितसांगोंकोणा ॥ १ ॥ कोणनाहींदक्षकरितोसंसार ॥ आम्हीहाविचारवमनकेला ॥ २ ॥ नाहींयाधरीतजीवित्वाचीचाड ॥ कोठेकरूंकोडआणिकाचें ॥ ३ ॥ तुकाम्हणेकसेचिंतूनियांदेवा ॥ मीमाझाहाहेवासारोनियां ॥ ४ ॥

॥ ३१७६ ॥

चाकरीवांचून ॥ खावेंअनुचितवेतन ॥ १ ॥ धणीकाढूनीयांनिजा ॥ करीयकामेंचिपूजा ॥ २ ॥ उचितावेगळें ॥ अभिलाषतोंडकाळें ॥ ३ ॥ सांगेतरीतुका ॥ पाहालाजनाहींलोकां ॥ ४ ॥ ॥ ३१७७ ॥

वरेंसावधान ॥ राहावेंसमयराखोन ॥ १ ॥ अवघ्यापा

वतांअवकळा ॥ नाहींसारिखीपावेळा ॥ २ ॥ लाभ
अथवाहानी ॥ थोड्यामध्येंचिभोवणी ॥ ३ ॥ तुकाम्ह
णेसखा ॥ आपणानाहींतोचिवाखा ॥ ४ ॥ ३१७८ ॥
कायकरूंजीदातारा ॥ कांहींनपुरेसंसारा ॥ १ ॥ झाली
माकडाचीपरी ॥ येतोतळाजातोवरी ॥ २॥ घालिभल
तेठाईंहात ॥ होतीशीव्याघैसेलात ॥ ३ ॥ आदिअंतींतु
का ॥ सांगेनकळेझालाचुका ॥ ४॥ ॥३१७९॥
धर्मतोनकळे ॥ कायझांकतीलडोळे ॥ १ ॥ जीवभ्रमले
याकामें ॥ कैशींकळोंयेतीवर्में ॥ २ ॥ विषयाचामाज॥
कांहींधरूनेदीलाज ॥ ३ ॥ तुकाम्हणेलासी॥मायनाच
वीतीकैशी ॥ ४॥ ॥३१८०॥
दुर्जनाचीजोडी ॥ सज्जनाचेंखेंटरतोडी ॥ १ ॥ पाहेनिमि
त्यतेंउणें ॥ धांवेछळावयासुणें ॥ २ ॥ नम्हणेरामराम
मनेवाचेहेंचीकाम ॥ ३ ॥ तुकाम्हणेभागा ॥ आलीनिं
दाकरीमागा ॥ ४ ॥ ॥३१८१॥
स्पादिचेंतेंसोंग ॥ संपादीतांराजाव्यंग ॥ १ ॥ पाहोंकै
सीविटंबणा ॥ मुखींअभाग्याचीजना ॥ २ ॥ दिसतेंतें
लोपी ॥ झिझ्यावोढोनीयांपापी॥ ३॥सिदळीत्यासती॥
तुकाम्हणेथुंकाघेती॥ ४ ॥ ॥३१८२॥
भक्तम्हणवोनिवंचावेतेजीवें ॥ तेणेंशेणखावेंकशासा
ठीं॥ १॥नाशिलेआडबंदकौपीनतेमाळा॥अडचणराऊ
ळामाजीकेली॥२॥ अंगिकारियेलेसेवेअंतराय॥तया
झालान्यायखापराचा ॥ ३ ॥ तुकाम्हणेकोठेतगोंयेत

घाणी ॥ आहारचीमनींअधीरता ॥ ४॥ ॥३१८३॥
गाईल्याचेंकामहिताचाआवारा ॥ लाजफजितखोरा
असतनाहीं ॥ १ ॥ चितानमिळेतेढोळांसलोंयेत ॥ अ
सावेंपरतेंजवळूनी ॥ २ ॥ नकरावासंगनबोलावीमा
त ॥ सावधानचित्तनाहींत्यासी ॥ ३ ॥ तुकाम्हणेदुःखदे
तीलमाकडें ॥ घालीतीसांकडेंउफराटें ॥ ४ ॥३१८४॥
बहुबरेंयेकायेकी ॥ संगचुकीकरावा ॥ १ ॥ ऐसेंबरें
झालेंठावें ॥ अनुभवेंआपुल्या ॥ २ ॥ सांगावेंतेंकाम
मना ॥ सलगिजनानेदावी ॥ ३ ॥ तुकाम्हणेनिघेअं
गीं ॥ दुजेसंगींआतळतां ॥ ४ ॥ ॥३१८५॥
बरवेंआम्हाकळोंआलेंदेवपण ॥ आतांगुजकोणरा
खेतुझें ॥ १ ॥ मारिलेंकांमजसांगआजिवरी ॥ आतां
सरोबरीतुजमज ॥ २ ॥ जेंआम्हीबोलोतेंआहेतुझ्या
अंगीं ॥ देईनप्रसंगींआजिशिव्या ॥ ३ ॥ निलाजिरातु
जनाहींयातीकूळ ॥ चोरटाशिंदळठावामज ॥ ४ ॥स्वा
सीधोंडेमातीजीवजंतूझाडें॥येकलेंउघडेंपरदेशीं ॥५॥
गाढवकुतराऐसामजठावा ॥ बईलतूंदेवाभारवाही ॥
॥ ६ ॥ लटिकातूंमागेंबहुतांसीठावा ॥ आलेंअनुभवा
माझ्यातेंही ॥ ७॥ तुकाम्हणेमजखवळीलेंभांडा ॥ आ
तांधीरतोंडानधरवें ॥ ८ ॥ ॥३१८६॥
आम्हीभांडूंतुजसवें ॥ वर्मींधरूंझालेंठावें ॥ १ ॥ होसीस
रडेवेडुक ॥ वाघगांड्याहीपाईक ॥ २ ॥ बळकरीतया
भ्यावें ॥ पळोंलागेतयाघ्यावें ॥ ३ ॥ तुकाम्हणेदुरपर

ता ॥ नरनारीनातूंभूता ॥ ४ ॥ ॥३१८७॥
कायसाहातोसीफुका ॥ माझ्रावुडवीलारुका ॥ १ ॥ री
णघराचेंपांगिलें ॥ तेंनसुटेकांहींकेलें ॥ २ ॥ चौघांचि
यामतें ॥ आधींखरेंकेलेंहोतें ॥ ३ ॥ तुकाम्हणेयावरी ॥
आतांभीडकोणधरी ॥ ४ ॥ ॥ ३१८८ ॥
प्रीतीचाकलह ॥ पदरासीघालीपीळ ॥ सरोनेदीबाळ ॥
मागेंपुढेंपित्यास ॥ १ ॥ कायलागेयासीबळ ॥ हेडावि
ताकोणकाळ ॥ गोवितेसबळ ॥ जाळीस्नेहसूत्राची
॥ २ ॥ सलगीदिल्हालाड ॥ बोलेतेंतेंवाटेगोड ॥ करीबु
झाऊनीकोड ॥ हातींदेउनीभातुकें ॥ ३ ॥ तुकाम्हणेबो
लकोणा ॥ हेकांनेणानारायणा ॥ सलगीच्यावचना ॥
कैसेंऊपजेविषम ॥ ४ ॥ ॥३१८९॥
भारदेखोनीवैष्णवांचे ॥ दूतपळालेयमाचे ॥ १ ॥ आ
लेआलेवैष्णववीर ॥ काळकांपतीअसुर ॥ २ ॥ गरुड
टक्याच्याभारें ॥ मुनिगर्जेजयजयकारें ॥ ३ ॥ तुकाम्ह
णेकाळ ॥ पळेदेखोनीयांबळ ॥ ४ ॥ ॥३१९०॥
रंगींरंगींरेश्रीरंगे ॥ कायभुललासीपतंगें ॥ १ ॥ शरीरजा
याचेंठेंगणे ॥ धरिसीअभिलाषझणें ॥ २ ॥ नव्हेतुझाहा
परिवार ॥ द्रव्यदाराक्षणभंगुर ॥ ३ ॥ अंतकाळींचासो
यरा ॥ तुकाम्हणेविठोखरा ॥ ४ ॥ ॥३१९१॥
जन्मायेउनीकायकेलें ॥ तुवांमुद्दलगमाविलें ॥ १ ॥ कां
रेनफिरशीमाघारा ॥ अझुनितरीफजितखोरा ॥ २ ॥
केलिगांठोकीचीनाशी ॥ पुढेंभीकचीमागसी ॥ ३ ॥ तु

काम्हणेठाया ॥ जाईआपुल्याआलीया ॥४॥३११२॥
पंढरीसजातांनिरोपआईका ॥ वैकुंठनायकाक्षेमंसां
गा ॥ अनाथाचानाथहेंतुझेंवचन ॥ धांवेंनकोदीनगां
जूंदेऊं ॥ २ ॥ ग्रासीलेंभुजंगेंसर्वमहाकाळें ॥ नदिसेहें
जाळेंउगवीतां ॥ ३ ॥ कामक्रोधशुनींश्वापदींबहुतीं ॥
वेढिलोंआवर्तांमायेचिया ॥ ४ ॥ मृगजळनदीबुडवी
नातारी ॥ आणोनियांवरीतळानेते ॥ ५ ॥ तुकाम्हणेतु
वांधरिलेंउदास ॥ तरीपाहोंआसकवणाची ॥ ६ ॥

॥ ३११३ ॥

कृपाळुसज्जनतुम्हीसंतजन ॥ येवढेंकृपादानतुमचेंम
ज ॥ १ ॥ आठवणतुम्हीद्यावीपांडुरंगा ॥ कीवमाझी
सांगाकाकुलती ॥ २ ॥ अनाथअपराधीपतीतआगळा
परिपायांवेगळानकाकरूं ॥ ३ ॥ तुकाम्हणेतुम्हीनिरवि
ल्याखरी ॥ मगमजहरीउपेक्षीना ॥ ४ ॥ ॥ ३११४ ॥
संतांचियेपाईंमाझाचीविश्वास ॥ सर्वभावेंदासझालों
त्यांचा ॥ १ ॥ तेचिमाझेंहीतकरीतीसकळ ॥ जेणेंहागो
पाळकृपाकरी ॥ २ ॥ मागलीयामजवाहातीलकडे ॥
त्याचीयानेंजोडेसर्वसूख ॥ ३ ॥ तुकाम्हणेशेषघेईनआ
वडी ॥ वचननमोडीबोलीलेंते ॥ ४ ॥ ॥ ३११५ ॥
लाघवीसुत्रधारी ॥ दोरीनाचवीकूसरी ॥ उपजवीपाळी
संव्हारी ॥ नानापरीचेलाघवें ॥ १ ॥ भरुनीपंढरीयेउर
लें ॥ भक्तिसुखेंसुखावलें ॥ उभेंचिराहिलें ॥ करकटीं न
वेसे ॥ २ ॥ बहुकाळेंनासांवळें ॥ बहुकठीणनाकोंवळें

गुणत्रयावेगळें ॥ बहुबळेंआथिलें ॥ ३ ॥असोनिनसे सकळांमधीं ॥ मनाअगोचरबुद्धी ॥ स्वामीमाझाकृपा निधी ॥ तुकाम्हणेश्रीविठ्ठल ॥ ४ ॥ ॥ ३१९६॥

कीर्तनऐकावयाभुललेश्रवण ॥ श्रीमुखलोचनदेखा वया ॥ १ ॥उदितहेंभाग्यहोईलकोणेकाळीं ॥ चित्तत ळमळींम्हणवोनि ॥ २ ॥उतावीळबाह्याभेटीलागींदंढ॥ लोटांगणींघढजावयासी ॥ ३ ॥ तुकाम्हणेमाथाठे वीनचरणीं ॥ होतीलपारणींइंद्रियांचीं ॥ ४॥३१९७॥

नामघेतांकंठशीतळशरीर ॥ इंद्रियेंव्यापारनाठवीती॥ ॥ १ ॥ गोडगोमटेंहेंअमृतासीवाड॥ केलाकइवाडमा झ्याचित्तें॥ २ ॥ प्रेमरसेंझालीपुष्टअंगकांती ॥ त्रिवि धसांडीतीतापअंग ॥ ३ ॥ तुकाम्हणेतेथेंविकाराचिमा त ॥ बोलोंनयेहितसकळांचें ॥ ४ ॥ ॥ ३१९८ ॥

स्वामीकाजगुरुभक्ति ॥ पितृवचनसेवापती ॥ १ ॥ हे विष्णुचीमहिमापूजा ॥ अनुभवनधरीदुजा ॥ २ ॥ स त्यबोलेमुखें ॥ दुखवेआणीकाच्यादुःखें ॥ ३ ॥ निश्च याचेंबळ ॥ तुकाम्हणेतेंचिफळ ॥ ४ ॥ ॥३१९९॥

चित्तघेऊनीयांतूंकायबादसी॥ ऐसेंमजपासींसांगआ तां॥ १ ॥तरीचपंढरिरायाकरीनसाठोवाटि॥ नेघेजयातु टीयेईलते ॥ २ ॥ रिद्धीसिद्धीकांहींदाविसीअभिलाष ॥ नाहींमजआसमुक्तीचीही ॥ ३ ॥ तुकाम्हणेतुझेंमाझें घडेतर॥ भक्तीचाभावरेदेणेघेणे ॥ ४ ॥ ॥३२००

तुझासंगपुरेपुरे ॥ संगतीपुरेविठोबा ॥ १ ॥आपुल्यासा

रिखेकरिसीदासा॥भिकारीसाजगजाणे॥२॥रूपनाहीं ठावनावा॥तैसेंआमुचेंकरिसीदेवा॥ ३ ॥ तुकाम्हणे तोयेआपुलेंभेंढोळें॥ करिसीवाटोळेंमाझेंतैसें ॥ ४॥

॥ ३२०१॥

आतांमजतारीं॥ वचनहेंसाचकरीं ॥ १ ॥ तुझेंनाम दीनानाथ॥ ब्रीदावळीजगविख्यात ॥ २ ॥ कोणले खिमाझेदोषा॥ तुझात्रिभुवनींठसा ॥ ३ ॥ वायांजा तांमज॥ तुकाम्हणेतुम्हालाज॥४॥ ॥ २२०२ ॥

विठ्ठलआमुचानिजाचा ॥ सज्जनसोयराजीवाचा ॥ ॥ १ ॥ मायबापचुलताबंधु॥अवघातुजसींसंबंधु॥२॥ उभयकुळींसाक्ष॥ तूंचिमाझामातुळपक्ष ॥ ३ ॥सम र्पिलीकाया ॥ तुकाम्हणेपंढरिराया॥४॥ ॥३२०३॥

वेदाचातोअर्थआम्हासीचठावा॥येरानींवाहावाभार माथां॥१॥ खादल्याचीगोडीदेखील्यासीनाहीं॥भारथ नवाहीमजुरीचें॥ २ ॥ उत्पत्तिपाळणसंव्हारा चेंनिज॥ जाणेनेलेंबीजत्याचेहातीं॥३॥तुकाम्हणेआलेंआपण चिफळ॥हातोहातींमूळसांपडलें॥४॥ ॥३२०४॥

आमुचातूंॠणीठाईंचाचिदेवा॥मागावयाठेवाआलों दारा॥१ ॥ वर्मतुझेंआम्हासांपडलेंहातीं ॥ धरीयेलेचि त्तींदृढभाव॥ २ ॥ बैसलोंधरणेकोंडुनियांद्वारीं ॥ आंतू निबाहेरीयेवोंनेदी॥३॥ तुजमजसरीहोईलयाविचारें॥ जळोभांडखोरेंनिलाजीरें॥ ४ ॥ भांडवलमाझेंमिरवी सीजनीं॥ सहस्रवोवणी नाममाळा ॥ ५ ॥ तुकाम्हणे

आम्हीकेलीजीवेसाठीं ॥ तुम्हाआम्हातुटीघालूंआतां ॥
॥ ६ ॥ ॥३२०५॥
कायधोविलेंबाहेरी ॥ मनमळलेंअंतरीं ॥ गादलेंजन्म
वरी ॥ असत्यकांटेकाटले ॥ १॥ सांडींव्यापारदंभाचा
शुद्धकरींरेमनवाचा ॥ तुझियाचित्ताचा ॥तूंचिग्वाही
आपुला॥२॥ पापपुण्यविटाळदेहीं॥करितांनविचारी
सीकांहीं ॥ कायचांचपसीमही ॥ जीअखंडसोंवळी ॥
॥ ३ ॥ कामक्रोधावेगळा ॥ ऐसाहोईरेसोंवळा ॥
तुकाम्हणेकळा ॥ गुंडुनिठेवीकुसरी ॥४ ॥ ॥३२०६॥
सत्यकर्मआचरेंरेबापा ॥ सत्यकर्मआचरेंरे ॥ सत्यकर्म
आचरेंरे ॥ होईलहितवारेलदुःखअसत्याचें॥१ ॥ ऊस
वाढवितांवाढलीहेगोडी॥गूळसाकरहेत्याचीपरवडी ॥
धृ०॥ २॥ साकरेच्याआळांलावीलाकांदा॥स्थळसाना
परीवाढेदुर्गंधा॥३॥ सत्यअसत्यहेऐसीयापरी॥तुकाम्ह
णेयाचाविचारकरीं ॥ ४ ॥ ॥ ३२०७॥
पाषाणदेवपाषाणपायरी ॥ पूजायेकावरीपायठेवी ॥
॥ १ ॥ सारतोभावसारतोभाव ॥ अनुभवींदेवतेचिझा
ले ॥ २ ॥ उदकाभिन्नगंगापालटकाई ॥ गोडयेशकांहीं
चवीनाहीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेहेंचिभाविकाचेंवर्म ॥ येरीं
धर्माधर्मविचारावे ॥ ४॥ ॥३२०८॥
जंन्मायेवोनियांकांरेनिदसुरा ॥ जाईभेटीवरारखुमा
ईच्या ॥ १ ॥पापतापदैन्यजाईलसकळ ॥ पावसीअढ
ळउत्तमतें ॥ २ ॥ संतमहंतसिद्धहरिदासदाटणी ॥ फि

टतीपारणीं इंद्रियांचीं ॥ ३॥ तुकाम्हणेतेथेंनामाचागजर॥ फुकाचीअपारलूटघेई॥ ४॥ ॥ ३२०९॥

कायधोविलेंकातडें॥ काळकूटभितरीकुडें॥ १॥ उगाराहेलोकभांडा ॥ चाळविल्यापोरेंरांडा ॥ २॥ घेसीबुंथीपानवथा॥ उगाचहालविसीमाथा॥ ३॥ लाउनिबैसेटाळी॥ मनइंद्रियेंमोकळीं॥ ४॥ हालवितबैसेमाळा॥ विषयजपवेळोंवेळां॥५॥ तुकाम्हणेहाव्यापार॥ नामविठोबाचेंसार॥ ६॥ ॥३२१०॥

येईवोयेईवोयेईयेईधावोनियां ॥ विलंबकांवायांलाविलाकृपाळें॥ १॥ विठाबाईविश्वंभरेभवछेदके॥ कोठेंगुंतलीसमायविश्वव्यापके॥२॥ नकरींनकरींनकरींआतांआळसअव्हेरु ॥ व्हावयाप्रगटकैचेदूरीअंतर॥ ॥३॥ नेघेनेघेनेघेमाझीवाचाविसावा॥ तुकाम्हणेहावाहावाहावासाधावा॥ ४॥ ॥३२११॥

तरीकांपवाडेगर्जतीपुराणें॥ असतांनारायणशक्तिहीन॥ १॥ कीर्तिवीणनाहींनामाचाडांगोरा॥ येरकांइतरांवानीतनाहीं ॥ २ ॥ तरीचम्हणतोआहेचिरंजीव॥ केलीयाचाजीवसुखीगुण॥३॥चांगलेपणहेंनिरूपितांअंगीं॥ बाणलेंश्रीरंगींम्हणऊनि॥४॥तरीचहाथोरसांगितलेंकरी॥ अभिमानहरीपासींनाहीं॥ ५॥ तुकाम्हणेतरीकरितीयाचीसेवा॥ देवापासींहेवानाहींकुडें॥६ ॥३२१२॥

तेव्हांधालेंपोटबैसलोंपंगती॥ आतांआम्हामुक्तीपांग

काई ॥ १ ॥ धांवाकेलाआतांयेईलधांवोन॥ येथेंका
हींकरणेंलागेसंदेह॥ २॥ गायनाचाआतांकोठेंउरला
काळ॥ आनंदसकळभरीआले ॥ ३॥ देवाच्यासख्य
त्वेंविषमासीठाव॥ मध्येंकोठेवावराहोंशके॥४॥ तेव्हां
झालीअवघीबाधावाताहात ॥ प्रेमल्हदयांतप्रवेशलें
॥५॥ तुकाम्हणेआम्हीजिंतीलेंभरंवसा ॥ देवकोठेदा
सामोकलितो॥ ६॥ ॥ ३२१३॥

हेंचियाच्याऐसेंमागावेंतेंदान॥ वंदूनिचरणनारायणा
॥ १ ॥ धीरउदारीवनिर्मळनिर्मत्सर ॥ येणेंसर्वेश्वरऐसें
नाव ॥ २ ॥ हाचिहोईजेलयाचियाविभागें॥ अनुभवी
अंगींअनुभविला॥३॥ जोडतयाचेनकरावेसायास॥
झालातरीआळसदीनपणें॥ ४॥ पावल्यामागेंकांनघा
लींचधाव॥ धरिल्यातरीहावबळयेतें॥५॥तुकाम्हणेघा
लूंखंडीमध्येंठाक॥ देवाचेंहेवेककरूंघेऊं॥ ६॥
॥ ३२१४॥

सत्ताबळेंयेतोमागतांविभाग॥ लावावयालागनिमि
त्यकरूं॥ १ ॥ तुझीऐसीमुखेंकरूंउच्चारणा ॥ बोलेनारा
यणासांपडऊं ॥ २ ॥ आशेवीणनाहींउपजतमोहो॥
तरीचहागोहोपडेफंदी ॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांव्हावेया
जऐसें॥ सरिसेंसरिसेंसमागमें॥ ४॥ ॥ ३२१५॥
संतसंगेंयाचावाससर्वकाळ ॥ संचलासकळमूर्तीमंत
॥ १ ॥घालोनियांकाळअवघाबाहेरी ॥ त्यासीचअंत
रींवासदिल्हा ॥ २ ॥ आपुलेसेजेहिनाहींउरोंदिल्हे ॥

चोजवितांभलेऐसींस्थळें ॥ ३ ॥ तुकाम्हणेनाहींझांक
तपरिमळ॥ चंदनाचेंस्थळचंदनची॥ ४ ॥ ३२१६॥
करितांहोयाहोयचित्तचित्तनाहीं॥ घटपटकांहींकरून
ये॥ १ ॥ मगहालतचिनाहींजवळून॥ करावातोशीण
शिणवितो ॥ २॥ साहातचिनाहींकांहींपांकुळलें॥ उग
ल्याउगलेंढळतआहे ॥ ३ ॥ तुकाम्हणेतरीबोलावेंझां
कून॥ तेथेंखुणेखूणपुरतेची॥ ४॥ ॥३२१७॥
पुष्टकांतीनिवतीडोळे॥ हेसोहळेश्रीरंगीं ॥ १ ॥ अंतर्बा
हीविलेपन॥ हेंभूषणमिरवूं॥ २॥ इच्छेऐसीआवडपुरे॥
विश्वंभरेजवळी॥ ३ ॥तुकाकरीनारायण॥ त्यायासेव
ननामाचें॥ ४॥ ॥३२१८॥
सुकाळहादिवसरजनी॥ नित्यधनीनवीच॥ १ ॥करूनि
सेऊंनानापरी॥ राहेउरीगोडीनें ॥ २ ॥ सरेऐसानाहीं
झरा॥ पंक्तिकरासमवेत ॥ ३॥ तुकाम्हणेवरवापान्हा
कान्हाबाईमाऊलीचा॥ ४॥ ॥३२१९॥
पाहतांतंवयेकलादिसे॥ कैसाअसेव्यापक॥ १ ॥ ज्या
चेत्याचेमिळणीमिळे॥ तरीखेळेबहुरूपीं॥ २ ॥ जाणि
वेचेंनेदीअंग॥दिसेंरंगनिवडेना ॥ ३ ॥ तुकाम्हणेयेचि
ठाई॥ हेतोनाहींसर्वत्र॥ ४॥ ॥३२२०॥
तुम्हासाठींआम्हाआपुलाविसर ॥ करितांअव्हेरकैसा
दिसे॥ १॥ विचाराजीआतांठाईंचेहेदेवा॥ आम्हानये
हेवावाढवितां॥ २॥आलोंठाकोनीयांसुखाचीवसती॥
पुढेंमाझ्यायुक्तिखुंटलिया ॥ ३॥ तुकाम्हणेझालासक

ळवृत्तांत ॥ केलाप्रणिपातम्हणऊन। ॥ ४ ॥ ३२२१ ॥
करावाउद्धारहेंतुम्हाउचीत ॥ आम्हीकेलीनीतकळली
ते॥ १ ॥पावविलीहाकधांवाम्हणऊन॥करावेंजतनज्या
चेंतेणें ॥ २ ॥ दुश्चित्तासीबोलठेवावयाठाव ॥ ऐसाआ
म्हीभावजाणतसों ॥ ३॥ तुकाम्हणेमाझेंकायावाचाम
न ॥ दुसरेंतेंध्यानकरितनाहीं ॥ ४ ॥ ॥३२२२॥
संताचाउपदेशआमुचेमस्तकीं ॥ नाहींमृत्युलोकींराहा
णेसा ॥ १ ॥ म्हणऊनिवहूतळमळीचित्त ॥ येईंवोधांव
तपांडुरंगे ॥ २ ॥ उपजलीचिंतालागलाउशीर ॥ होत
नाहींधीरनिढळवाढे ॥ ३ ॥ तुकाम्हणेपोटींरिघालेंसेभ
य ॥ करूंआतांकायऐसेंझालें ॥ ४ ॥ ॥३२२३॥
काळावरीघालूंतरीतोसरिसा ॥ नपुरतांइच्छादासकै
से ॥ १ ॥ आतांनाहींकांहींउशिराचेंकाम ॥ नसंडावेंप्रे
मनारायणा ॥ २॥ देवोलागेमगविलंबकांआड॥ गोड
तरीगोडआदिअंत ॥ ३ ॥ तुकाम्हणेहोईलदर्शनेंनिश्चि
ती ॥ गाईनतगीतींध्यानमग ॥ ४ ॥ ॥ ३२२४॥
परउपकारीकायावाचामन ॥ वेंचेसुदर्शनरक्षीतया ॥
॥ १ ॥ याजसाठींअसेयोजिलेंश्रीपती ॥ संकल्पाचेहा
तींसर्वजोडी ॥ २ ॥ परद्रव्यजासीजिव्हापडताळे ॥ य
मदूतटोलेकरितीपूजा ॥ ३ ॥ तुकाम्हणेअंबऋषिदुर्यो
धना ॥ कायझालेंनेणादुर्वासया ॥ ४ ॥ ३२२५ ॥
हागिल्याचेंसिकेवोणवाचिराहे ॥ अपशकूनपाहेवेढ
मळे ॥ १ ॥ अत्यंतसमयन्नेणतांअवकळा ॥ येऊंनये

बळासीकधरा ॥ २ ॥ भोजनसमयींवोकीचाआठवा॥
ठकोनियांजीवकष्टीकरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेकितीसांगा
वेंउगऊन ॥ अभाग्याचेगुणअनावर ॥ ४ ॥ ३२२६॥
नोरडेतरीकायनुजडेकोंबडे ॥ करूनियांवेडेआग्रहदा
वी॥ १ ॥ आइत्याचेंसाहेफुकाचाविभाग॥ विक्षेपानें
जगचिथूकरी॥ २ ॥ नेमूनिठेविलाकरत्यानेंकाळ ॥ न
लाहेसेंबळपुढेंकरूं॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवसात्यझाल्याव
री॥ असंगचिकरीसर्वसंग॥ ४ ॥ ॥ ३२२७॥
तरीसदानिर्भरदास॥ चिंताआसविरहीत॥ १ ॥ अव
घाचियेकीठाव॥ शुद्धभावविठ्ठलीं ॥ २ ॥ निरविलेंते
व्हांत्यास ॥झालावासत्यामाजी ॥ ३ ॥ तुकाम्हणेरूप
ध्यावें॥ नाहींठावेगुणदोष॥ ४ ॥ ॥३२२८ ॥
वेढियाउपचारकरितांसोहळे ॥ कायसुखकळेतयासी
तें॥ १ ॥ अंधापुढेंदीपनाचतीनाचण ॥ भक्तिभावेंवी
णभक्तितैसी ॥ २ ॥ तीमानेंरांखणठेवियेलेंशेता ॥
घालूनियांमाथाचुनातया॥ ३ ॥ खादलेंम्हणोनिशेव
टींबोंबली॥ठाईचीभुलीकांनेणारया॥४॥ मुकीयापा
सावसांगतांपुराणें॥ रोगियामिष्टान्नेंकायहोय ॥ ५॥
नपुंसकाकायकरीलपद्मिणी॥ रुचिवीणवाणीतैसीहो
य॥ ६ ॥ हातपायनाहींकरीलतोकाय ॥ वृक्षींफळआ
हेअमोलिक॥ ७॥ हातानयेतैसावायांचतळमळी॥भा
वेवीणभोळींम्हणेतुका॥ ८॥ ॥३२२९॥
मेघवृष्टीनेंकरावाउपदेश॥ परीगुरूनेंनकरावाशिष्य॥

वांटालाभेत्यास॥केल्याअर्धकर्मांचा॥१॥द्रव्यवेंचावें
अन्नछत्र॥भूतींद्यावेंसर्वत्र॥नेद्यावाहापुत्र॥उत्तम
यातीपोषणा॥२॥बीजनपेरावेंखडकीं॥बोलनाहीं
ज्यांचेबुडखीं॥थितांठकसेखी॥पाठीलागेदिवाण॥३
गुजबोलावेसंतांसी॥पतीराखावीजैसीदासी॥लाड
देतांतियेसी॥वांटापावेकर्मांचा॥४॥शुद्धकसोनिपा
हावें॥वरीलरंगानभुलावें॥तुकाम्हणेघ्यावें॥जयान
येतुटीते॥५॥ ॥३२३०॥
नावडावेजननावडावामान॥करूनीप्रमाणतूंचिघेई
॥१॥सोडूनियांदेहसंबंधव्यसनें॥ऐशीनारायणेकृ
पाकीजे॥२॥नावडावेंरूपनावडावेरस॥अवघीरा
होआसपायांपासीं॥३॥तुकाम्हणेआतांआपुलिया
सत्ता॥करूनीअनंताठेवीऐसें॥४॥ ॥३२३१॥
उपाधीवेगळेतुम्हीनिर्विकार॥कांहींचसंसारतुम्हाना
हीं॥१॥ऐसेंमजकरुनींठवींनारायणा॥समूळवास
नानुरवावी॥२॥निसंगतुम्हासीराहाणेयेकट॥नाहीं
कटकटसाहोंयेत॥३॥तुकाम्हणेनाहींमिळोंयेतशी
ळा॥रंगाशीसकळास्फटीकाची॥४॥ ॥३१३२॥
माहारमातेचपाणीभरे॥नकळेखरेंपुढील॥१॥वोंगळ
अधमाचेगुण॥जातांघडीनलगेची॥२॥श्वानझो
ळीस्वामीसत्ता॥कोपयेतांउत्तरें॥३॥तुकाम्हणेगुमा
नकां॥सांगोंलोकांअधमासी॥४॥ ॥३२३३॥
डोळ्यामध्येंजैसेंकणु॥अणुतेंहिनसमाये॥१॥तैसें

शुद्धकरींचित्त ॥ नकोचित्तबाटऊं ॥ २ ॥ आपुल्याचा
कळवळा ॥ आणिकाबाळावरीनये ॥ ३ ॥ तुकाम्हणे
बीजमुंडा ॥ तैसाचांडापिकाचा ॥ ४ ॥ ॥३२३४॥
मुखींनामहातींमोक्ष ॥ ऐसीसाक्षबहुतांसी ॥ १ ॥ वै
ष्णवांचामालखरा ॥ तुरतुरावस्तुसी ॥ २ ॥ भस्मदंडन
नलगेकाठी ॥ तीर्थाआटिभ्रमण ॥ ३ ॥ तुकाम्हणेआ
डकाठी ॥ नाहींभेटीदेवाचे ॥ ४ ॥ ॥३२३५॥
आगलागोतयासुखा ॥ जेणेहरीनयेमुखा ॥ १ ॥ भज
होतकांविपत्ती ॥ पांडुरंगराहोचित्तीं ॥ २ ॥ जळोतेंसमु
ळ ॥ धनसंपत्तिउत्तमकूळ ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा ॥ जेणे
घडेतुझीसेवा ॥ ४ ॥ ॥३२३६॥
आतांनम्हणेमीमाझें ॥ नेघेभारकांहींवोझें ॥ १ ॥ तूंचि
तारीतामारीता ॥ कळोंआलासीनीरुता ॥ २ ॥ अवघा
तूंचिजनार्दन ॥ संतबोलतीवचन ॥ ३ ॥ तुकाम्हणेकां
हीं ॥ माझेंतीळभरीनाहीं ॥ ४ ॥ ॥३२३७॥
समुद्रवलयांकीतपृथीवीचेंदान ॥ करितांसमाननयेना
मा ॥ १ ॥ म्हणऊनिकोणीनकरावाआळस ॥ म्हणारा
त्रंदीसरामराम ॥ २ ॥ सकळहिशास्त्रेंपठणकरितांवेद ॥
सरिनपवेगोविंदनामयेके ॥ ३ ॥ सकळहितीर्थेंप्रया
गादिकाशी ॥ करितांनामासीतुळतीना ॥ ४ ॥ कर्वतीं
कर्मरींदेहासीदंडण ॥ करितांसमाननयेनामा ॥ ५ ॥ तु
काम्हणेऐसाआहेश्रेष्ठाचार ॥ नामयेकसारविठोबाचें ॥
॥ ६ ॥ ॥३२३८॥

अवघ्यावाटाझाल्याक्षीण ॥ कलिनघडेसाधन ॥ उचि
तविंधान ॥नकळेनघडेसर्वथा॥ १ ॥ भक्तिपंथबहुसो
पा ॥ पुण्यनांगवेयापापा ॥ जाणेयेणेखेपायेणेयेकेंखं
डति ॥ २ ॥ उभारुनिबाहे ॥ विठोपालवीतआहे ॥
दासमीचीसाह्य ॥ मुखेंबोलेआपुल्या ॥ ३ ॥ भावीक
विश्वासी ॥ पारउतरिलेंत्यासी ॥ तुकाम्हणेनासी ॥ कु
तर्क्यांचेकपाळीं ॥ ४ ॥ ॥ ३२३९ ॥
आम्हीनामाचेधारक ॥ नेणोप्रकारआणिक ॥ सर्वभा
वेंयेक ॥ विठ्ठलचीप्रमाण ॥ १ ॥ नलगेजाणावेंनेणा
वें ॥ गावेंआनंदेंनाचावें ॥ प्रेमसुखघ्यावें ॥ वैष्णवांचे
संगती ॥ २ ॥ भावबळेंघालूंकास ॥ लज्जाचिंतादवडूं
आस ॥पाईंनिजध्यास॥म्हणऊंदासविष्णुचे॥३॥भय
नाहींजन्मघेतां ॥ मोक्षपदाहाणूंलाता ॥ तुकाम्हणेस
त्ता॥धरूंनिकटसेवेचि ॥ ४ ॥ ॥ ३२४० ॥
आम्हीहरिचेसंवगडे ॥ जुनेंठाईंचेवेडेबागडे ॥ हातींध
रूनिकडे ॥ पाठीसवेंवागविले ॥ १ ॥ म्हणोनिभिन्नभे
दनाहीं॥ देवाआम्हायेकदेहीं ॥नाहींझालोंकांहीं॥येका
येकवेगळे ॥ २ ॥ निद्राकरितांहोतोंपाईं ॥ सवेंचिलंका
घेतलीतईं ॥ वानरेंगोवळगाईं॥सवेंचारीतफिरतसों॥
॥ ३॥आम्हानामाचेंचिंतन॥रामकृष्णनारायण॥तुका
म्हणेक्षण॥खातांजेवीतांनविसंबों॥ ४॥ ३२४१॥
मागेंबहुतांजन्मीं॥ हेंचिकरितआलोंआम्ही ॥ भवता
पश्रमीं ॥ दुःखेंपीडलींनिववूंत्या ॥ १ ॥ गर्जोंहरिचेप

वाडे ॥ मीळोंवैष्णवबागडे ॥ पाझररोकडे ॥ काढूंपापा
णामध्यें ॥ २ ॥ भावशुद्धनामावळी ॥ हर्षेनाचूंपिटूंटा
ळी ॥ घालूंपायांतळीं ॥ कळीकाळयाबळें ॥ ३ ॥ का
मक्रोधबंदिखानीं ॥ तुकाम्हणेदिल्हेदोन्ही ॥ इंद्रियांचे
धणि ॥ आम्हीझालोंगोसावी ॥ ४ ॥ ॥ ३२४२ ॥
अमरतूंखरा ॥ नव्हेकैसामीदातारा ॥ १ ॥ चालजाऊं
संतांपुढें ॥ वादसांगेननिवाडे ॥ २ ॥ तुजनावरूपजर
नाहीं ॥ तरीदावमाझेंकाई ॥ ३ ॥ खेळसीतूंलीला ॥ ते
थेकायमीवेगळा ॥ ४ ॥ साचतूंलटिका ॥ तैसामीहीम्ह
णेतुका ॥ ५ ॥ ॥ ३२४३ ॥
मंत्रचळापिसेंलागतेंसत्वर ॥ अघडतेफारतरलेनामें
॥ १ ॥ अशौच्यताबाधीआणिकाअक्षरा ॥ नामनिंद
सुराघेतांतरे ॥ २ ॥ रागज्ञानघातचुकतांहोयवेळ ॥ ना
मसर्वकाळशुभदायक ॥ ३ ॥ आणिकाभजनाबोलि
लानिषेध ॥ नामतेंअभेदसकळांमुखीं ॥ ४ ॥ तुकाम्ह
णेतपेंघालितीधांवणी ॥ वेश्याउद्धरूनीनेलीनामें ॥
॥ ५ ॥ ॥ ३२४४ ॥
नव्हतीतेसंतकरितांकवित्व ॥ संतांचेतेआप्तनव्हतीसं
त ॥ १ ॥ येथेनाहींविषसरतआइनाव ॥ निवडेघावडाव
व्हावाअंगीं ॥ २ ॥ नव्हतीतेसंतधरीतांभोंपळा ॥ करी
तांवाकळाप्रावरण ॥ ३ ॥ नव्हतीतेसंतवेदाच्यापठणें ॥
कर्मआचरणेंनव्हतीसंत ॥ ४ ॥ नव्हतीतेसंतकरीतांती
र्थाटण ॥ सेवीलीयावननव्हतीसंत ॥ ५ ॥ नव्हतीतेसं

तकरीतांकीर्तनें ॥ सांगतांपुराणेंनव्हतीसंत ॥ ६ ॥ नव्ह
तीतेंसंतमाळामुद्रांचेभूषणें ॥ भस्मउधळणेंनव्हतीसं
त ॥ ७ ॥ तुकाम्हणेनाहींनिरसलासंदेह ॥ तंववरीअव
घेहेसंसारीक ॥ ८ ॥ ॥३२४५॥

हेंचिदानदेगादेवा ॥ तुझावीसरनव्हावा ॥ १ ॥ गुण
गाईनआवडी ॥ हेचिमाझीसर्वजोडी ॥ २ ॥ नलगेमु
क्तीधनसंपदा ॥ संतसंगदेईसदा ॥ ३ ॥ तुकाम्हणेगर्भ
वासीं ॥ सुखेंघालावेंआम्हासी ॥ ४ ॥ ॥३२४६॥

भाग्यवंताहेपरवडी ॥ करितीजोडीजन्माची ॥ १ ॥ आ
पुल्यालाहोभावें ॥ जेज्याव्हावेंतेंआहे ॥ २ ॥ इच्छाभोज
नाचादाता ॥ नलगेचिंताकरावी ॥ ३ ॥ तुकाम्हणेआ
ल्याथाऱ्या ॥ वस्तुबऱ्यामोलाच्या ॥ ४ ॥ ॥३२४७

वेंचुनियांपिंड ॥ दातादानकरीलंड ॥ १ ॥ जैसियाची
चालीवरी ॥ तैसाअंतरलादुरी ॥ २ ॥ मेलाराखेदिवस ॥
ज्यालेपणझालेंवोस ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा ॥ लोभेंनपुरे
चीसेवा ॥ ४ ॥३२४८॥

अधिरामाझ्यामनाऐकायेकमात ॥ तूंकांरेदुश्चीतनिरं
तर ॥ १ ॥ हेचिचिंताकायखावेंम्हणऊनी ॥ भलेतुजहू
नीपक्षीराज ॥ २ ॥ पाहातेचातकनेघेभूमीजळा ॥ वरु
षेउन्हाळामेघतयां ॥ ३ ॥ सकळांयातीमध्येंठकहासो
नार ॥ त्याघरींव्यापारझारीयाचा ॥ ४ ॥ तुकाम्हणेज
ळींवनींजीवयेक ॥ तयापासींलेखकायअसे ॥ ५ ॥
॥३२४९॥

कांरेनाठवोसीकृपाळुदेवासी ॥ पोसीतोजगासीयेक
लातो ॥ १ ॥ बाळादूधकोणकरितोउत्पति ॥ वाढवी
श्रीपतिसवेंदोनी ॥ २ ॥ फुटतीतरुवरउष्णकाळमासीं
जीवनतयांसीकोणघाली ॥ ३ ॥ तेणेतुझीकायकेली
नाहींचिंता ॥ राहेंत्याअनंताआठऊनी ॥ ४ ॥ तुकाम्ह
णेज्याचेंनावविश्वंभर ॥ त्याचेंनिरंतरध्यानकरी ॥ ५ ॥
॥ ३२५० ॥

उदाराकृपाळापतीतपावना ॥ श्रीदेंनारायणासाचतु
झीं ॥ १ ॥ वर्णिलासीजैसाजाणतानेणता ॥ तैसातूंअ
नंतासाचहोसी ॥ २ ॥ दैत्यांकाळभक्तांमेघःशाममूर्ति ॥
चतुर्भुजहातींशंखचक्र ॥ ३ ॥ कामइच्छातयांतैसाहो
शिराणि ॥ यशोदेच्यास्तनींपानकरी ॥ ४ ॥ होऊनीस
कळकांहींचनहोसी ॥ तुकाम्हणेयासीवेदग्वाही ॥ ५ ॥
॥ ३२५१ ॥

मरणमाझेंमरोनीगेलें ॥ मजकेलेंअमर ॥ ठावपुसिले
बुडपुसिलें ॥ वोसवोसलेदेहभाव ॥ २ ॥ आतांहोतागे
लापुर ॥ धरिलाधीरजीवनीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेंबुनादीचें ॥
झालेंसाचेंउजवणें ॥ ४ ॥ ॥ ३२५२ ॥

माझेलेखींदेवमेला ॥ असोत्यालाअसेल ॥ १ ॥ गो
ष्टीनकरीनावनेघे ॥ गेलोंदोघेखंडोनी ॥ २ ॥ स्तुतिसम
वेतनिंदा ॥ केलाधंदाउदंड ॥ ३ ॥ तुकाम्हणेनिवांतठे
लों ॥ वेंचितआलोंजीवित्व ॥ ४ ॥ ॥ ३२५३ ॥

लवविलीतयासवेंलवेजाती ॥ अभीमानाहातींसांपडे

ना॥ १ ॥ भोळीवेंचेलेणेविष्णुदासांसाजे ॥ तेथेंभाव
दुजेंहारपती ॥ २ ॥ अर्चनवंदननवविधाभक्ति ॥ दया
क्षमाशांतितयेठाईं ॥ ३ ॥ तयेगावींनाहींदुःखाचीवस
ती ॥ अवघाचिभूतींनारायण ॥ ४ ॥ अवघेंचीजालें
सोंवळेंब्रह्मांड ॥ विटाळाचेंतोंडनदेखती ॥५॥ तुकाम्ह
णेगाजेवैकुंठींसोहळा ॥ याहिभूमंडळामाजीकीर्ति ॥
॥ ६ ॥ ॥३२५४॥

पंढरीचीवारीआहेमाझेघरीं ॥ आणिकनकरींतीर्थव्र
त ॥ १ ॥ व्रतयेकादशीकरीनउपवासी ॥ गाईनअहर्नि
शीमुखींनाम ॥ २ ॥ नामविठोबाचेंघेइनमीवाचे ॥
बीजकल्पांतींचेंतुकाम्हणे ॥ ३ ॥ ॥ ३२५५॥

संपदासोहळानावडमनाला॥करितांकंटाळापंढरीचा
॥ १ ॥ जावेंपंढरीसीआवडीमनासी ॥ कधींयेकादशी
आषाढीहे ॥ २ ॥ तुकाम्हणेऐसाआर्तज्याचेमनीं ॥ त्या
चीचक्रपाणीवाटपाहे ॥ ३॥ ॥३२५६॥

कथनींपठणींकरूनीयांकाय ॥ वांचूनीरहणीवायांजा
य ॥ १ ॥ मुखींवाणीअमृतगोडी ॥ मिथ्याभूकेंचरफडी
॥ २ ॥ पोळणीपाळकरितांदगडा ॥ कायजडाहोयते ॥
॥ ३ ॥ मधुमेळऊनीमाशी ॥ आणिकासासीपारधिया
॥४॥ धनमेळऊनीमेळविलीमाती ॥ लोभ्याहातींतेचि
मुखीं ॥५॥ आपुलेंकेलेंआपणखाय ॥ तुकावंदीत्याचे
पाय ॥ ६ ॥ ॥३२५७॥

उमटतीवाणी ॥ वाटेनामाचीयाध्वनी ॥ १ ॥ बरेंसेवनें

उपकारा ॥ द्यावेंद्यावेंयाउत्तरा ॥ २ ॥ सरळआणिमृदा॥
कथापाववीतेऊर्ध्व ॥ ३॥ गातजातोतुका ॥ हाचिउपदे
शआईका ॥ ४ ॥ ॥३२५८॥
कथाकाळींचीमर्यादा ॥ सांगतोंतेभावेंवंदा ॥प्रीतीनें
गोविंदा ॥ हेंचियेकआवडे॥ १॥ टाळवाद्यगीतनृत्य ॥
अंतःकरणप्रेमभरित ॥ वाणितातोकीर्त ॥ तद्भावनेंले
खावा ॥ २॥ नयेआळसेंमोडूंअंग॥कथेकानावडेढुंग॥
हेळणेचारंग॥ दावीलतोचांडाळ॥ ३॥तोंडींविडामाने
ताठा॥थोरपणघालीजेठा॥चित्तनेदीनामपाठा॥गोष्टी
लावीतोचांडाळ ॥ ४ ॥ कथेइच्छीमान ॥ दाउनीयांथो
रपण ॥ रजासंकोचन ॥ लुगडींसांवरितोचांडाळ ॥
॥ ५ ॥आपणबैसेबाजेवरी ॥ सामान्यहरिच्यादासांध
री ॥ तरितोशूळावरी ॥ वाहिजेलनिश्चयें ॥ ६ ॥ येतांन
करीनमस्कार ॥ करजोडोनीयांनम्र ॥ नम्हणतांथोर ॥
आणिकाखेटीतोचांडाळ ॥ ७॥ तुकाविनवीजना ॥ क
थेनाणावेअवगुणा॥करानारायणा॥ऋणीसमर्पकभा
वें ॥८॥ ॥३२५९॥
कथादेवाचेंहेंध्यान॥ कथासाधनमंडण ॥ कथेऐसेंपु
ण्य ॥ आणिकनाहींसर्वथा ॥ १ ॥ ऐसासाचखराभा
व ॥ कथेमाजीउभादेव ॥ सकळतीर्थेंसावेव ॥ जेथेवै
ष्णवराहाती ॥ २ ॥ मंत्रस्वल्पजना ॥ उच्चारीतांवाचे
मना ॥ म्हणउनिनारायणा ॥ क्षणेंजळतिमहादोष॥
॥ ३ ॥ भावेंकरितांकीर्तन ॥ तरेतारीआणिकजन ॥ भे

टेनारायण ॥ संदेहनाहींम्हणेतुका ॥ ४ ॥ ॥३२६०॥

कथात्रिवेणीसंगम ॥ भक्तआणिदेवनाम ॥ तेथींचेउ त्तम ॥ चरणरजवंदितां ॥ १ ॥ जळतिदोषांचेडोंगर ॥ शुद्धहोतीनारीनर ॥ गातिऐकतीसादर ॥ जेपवित्रहरि कथा ॥ २ ॥ तीर्थेंतयाठायां ॥ येतिपुनीतव्हावया ॥ पर्व काळपायां ॥ तळींवसेवैष्णवा ॥ ३ ॥ अनुपम्यहामहि मा ॥ नाहींद्यावयाउपमा ॥ तुकाम्हणेब्रह्मा ॥ नेणेवर्णू यासुखा ॥ ४ ॥ ॥ ३२६१ ॥

सांडूनीकीर्तनकरीआणिककाज ॥ नाचेननिर्लज्जतु झ्यारंगीं ॥ १ ॥ आवडीचेआर्तपुरवींपंढरिराया ॥ शर णतुझ्यापायांयाचिलागीं ॥ २ ॥ टाळीवाहूनीयांविठ्ठल म्हणेन ॥ तेणेनिवारीनभवश्रम ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवानुपे क्षावेंआम्हा ॥ न्यावेंनिजधामाआपुलीया ॥ ४ ॥
॥ ३२६२ ॥

जळतीकीर्तनें ॥ दोषपळतीलविघ्नें ॥ १ ॥ हेचिबळीवंत गाढे ॥ आनंदकरूंदिंडीपुढें ॥ २ ॥ कलीपापाचीहीमूर्ति ॥ नामखड्गघेऊंहातीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेजाऊं ॥ बळेंदमामे हेलाऊं ॥ ४ ॥ ॥ ३२६३ ॥

यमधर्मसांगेदूतां ॥ तुम्हानाहींतेथेसत्ता ॥ जेथेहोयक था ॥ सदाघोषनामाचा ॥ १ ॥ नकाजाऊंतयागांवा ॥ नामधारकाच्याशीवा ॥ सुदर्शनयावा ॥ घरटिफिरेभों वती ॥ २ ॥ चक्रगदाघेउनीहरी ॥ उभाअसेत्याचेद्वारीं ॥ लक्ष्मीकामारि ॥ रिद्धिसीद्धिसहित ॥ ३ ॥ तेबळीया

शिरोमणी ॥ हरिभक्तयेमेदिनी ॥तुकाम्हणकानीं ॥ य
मसांगेदूतांच्या ॥ ४ ॥ ॥ ३२६४ ॥
कान्ह्यारेजगजेठी ॥ देईभेटीयेकवेळे ॥ १ ॥ कायमोक
लीलेंवनीं ॥ सावजांनीवेढिलें ॥ २ ॥ येथवरीहोतासं
ग ॥ अंगअंगलपविलें ॥ ३ ॥ तुकाम्हणेपाहिलेंमागें ॥
येवढ्यावेगेंअंतरला ॥ ४ ॥ ॥ ३२६५ ॥
आपुल्याआम्हीपुसिलेंनाहीं ॥ तुजकांहींकारणें ॥ १ ॥
मागेंमागेंधांवतआलों ॥ कांहींबोलोंयासाठीं ॥ २ ॥ ब
हुतदिवसहोतेंमनीं ॥ घ्यावीधणियेकांतीं ॥ ३ ॥ तुका
म्हणेउभाराहें ॥ कान्हापाहेमजकडे ॥ ४ ॥ ३२६६ ॥
धन्यबाल्याऐशानारी ॥ घरींदारींनांदती ॥ १ ॥ चोरू
नियांतुजपासीं ॥ येतीत्यासीनकळतां ॥ २ ॥ दोहींठांईं
समाधान ॥ समकठिणबहुतांची ॥ ३ ॥ तुकाम्हणेजी
कृपाळूमाऊली ॥ आम्हादीनाचीसाउली ॥ नावरितआली ॥ बाळवेषेंजवळी ॥ १ ॥ माझेंकेलेंसमाधान॥ रूपगोजिरेंसगुण ॥ निववलिंमन ॥ आलिंगनदेऊनि ॥ २॥ कृपाकेलीजनाहार्ती ॥ पाईठावदिल्हासंतीं ॥ कळोंनयेचित्तीं ॥ दुःखकैसेंआहेतें ॥ ३ ॥ तुकाम्हणेमीअन्यायी ॥ क्षमाकरींवोमाझेआई ॥ आतांपुढतीकाई ॥ तुजनघालींसांकडें॥ ४ ॥ ॥ ३४७९॥

कापोकोणीमाझीमान॥सुखेंपीडोतदुर्जन ॥ तुजही
यशीण॥तेंमीनकरींसर्वथा ॥ १ ॥ चूकीझालीयेकवे
ळा॥मजपासुनीचांडाळा ॥ उभेंकरूनिजळा ॥ मा
जिवत्याराखील्या॥ २॥ नाहींकेलाहाविचार॥ माझा
कोणअधिकार॥समर्थासींभार॥नकळेकैसाघालावा
॥ ३ ॥ गेलेहोऊनियांमागें॥ नयेबोलोंतेंवाउगें॥ पुढी
लियाप्रसंगें॥ तुकाम्हणेजाणावें ॥ ४ ॥ ॥३४८०॥
कायजाणेंमीपामर ॥ पांडुरंगातुझापार ॥ धरलिया
धीर॥ काययेकनकरिसी ॥ १ ॥ उताविळझालोंआ
धीं॥ मतिमंदहीनबुद्धी॥ परीतूंकृपानिधि॥नाहींकेला
अव्हेर॥ २ ॥ तूंदेवाचाहिदेव ॥ सकळब्रह्मांडाचाजीव
आम्हादासाकीव॥ कांभाकणेंलागली ॥ ३ ॥ तुकाम्ह
णेविश्वंभरा॥ मीतोपतितचिखरा॥ अन्यायदूसरा
दारींधरणेंबैसला॥ ४॥ ॥३४८१॥
नव्हतीआलीसीसासुरी॥ अथवांघायपटीवरी ॥ तों
म्यांकेलाहरि॥ येव्हढातुम्हाआकांत॥ १ ॥ वांटिलासी
दोहींठाई॥ मजपासींआणिडोहीं॥लागोंदिल्हानाहीं॥
येथेतेथेआघात॥ २ ॥ जीवघेतीमायबापें ॥ थोड्या
अन्यायाच्याकोपें॥ हेंतोनव्हेसोपें॥ साहोंतोचिजाणि
तलें ॥ ३ ॥ तुकाम्हणेकृपावंता ॥ तुजऐसानाहींदाता॥
कायवानूंआतां॥ वाणीमाझीखुंटली॥ ४ ॥३४८२॥
तूंमाउलीहूनिमायाळ॥ चंद्राहुनीशीतळ॥ पाणीयाहु
निपातळ॥ तूंकल्होळप्रेमाचा ॥ १ ॥ देऊंकशाचीउप

मा ॥ दुजीतुजपुरुषोत्तमा ॥ वोवाळूनियांनामा ॥ तु
झ्यावरूनिटाकिलों ॥ २ ॥ तूंवाकेलेंरेअमृता॥गोडत्या
हिपरता॥ पांचांतत्वांचाजनिता॥ सकळसत्तानायका
॥ ३ ॥ कांहींनबोलोनिआतां ॥ उगाचचरणींठेवितों
माथा॥ तुकाम्हणेपंढरिनाथा॥क्षमाकरींअपराध॥४॥
॥३४८३॥

मीअवगुणीअन्यायी ॥ कितीम्हणोनिसांगोंकाई॥आ
तांमजपाईं ॥ ठावदेईंविठ्ठले ॥ १ ॥ पुरेपुरेहासंसार ॥ क
र्मबळवंतदुस्तर ॥ राहोंनेदीस्थिर ॥ येकेठाईंनिश्चळ ॥
॥ २॥ अनेकबुद्धीचेतरंग ॥ क्षणक्षणापालटेरंग ॥ धरूं
जातांसंग ॥ तंवतोहोतोबाधक॥३॥ तुकाम्हणेआतां॥
अवघीतोडींमाझीचिंता ॥ येउनिपंढरिनाथा॥वासक
रींह्रद्यीं ॥ ४ ॥ ॥३४८४॥

स्वामिनीं आपुल्या स्त्रीस उप
देश केला ते अभंग

पिकल्याशेताचाआम्हांदेतोवांटा ॥ चौधरीगोमटापां
डुरंग॥ १ ॥ सत्तरटकेबाकीउरलीमागतोहा ॥मागेंझड
लेंदाहाआजिवरी ॥ २ ॥ हांडाभांडींगुरेंदाखवीऐवज॥
माजघरींवाजेबैसलासे ॥ ३ ॥ मजयासीभांडतांजा
बनेदीबळें ॥ म्हणेयेकवेळेंघ्यालवांटा ॥ ४ ॥ तुकाम्ह
णेस्त्रीयेकायवोकरावें ॥ नेदितांलपावेंकायकोठें ॥ ५॥
॥३४८५॥

करितांविचारअवघेंयेकराज्य ॥ दुजाकोणमजघाली

पाठी ॥ १ ॥ कोण्यारीतीजावें आम्हीवोपळोनी ॥ मोक
ळेआंगणींमागेंपुढें ॥ २॥ कायतींगव्हानेंहिंडावींतींकि
ती ॥ दूततेलागतीयाचिपाठी ॥ ३॥ कोठेयाचीकरूंगेलों
कुळवाडी ॥ आतांहानसोडोजीवेंआम्हा ॥ ४॥ होऊनि
बेबाकतेथेंचिराहावें ॥ येईलतेंखावेंतुकाम्हणे ॥ ५ ॥
॥३४८६॥
नागऊनियेकेंनागवीचकेली ॥ फिरोनियांआलीनाहीं
येथें ॥ १ ॥ भेणेंस्तुतिकोणीनघेतीपालवी ॥ करूनियां
गोवीनिसंताना ॥ २॥ येकतींगोंविलीधरूनिजमान ॥
हासतीलजनलोकतया ॥ ३॥ सरलेतयांसीघालितोवैकुं
ठीं ॥ नसोडीहेसाठीझालीजीवें ॥ ४ ॥ तुकाम्हणेझालों
जाणोनिनेणता ॥ सांपडलोंहातायाचेआम्ही ॥ ५ ॥
॥३४८७॥
आतांतूंतयासहोईवोउदास ॥ आरंभिलानाशमाझ्या
जीवा ॥ १ ॥ मरूरहेझालेतुकाहानावडे ॥ उपासरोकडेये
तीआतां ॥ २ ॥ बरेंयातुझीयाजीवाचेंतेंकाय ॥ व्हावेंतें
हेंपाहेंविचारूनी ॥ ३॥ तुजमजतुटीनव्हेयाविचारा ॥ स
हितलेंकरांराहोंसुखें ॥ ४ ॥ तुकाम्हणेतरीतुझामाझासं
ग ॥ घडेलवियोगकधींनव्हे ॥ ५ ॥ ॥३४८८॥
कायकरूंआतांमाझियासंचिता ॥ तेणेंजिववीतासा
ठींकेली ॥ १ ॥ नम्हणावेंकोणीमाझेंहेंकरणें ॥ हुकुमतो
येणेंदेवेंकेला ॥ २ ॥ करूनिमोकळासोडिलोंभिकारी ॥
पुरविलीतरीपाठीमाझी ॥ ३ ॥ पाणियाभोंपळाजेवाव

यापानें॥ लाविलीहोयेणेंदेवें आम्हा॥४॥ तुकाम्हणे यासींनाहींहोकरुणा॥ आहेनागवणाठावामज॥५॥

॥३४८९॥

नकोधरूंआसह्मावेंयाबाळास॥ निर्माणतात्यासत्याचेआहे॥१॥ आपुलातोगळाघेईउगवूनी॥ चुकवीजाचणीगर्भवास॥२॥ ऐवजदेखोनिबांधतीलगळां॥ म्हणोनिनीराळापळतसें॥३॥ देखोनियांत्याचाअवघडमार॥ कांपेथरथरजीवमाझा॥४॥ तुकाम्हणेजरीआहेमाझीचाड॥ तरीकरीवाडचित्तआतां॥५॥

॥३४९०॥

भलेलोकतुजबहुमानवती॥ वाढलयाकीर्तिजगामाजी॥१॥म्हणेमेलींगुरेंभांडींनेलींचोरें॥नाहींतलेंकुरेंझालींमज॥२॥ आसनिरसुनिकठिणहेंमन॥ करीवोसमानवजनेंसें॥३॥ किंचितहेंसुखटाकीहोथुंकोनी॥ पावसीलधणीपरमानंद॥४॥ तुकाम्हणेथोरचुकतीसायास॥ भवबंधपाशतुटोनियां॥५॥ ॥३४९१॥

आईकेंहेंसुखहोईलदोघांसीं॥ सोहळेहेंऋषिकरितीदेव॥१॥ जडितविमानेंबैसवीतिमानें॥ गंधर्वांचेंगाणेंनामघोष॥२॥ संतमहंतसिद्धयेतीलसामोरे॥ सर्वसुखापुरेकोडतेथे॥३॥ आलिंगुनिलोळेत्याच्यापायांवरी॥ जाऊंतेथवरीमायबाप॥४॥ तुकाम्हणेतयासुखावर्णूकाय॥जेह्मांबापमायदेखोंडोळां॥५॥३४९२

देवपाहावयाकरींवोसायास॥ नधरींहेआसनाशवंत

॥ १॥ दिनशुद्धसोमसकळींपावला॥ द्वादशींघडलाप
र्वकाळ॥ २॥ द्विजापाचारूनिशुद्धकरींमन॥ देईंहोतूंदा
नयथाविधी ॥ ३॥ नकोंचिंताकरूंवस्त्रायापोटाची॥
माउलीआमुचीपांडुरंग ॥ ४॥ तुकाम्हणेदूरीसांगतों
पाल्हाळी॥ परितोजवळीआहेआम्हा॥ ५॥ ३४९३॥
सुखहेंनावडेआम्हाकोण्यावेळे॥ नेणसीआंधळेझाली
सतूं॥ १ ॥ भूकताहानकैसीराहिलीनिश्चळ॥ खुंटलेंच
पंळमनठाईं॥ २॥ द्रव्यजीवाहूनिआवडेयाजना॥ आ
म्हासीपाषाणाहूनिहीन॥ ३॥ सोईरेसज्जनजनआणी
वन॥ अवघेसमानकायगुणें ॥ ४॥ तुकाम्हणेआम्हा
जवळीचआहे॥ सुखदुःखसाहेपांडुरंग ॥५॥ ३४९४॥
गुरुरूपेंमजबोलविलेंदेवें ॥ होईलहेंघ्यावेंहितकाहीं॥
॥ १ ॥ सत्यदेवेंमाझाकेलाअंगीकार॥ आणिकविचा
रनाहींदुजा॥ २ ॥ होईबळकटघालुनियांकास॥ हाचि
उपदेशतुजआतां॥ ३॥ सडासंमार्जनतुळसीवृंदावन
अतीतपूजनब्राम्हणाचें ॥ ४ ॥ वैष्णवांचीदासीहोईं
सर्वभावें॥ मुखींनामघ्यावेंविठोबाचें॥ ५॥ पूर्णबोध
स्त्रीतभ्रतारसंवाद॥ धन्यजिहींवादआईकीला॥ ६॥ तु
काम्हणेआहेपांडुरंगकथा॥ तरेलजोचित्ताधरिलको
णी॥ ७॥ ॥ ३४९५॥
आनंदअद्वयनित्यनिरामय ॥ जेकांनित्यध्येययोगि
यांचें॥ १ ॥ तेंहेंसमचरणसाजिरेंविटेवरि॥ पहाभीमा
तीरींविठ्ठलरूप॥ २ ॥ पुराणासीवाडश्रुतीनेणतीपार॥

तेंझालेंसाकारपुंढलीका ॥ ३ ॥ तुकाम्हणेसंतमहंतते
ध्यांत ॥ आमुचेंदैवतपांडुरंग ॥४॥ ॥३४९६॥
संतकृपाझाली ॥ इमारतफळाआली ॥ १ ॥ ज्ञानदेवें
घातलापाया ॥ रचियेलेंदेवालया ॥ २॥ नामातयाचा
किंकर ॥ तेणेकेलाहाविस्तार ॥ ३ ॥ जनार्दनाचायेक
नाथ ॥ खांबदिल्हाभागवत ॥ ४ ॥ भजनकरासावका
श ॥ तुकाझालासेकळस ॥ ५ ॥ ॥३४९७॥
मीतवबैसलोंधरुनीयांआस ॥ नकरींउदासपांडुरंगा ॥
॥ १ ॥ नकोआतांमजदवडूंश्रीहरी ॥ मागायाभिकारी
आलोंदास ॥ २ ॥ भुकेलोंकृपेच्यावचनाकारणें ॥ आशा
नारायणेंपुरवावी ॥ ३ ॥ तुकाम्हणेयेवोनियांदेईभेटी ॥
कुर्वाळुनीपोटींधरींमज ॥ ४ ॥ ॥३४९८॥
आतांतुझेंनामगातअसेंगीतीं ॥ म्हणोनमानीतीलोक
मज ॥ १ ॥ अन्नवस्त्रचिंतानाहींयापोटाची ॥ वारिली
देहाचीथोरपीडा ॥ २ ॥ सज्जनसंबंधीतुटलीउपाधी ॥
रोकड्यायाबंदीसुटलोंसे ॥ ३ ॥ द्यावाघ्यावाकोणेकरा
वासायास ॥ वेगींआशापाशवारुनीयां ॥ ४ ॥ तुका
म्हणेतुजकळेलतेंआतां ॥ कराजीअनंतामायबापा ॥
॥ ५ ॥ ॥३४९९॥
कामक्रोधसुणेलावीयेलेंपाठी ॥ बहुतहिंपुटींझालोंदे
वा ॥ १ ॥ आवरितांतुझेतुजनावरती ॥ थोरवाटेचित्तीं
आश्चर्यहें ॥ २ ॥ तुझीयावीनोदेंआम्हाप्राणासाठीं ॥ भ
याभीतपोटींसदादुःखी ॥ ३ ॥ तुकाम्हणेमाझ्याकपाळा

चागुण ॥ तुजहांसेकोणसमर्थासी ॥ ४ ॥ ॥३५००॥
स्वमुखेंजीतुम्हीसांगामजसेवा ॥ ऐसेंमाझेंदेवामनो
गत ॥ १ ॥ नेघेआम्हीकांहींआपुलेंउदार ॥ चित्तींवित्त
घरजीवावरी ॥ २ ॥ बोलेपरस्परेंवाढवावेंसुख ॥ पा
हावेंश्रीमुखडोळेभरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेसत्यबोलतों
वचन ॥ करूनिचरणसाक्षतुझे ॥ ४ ॥ ॥ ३५०१ ॥
मजअनाथाकारणें ॥ करींयेणेंकेशवा ॥ १ ॥ जीवझु
रेतुजसाठीं ॥ पाठीपोटींपाहतसें ॥ २ ॥ चित्तरंगलेंचर
णीं ॥ तुजवांचुनीनराहे ॥ ३ ॥ तुकाम्हणेकृपावंता ॥
माझीचिंताअसावी ॥ ४ ॥ ॥ ३५०२ ॥
कासयावांचूनिझालोंभूमीभार ॥ तुझ्यापाईंथारनाहीं
तरी ॥ १ ॥ जातांभलेंकायडोळियांचेंकाम ॥ जवपुरु
षोत्तमनदेखती ॥ २ ॥ कायमुखापेवश्वापदांचेंधांव ॥
नित्यतुझेंनावनुच्चरीतां ॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांपांडुरंगा
वीण ॥ नवांचतांक्षणजीवभला ॥ ४ ॥ ॥३५०३॥
नकोमजताठानकोअभिमान ॥ तुजवीणक्षीणहो
तोजीव ॥ १ ॥ दुर्धरहेमायानहोयसुटिका ॥ वैकुंठना
यकासोडवींमज ॥ २ ॥ तुकाम्हणेतुझेंझालियादर्शन ॥
मगनिवारणहोईलसर्व ॥ ३ ॥ ॥ ३५०४ ॥
चालघराउभाराहेनारायणा ॥ ठेऊनिचरणावरिमाथा
॥ १ ॥ वेळोवेळांदेईक्षेमआलिंगन ॥ करींअवलोकनकृ
पादृष्टी ॥ २ ॥ कृपाळुदेपायवैसमाजघरीं ॥ चित्तस्थीरक
रींपांडुरंगा ॥ ३ ॥ आहेत्यासंचितेंकरवीनभोजन ॥ काय

नजेऊनकरिसीआतां ॥ ४ ॥ करुणाकरनाहींकळोंदि
ल्हेंवर्म ॥ दुरीहोताभ्रमकोणवारी ॥ ५ ॥ तुकाम्हणेआतां
आवडीच्यासत्ता ॥ बोलिलोंअनंताकरवीनतें ॥ ६ ॥
॥ ३५०५ ॥

देवाचीतेखूणआलीज्याच्याघरा ॥ त्याच्यापडेचिरासं
सारासीं ॥ १ ॥ देवाचीतेखूणकरावेंवाटोळें ॥ आपणावे
गळेंराहोंनेदी ॥ २ ॥ देवाचीतेखूणझालाज्यासींसंग ॥
त्याचाझालाभंगमनुष्यपणा ॥ ३ ॥ देवाचीतेखूणगुं
तोंनेदीआशा ॥ ममतेचाफांसाशिवोंनेदी ॥ ४ ॥ देवा
चीतेखूणगुंतोंनेदीवाचा ॥ लागोअसत्याचामळनेदी
॥ ५ ॥ पऱ्हादेवेंतेंचिबळकाविलेंस्थळ ॥ तुक्यापेंसकळ
चिन्हेंत्याचीं ॥ ६ ॥ ॥ ३५०६ ॥

अनंताच्यामुखेंहोसीलगाईला ॥ अमूपविठ्ठलादासतु
म्हा ॥ १ ॥ माझेंकोठेंआहेहोईलविचारा ॥ तरीचअव्हेरा
योग्यझालों ॥ २ ॥ सर्वकाळतुम्हीअसाजीसंपन्न ॥ च
तुरानारायणशिरोमणी ॥ ३ ॥ तुकाम्हणेऐसेकलियुगीं
चेजीव ॥ तरीनयेकीवबहुपापी ॥ ४ ॥ ॥ ३५०७ ॥

नकरावीचिंता ॥ भयनधरावेंसर्वथा ॥ १ ॥ दासासाह्य
नारायण ॥ होयरक्षिताआपण ॥ २ ॥ नलगेपरिहार ॥
कांहींयोजावेंउत्तर ॥ ३ ॥ नधरावीशंका ॥ नयेबोलों
म्हणेतुका ॥ ४ ॥ ॥ ३५०८ ॥

भांडवलमाझेंलटिक्याचेगांठीं ॥ उदमासीतुटीयावीऐ
सी ॥ १ ॥ ऐसीतुझीवाटपाहोंकोण्यातोंडें ॥ भोंवताली

भांडेगर्भवास ॥ २ ॥ चहुंखाणीचियारंगलोंसेरंगें ॥ सु
ष्टदुष्टअंगेंधरूनीयां ॥ ३ ॥ बहुतांचेबहुपालटलोंसाळे
बहुआलेकाळेरंगअंगा ॥ ४ ॥ उकलूनितयादावीतांअं
तर ॥ घडीचापदरसारोनियां ॥ ५ ॥ तुकाम्हणेआतांक
रींगोळेसाठीं ॥ आपुल्यापालटीसंगेंदेवा ॥ ६ ॥ ३५०९

संतसंगतींनकरावावास ॥ येखादागुणदोषयेईलअं
गा ॥ १ ॥ मगतयादोषानाहींपरिहार ॥ होयअपहार
सुकृतासी ॥ २ ॥ तुकाम्हणेनमस्कारावेंदुरून ॥ अंतरीं
धरूनराहेरूप ॥ ३ ॥ ॥ ३५१० ॥

जेंज्याचेंजेवण ॥ नेंचियाचकासीदान ॥ १ ॥ आतांजाऊं
चोजवीत ॥ जेथेवसतीलसंत ॥ २ ॥ होतींघालींपोटें ॥
मागेंउरलींउच्छिष्टें ॥ ३ ॥ तुकाम्हणेधांव ॥ पुढेंखुंटवीलहा
व ॥ ४ ॥ ॥ ३५११ ॥

धरावातोबरा ॥ ठाववसतीचाथारा ॥ १ ॥ निजवील्या
जागविती ॥ नीजपुरवोनिदेती ॥ २ ॥ येकवेवसाव ॥
त्याचासंगत्याचाजीव ॥ ३ ॥ हितेंकळेहित ॥ ग्वाहीये
कयेकाचित्त ॥ ४ ॥ विषमाचेंकांहीं ॥ आडतयायेकना
हीं ॥ ५ ॥ तुकाम्हणेबरी ॥ घरायेतीलत्यापरी ॥ ६ ॥
॥ ३५१२ ॥

त्याचियाचरणामाझेदंडवत ॥ ज्याचेंधनवित्तपांडुरंग
॥ १ ॥ येथेमाझाजीवपावलाविसावा ॥ म्हणवोनिहा
वाभरिलोंसे ॥ २ ॥ चरणीचेंरजलावीनकपाळीं ॥ जेंप
दराऊळींसोइंजाती ३ ॥ आणिकतेंभाग्ययेथेकुरवंडी ॥

करुनियांसांडीइंद्राऐसी ॥ ४॥ वैष्णवांचेघरींदेवाची वसती॥ विश्वासहाचित्तींसर्वभावें ॥ ५॥ तुकाम्हणेस खेहरिचेजेदास ॥ आतांपुढेंआसदुजीनाहीं ॥ ६॥

॥३५१३॥

धोंड्यासवेंआदळितांफुटेडोकें ॥ तोंतोंत्याच्यादुःखेंघा मजेना ॥ १ ॥ इंगळासीसन्निधानआतित्याही॥ क्षेम देतांकांहींसुखवाटे॥ २॥ सप्रेमेंकुर्वाळीमहाफणीव्या ळ॥ आपुलीतोढाळसांडीकेवी॥३॥ तुकाम्हणेआम्हा सवेंजोरुसला ॥ तयासीअबोलाआकाशासी॥ ४॥

॥३५१४॥

आतांतळमळ॥ केलीपाहिजेशीतळ॥ १ ॥ पाहाकरी लतेंदेव॥ पाईंठेवोनियांभाव॥ २॥ तोचीअन्नदाता॥ नाहींआणिकाचीसत्ता ॥ ३ ॥ तुकाम्हणेदासा॥ नुपे क्षीहाभरवसा॥ ४॥

॥३५१५॥

लांबधांवेपायचोरी ॥ भरोवरीजनाच्या॥ १ ॥ आतां कैसेंहोययाचें॥ सिजतांकाचेंराहिलें॥ २॥ खायवोकी वेळोंवेळां॥ कैसीकळाराहेल ॥ ३॥ तुकाम्हणेभावही न॥ त्याचाशीणपांचवा॥ ४॥

॥३५१६॥

माझ्याइंद्रियांसीलागलेंभांडण ॥ म्हणतीकांनररस नाघाली॥ १॥करितीतळमळहस्तपादभाळ॥नेत्रांसी दुकाळपडिलाथोर॥ २ ॥ गुणगायमुखआयकतीका न॥आमुचेंकारणतैसेंनव्हे॥ ३॥ दरुशनेंफिटेनेत्रांचा तोपांग॥जेथेंज्यांचाभागघेतीलते॥४॥ तुकाम्हणेऐसें

करींनारायणा ॥ माझीहीवासनाऐसीआहे ॥ ५ ॥

॥३५१७॥

सिद्धीचादासनव्हेश्रुतीचाअंकिला ॥ होईनविठ्ठलादासतूझा ॥ १ ॥ सर्वसुखआहेमाझियामानसीं ॥ राहिलें तयासीनाशनाहीं ॥ २॥ तेणेंपुण्यपापनदेखेंलोचनीं॥ आणिकावांचूनिपांडुरंगा ३॥ नधरींमीआससाधीन सायास॥भक्तिप्रेमरसावांचूनियां, ४॥गर्भवासींदुःख नाहींयेतांजातां॥ ह्दईअसतांनामतुझें॥ ५॥ तुकाम्हणेतुझाहोईनअंकिला ॥ नभेंमींविठ्ठलाकळिकाळासी ॥ ६॥

॥ ३५१८

जन्मासीयेऊनितयालाभझाला॥ बिडवईभेटलापांडुरंग॥ १ ॥ संवसारदुःखेंनाशियेलींतेणें ॥ उत्तमहेंकेणेनामघोष॥ २॥ धन्यतेचिसंतसिद्धमहानुभाव॥ पंढरीचाठावटाकियेला॥ ३॥ प्रेमदातेतेंचिपतितपावन ॥ धन्यदरुशनहोयत्यांचें॥ ४॥ पावंठणियापंथेंजाहालीयासिद्धी॥ वोळंगेसमाधिसायुज्यता॥५॥ प्रेमआराणुकनाहींभयधाक॥ मजतेणेंसुखकायचिंता॥ ६॥ दुर्लभजडजीवउद्धारलोकांसी ॥ तुकाम्हणेत्यासीदरुशनें॥ ७॥

॥ ३५१९॥

कायदिवसगेलेअवघेचिवराडें ॥ तेंआलेंसांकडेंकथेमाजी॥ १ ॥ क्षणयेकठाईमनस्थीरनाहीं ॥ आराणूककईहोईलपुढें॥ २ ॥ कथेचाविसरदोषामुळेंहोय ॥ तरणउपायकैंचामग ॥ ३॥ कायसाचऊनिउरलें

तेंमागें॥ घटिकायेकसंगेंकायगेलें॥ ४ ॥ तेच्चिवाणी येथेकराउजळणी॥ काढावींमथुनिशब्दरत्नें॥ ५ तुका म्हणेहेंचिबोलावयाचाड ॥ नामघेतांगोडहीतअसे॥ ॥ ६ ॥ ॥ ३५२० ॥

शुद्धाशुद्धनिवडेकैसें॥ चर्ममांसभिन्ननाहीं ॥ १ ॥ कांहींअधिकनाहींउणें॥ कवण्यागुणेंदेवासी॥ २ ॥उदक भिन्नअसेकाई॥ वोहळवावीसरतानई ॥ ३ ॥ सूर्यतेजेंनिवडेकाय॥ रश्मीरसाळसकळखाय ॥ ४ ॥ वर्णा भिन्नदुधानाहीं॥ सकळागाईसारिखें॥५॥करितांभिन्ननाहींमाती॥ मडक्यागतीभिन्ननावें॥ ६ ॥ वर्तेयेकविधअग्नि॥ नाहींमनींशुद्धाशुद्ध॥७॥ तुकापात्रचाड किंवाविषअम्रतगोड॥ ८ ॥ ॥ ३५२१ ॥

नधरीप्रतिष्ठाकोणाचीहीयम॥म्हणतांकारेरामलाजा झणी॥ १ ॥ सांपडेहातींचेंसोडवीलकाळा ॥ तोकांवेळोवेळांनयेवाचे॥ २ ॥ कोणलोकजोहासुटलातोयेक॥गेलेकुंभीपाकरौरवांत॥ ३ ॥ तुकाम्हणेतोम्हणावा विठ्ठल॥ नम्हणेतोभोगीलकळेलतें॥४॥ ॥३५२२॥

म्हणवितांहरिनम्हणेतयाला ॥ दरवडापडिलादेहामाजी॥ १ ॥ आयुष्यधनत्याचेंनेलेंयमदूतीं ॥ भुलविला निश्चतीकामारंगे॥ २॥ नावडतीकथादेउळासीजातां प्रियधनसुतालक्षतेथे ॥ ३ ॥ कोणनेतोतयाघटिका दिवसयेका॥ कारेम्हणेतुकानागवीसी॥४॥३५२३॥

कथेबैसोनीसादरें ॥ सुखचर्चापरस्परें॥ नवलकाय

तोउद्धारें ॥ आणिकतरेसुगंधें ॥ १ ॥ पुण्यघ्यावेंरेफुका
चें ॥ पापदुष्टवासनेचें ॥ पेरित्याबीजाचें ॥ फळघेइंशे
वटी ॥ २ ॥ कथाविरसपाडिआळस ॥ छळणकरुनि
मोडीरस ॥ बुडवीआपणासरिसें ॥ विटाळसेनावेसी
॥ ३ ॥ सज्जनचंदनाचियेपरी ॥ दुर्जनदेशत्यागेंदुरि ॥
राहोम्हणेहरि ॥ विनंतीकरीतुकाहे ॥ ४ ॥ ॥ ३५२४ ॥
कळोंआलेंतुझेंजिणे ॥ देवातूंमाझेपोषणे ॥ १ ॥ वाट
पाहासीआमुची ॥ सत्तासंतांतकैसी ॥ २ ॥ बोलावितां
यावेंरूपा ॥ सदानिर्गुणींचलपा ॥ ३ ॥ तुकाम्हणेतूंपर
देशी ॥ येथेआम्हाअंगेंजिसी ॥ ४ ॥ ॥ ३५२५ ॥
आतांयेथेलाजेनाहींतुझेंकाम ॥ जायमजरामआठऊं
दे ॥ १ ॥ तुझेभांडेमाझेंबहुझालेघात ॥ केलोंयाअंकित
दुर्जनांचा ॥ २ ॥ माझेंकेलेंमजपारखेंमाहेर ॥ नष्टतूं
साचारचालविले ॥ ३ ॥ सुखासाठींयेकवाहियलेरवां
दी ॥ तेणबहुमांदीमेळवीली ॥ ४ ॥ केलाचौघाचारने
लोंपाचांमधीं ॥ नाहींदिल्हीशुद्धी धरूंआशा ॥ ५ ॥ तु
काम्हणेआतांघेईनकाठीवरी ॥ धणीम्यांकैवारीकेला
देव ॥ ६ ॥ ॥ ३५२६ ॥
आजवरीहोतोंतुझेसत्तेखालीं ॥ तोंवरीत्वांकेलीविटंब
णा ॥ १ ॥ आतांतुजराहोंनेदीयादेशांत ॥ तैसाम्यांसम
र्थकेलाधणी ॥ २ ॥ सापरीगकेलाकोठेंबाळपणीं ॥ हो
तीसीपापीणीकायजाणों ॥ ३ ॥ तुकाम्हणेहाम्यांबुड
वीलावेव्हार ॥ तुझेंचिढोंपरसोलावया ॥ ४ ॥ ३५२७ ॥

वेदाच्यानिरोपेंपिटीतोंडांगोरा ॥ लाजेनकाथारादेऊं
कोण्ही ॥ १ ॥ मोडीलेरांडेनेंसुपंथमारग ॥ चालविलें
जगयमपंथें ॥ २ ॥ परिचारींकेलीआपुलीचरूढी ॥ पोटीं
चीतेकुडीठावीनाहीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेआणाराउळाधरू
नी ॥ फजीतकरूनिसोडूंमग ॥ ४ ॥ ॥ ३५२८ ॥
कांरेतुम्हीनिर्मळहरिगुणगाना ॥ नाचतआनंदरूपेंवै
कुंठासीजाना ॥ १ ॥ कायगणिकेच्यायातीअधिकारमो
ठा ॥ दोषीअजामिळऐसेनेलेवैकुंठा ॥ २ ॥ ऐसीमागेंने
णोंकितीअनंतअपार ॥ पंचमहादोषीपातकानाहींपार
॥ ३ ॥ पुत्राचियालोभेंनष्टम्हणेनारायण ॥ कोणतेंकर्त
व्यतुकाम्हणेत्याचेंपुण्य ॥ ४ ॥ ॥ ३५२९ ॥
बैसोनियांखाऊंजोडी ॥ वोढावोढीचुकऊनी ॥ १ ॥ ऐ
सेंकेलेंनारायणें ॥ बरवेंजाणेसुखाचें ॥ २ ॥ घरींच्या
घरींभांडवल ॥ नलगेबोलवेंचावे ॥ ३ ॥ तुकाम्हणेआ
टाआटी ॥ चुकलीदाटीसकळ ॥ ४ ॥ ॥ ३५३० ॥
नाहींभ्यालोंतरीपळालोंयाठायां ॥ तुम्हीआळवायाज
वळीक ॥ १ ॥ सत्तावळेंआतांमागेनभोजन ॥ केलें
तेंचिंतनआजिवरी ॥ २ ॥ नवनीतासाठींखादलाहाजी
व ॥ थोड्यासाठींकीवकोणकरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेताकनल
गेहेंघाटे ॥ पांडुरंगखोटेंचाळवणें ॥ ४ ॥ ॥ ३५३१ ॥
सारीनतेआतांयेकाचीभोजनें ॥ वारीनमागणेंवेळोवे
ळां ॥ १ ॥ शेवटींचाघांसगोडकरीमाते ॥ अगेकृपावं
तेपांडुरंगे ॥ २ ॥ वंचूनयेआतांकांहींचप्रकार ॥ धाक

ल्याचेथोरझाल्यावरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांबहुचाळ
वावें॥ कांहींनेदीठावेंउरोंमागें ॥ ४ ॥ ॥ ३५३२ ॥
पोटधालेंमगनलगेपंगती ॥ झालीयानिश्चिंतीखेळगो
ड ॥ १ ॥ आपुलीयाहातेंदेईवोकवळ ॥ विठ्ठलशीतळ
जीवनवरी ॥ २ ॥ घराचाविसरहोईलआनंदें ॥ नाचेन
मीछंदेंप्रेमाचीया ॥ ३ ॥ तुकाम्हणेतोचिकरीकरकर ॥
मगघेउत्तरखंडईल ॥ ४ ॥ ॥ ३५३३ ॥
बोलसीलतरी ॥ तुझ्यायेईनउत्तरीं ॥ १ ॥ कांहींकोडकौ
तुकें ॥ हातींद्यावयाभातुकें ॥ २ ॥ बोलविसीतैसें ॥ करी
नसेवनसरिसें ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा ॥ माझेंचळणतुज
सेवा ॥ ४ ॥ ॥ ३५३४ ॥
दिल्हाजीवभाव ॥ तेव्हांसांडिलाम्यांठाव ॥ १ ॥ आतां
वर्तेतुझीसत्ता ॥ येथेसकळअनंता ॥ २ ॥ माझीयाम
रणें ॥ तुम्हीवसविलेंगणें ॥ ३ ॥ तुकाम्हणेकांहीं ॥ मीहें
माझेंयेथेंनाहीं ॥ ४ ॥ ॥ ३५३५ ॥
येकाचियेवेठी ॥ सांपडलोंफुकासाठीं ॥ १ ॥ घेतोंका
मसत्ताबळें ॥ माझेंकरूनिभेंडोळें ॥ २ ॥ धांवेमागेंमा
गें ॥ जायतिकडेचालतलागे ॥ ३ ॥ तुकाम्हणेनेलें ॥
माझेंसर्वस्वविठ्ठलें ॥ ४ ॥ ॥ ३५३६ ॥
आतांद्यावेंअभयदान ॥ जीवनहेरूपेचे ॥ १ ॥ उभारा
होनिबाहोंदेवा ॥ हातठेवामस्तकीं ॥ २ ॥ नाभीनाभी
याउत्तरें ॥ करुणाकरेंशांतविजे ॥ ३ ॥ तुकाम्हणेकेली
आस ॥ तोहादिवसफळाचा ॥ ४ ॥ ॥ ३५३७ ॥

बराडियाचीआवडीपुरे ॥ जयाझुरेसाठींते ॥ १ ॥ तैसें
झालेंमाझ्यामना ॥ नुठीचरणावरूनि ॥ २ ॥ भागलि
यापेणेंपावें ॥ तिसावेनटाकणी ॥ ३ ॥ तुकाम्हणेछा
याभेटे ॥ बरेंवाटेतापेल्या ॥ ४ ॥ ॥ ३५३८ ॥
बहुजन्माचासोसकेला ॥ त्याचाझालापरिणाम ॥ १ ॥
विठ्ठलसेनामकंठीं ॥ आवडीपोटींसंचिते ॥ २ ॥ येथु
नितेथवरीआतां ॥ नलगेचिंताकरावी ॥ ३ ॥ तुकाम्ह
णेधालेंमन ॥ हेंचिदानशकुनाचें ॥ ४ ॥ ॥ ३५३९ ॥
उसंतील्याकर्मवाटा ॥ बहुमोठाआघात ॥ १ ॥ शीघ्रया
वेंशीघ्रयावें ॥ हातींन्यावेंधरूनी ॥ २ ॥ भागलोंयाखट
पटे ॥ घटपटेंकरितां ॥ ३ ॥ तुकाम्हणेकृपावंता ॥ माझी
चिंतानिरसावी ॥ ४ ॥ ॥ ३५४० ॥
तुम्हासीहेंअवघेंठावें ॥ कितीद्यावेंस्मरण ॥ १ ॥ कांबा
तुम्हीऐसेंनेणा ॥ निष्ठुरपणेंटाळितसे ॥ २ ॥ आळवितों
मायबापा ॥ नयेकृपा आझुनि ॥ ३ ॥ तुकाम्हणेजग
दिशा ॥ कायअसानिजले ॥ ४ ॥ ॥ ३५४१ ॥
नेलेंसळेबळें ॥ चित्तचित्ताचेंगांठोळे ॥ १ ॥ सात्यझाली
घरीच्याघरीं ॥ होतोंठाईंचीकुठारी ॥ २ ॥ पातलोंयाभा
वा ॥ कपटतेंनेणेंदेवा ॥ ३ ॥ तुकाम्हणेउघडेंकेलें ॥ मा
झेंमाझ्याहातेंनेलें ॥ ४ ॥ ॥ ३५४२ ॥
जाहालाडांगोरा ॥ मुखींलहानहिथोरा ॥ १ ॥ नागवि
लेजनाचारी ॥ कोण्हीबैसोनेदीद्वारीं ॥ २ ॥ संचिताचा
ठेवा ॥ आतांआलातैसाघ्यावा ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवें ॥

केलेंआतांहेंबरवें ॥ ४ ॥ ॥३५४३॥
कितीचौघाचारें ॥ येथेंगोवीलेंवेव्हारें ॥ १ ॥ ऐसेबांध
वीलेगळे॥ होऊंनशकतीनिराळे ॥ २ ॥ आपुलेंआप
ण ॥ केलेंकांनाहींजतन ॥ ३ ॥ तुकाम्हणेखंडदंडे ॥ येर
झारीलपतीलंडे ॥ ४ ॥ ॥ ३५४४ ॥
पांडुरंगासारिखासांडूनीवेव्हारा ॥ आणिकाच्चिकरा
आसवायां ॥ १ ॥ बहुतांदिधलाउद्धारउदारे ॥ निवडि
तांखरेंखोटेंकांहीं ॥ २ ॥ याचियाअंकितावैकुंठबंदर॥
आणिकवेव्हारचालतीना ॥ ३ ॥ तुकाम्हणेमाझेहातीं
चेंवजन ॥ यासीबोलकोणठेऊंशके ॥ ४ ॥ ३५४५ ॥
ठेवूनीविमानराहिलोंचरणीं॥म्हणऊनीधनीकृपाकरी
॥१॥ आम्हासीभांडारकरणेजतन ॥ आलागेलाकोण
उंचनिंच ॥ २ ॥ करूनीसांभाळीराहिलोंनिराळा॥येक
येकवेळाआज्ञाकेली ॥ ३॥ तुकाम्हणयोग्यायोग्यहेंवि
नीत ॥ देवानाहींचित्तयेथेंदेणें ॥ ४ ॥ ॥३५४६॥
आतांनव्हेगोडकरितासंसार ॥ आणिकसंचारझाला
माजी॥ १ ॥ ब्रह्मरसेंगेलेंभरूनियांअंग ॥ आधीलतो
रंगपालटला ॥ २ ॥ रसनेचियेरुचीकंठींनारायण ॥ बै
सोनियांमननिववीलें ॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांबैसलों
टाकणी ॥ इच्छेचींतेधणीपुरईल ॥ ४ ॥ ॥ ३५४७॥
आतांकशासाठींदूरी॥ अंतरउरीराखीली ॥ १ ॥ करी
लवकरीमुळा ॥ राहाणेतळमुळिचिया ॥ २ ॥ दोहींठाई
उद्योगवाणे ॥ दरुशनेंनिभ्रिंती ॥ ३॥तुकाम्हणेवेगव्हा

वा॥ ऐसीजीवाउत्कंठा॥ ४॥ ॥ ३५४८॥

पडिलीहिरुढीजगापरिहार॥ चालवितीवेव्हारसत्यम्ह
णूं॥ १॥ मरणाचीकांहींनाहींआठवण॥संचिताचेंधन
लाभहेवा॥ २॥देहाचेंभयतेंकाळाचेंभातुकें॥ग्रासुनितें
येकेंठेविलेंसे॥ ३॥ तुकाम्हणेकांहींउघडारेडोळे॥ जा
णोनिआंधळेहोऊंनका॥ ४॥ ॥ ३५४९॥

हितनाहींठावेंजननीजनका ॥ दावीलालौकिकाचार
तिहीं॥ १॥ नधरावीचालीकरावाविचार॥ वरीलआ
हारगळींलावी ॥ २ ॥ आंधळ्याचेकाठिलागलेआंध
ळे॥ घांतयेकवेळेपुढेंमागें॥ ३॥ तुकाम्हणेकेलानिवा
डरोकडा॥ राउतहाघोडाहातोहातीं॥ ४ ॥ ३५५०॥

जेथेपाहेतेथेकांडितीभूस ॥ चिपाडेंचोखुनीपाहातीर
स॥ १॥ कायसांगोंदेवाभुललेजीव॥बहुयाचीयेतसे
कीव॥ २ ॥ वैकुंठीचेमोटळ्लेटिकेचिफुगे ॥ पेणिया
जाऊनीभीक्षामागे॥ ३॥ तुकाम्हणेकांउगेचिखोल॥
जवळीदाखवीआपणाबोल॥ ४॥ ॥ ३५५१॥

जाणिवेच्याभारेंचेपलासेउर॥सदाबुरबुरसेरेचिना॥ १
कितीयाचेबोलआइकावेकानीं॥मारिलेतेघणींनाळे
करी॥ २॥ मिठेवीणकायअळणीहेबोल॥ कोरडीचफो
लघसघस॥ ३॥ तुकाम्हणेडेंगानकळेचिहित॥ कितीहें
फजितकरूंतरी॥ ४॥ ॥ ३५५२॥

अनुतापयुक्तगेलीयाअभिमान॥ विसरूंवचनमागि
लाचें॥ १॥ त्याचेपायमाझेलागोतकपाळीं॥भोगें

उष्टावळीधर्म्यकाळ ॥ २ ॥ षडऊर्मीजिहींहाणितल्या
लाता ॥ शरणयासंतां आल्यावेगीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेज्या
तीवोळेलवकरी ॥ ठाईंचीअंतरींशुद्धहोती ॥ ४ ॥ ३५५३
खोलवोलींपडेतेंपीकउत्तम ॥ उथळाचाश्रमवायांजा
य ॥ १ ॥ लटिक्याचेआम्हीनव्हेंसांठेकरी ॥ थीतेघाली
भरीपदरींचे ॥ २ ॥ कोणाइहलोकींपाहिजेपसारा ॥ दं
भपोटभरायाचेचाडे ॥ ३ ॥ तुकाम्हणेकसीआगीजेउत
रे ॥ तेचियेथेसरेजातिशुद्ध ॥ ४ ॥ ॥ ३५५४ ॥
गोमट्याबीजाचींफळेंहिगोमटीं ॥ बात्यतेंचिपोटींसम
तुक ॥ १ ॥ जातितीच्यासंतोषेंचित्तासीविश्रांती ॥ परतो
नीमागुतीफिरेंनेणे ॥ २ ॥ खऱ्याचेपारखीयेतनाहींतो
टा ॥ निवडेतोखोटाटाळेदूरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेमजसत्या
चीआवडी ॥ करितांतातडीयेतनाहीं ॥ ४ ॥ ३५५५ ॥
मनझालेंभाट ॥ कीर्तिमुखेंघडघडाट ॥ पडियेलीवाट ॥
येचिचालीस्वभावें ॥ १ ॥ बोलेदेवाचेपवाडे ॥ नित्यन
वेचिरोकडे ॥ ज्यापरीआवडे ॥ तैसातैसाकरूनी ॥ २ ॥
रोखींलावावेसमोर ॥ पुढेंमागेंचालेभार ॥ करावेंउत्त
र ॥ सेवारुजूकरूनी ॥ ३ ॥ पुरवलादेकारें ॥ संतोषा
च्याअभयकरें ॥ अंगींच्याउत्तरें ॥ तुक्यास्वामीश्रृंगारी
॥ ४ ॥ ॥ ३५५६ ॥
दूरीतोचिहोतोंआपुल्याआशंकें ॥ नव्हतेठाऊकेमूळभे
द ॥ १ ॥ आतांजेथेंतेथेंहोईनसांगाते ॥ लपायापुरतेरा
होंनेदी ॥ २ ॥ मिथ्यामोहोमजलाविलाउशीर ॥ तरीहें

अंतरझालेंहोतें ॥ ३ ॥ तुकाम्हणेकांरेंदाखविसीभिन्न॥
लटिकाचीशीणलपंडाई ॥ ४ ॥ ॥३५५७॥
कळोंनयेतोचिचुकविताबेरें ॥ मगपाठमोरेंकायेका
ज॥ १ ॥ धरिलेतिआतांघाजीमाझाडाव ॥ सांपडला
भावऐसाआहे ॥२॥ होतासीअंतरेंझांकीलियाडोळी॥
तोचिमीन्याहाळींभरुनीदृष्टी ॥ ३ ॥ तुकाम्हणेतुजरडी
चीचखोडी॥ आहाचवराडीतोमीनव्हे ॥ ४॥३५५८॥
विश्वासतोदेव॥ म्हणूनीधरियेलाभाव ॥ १ ॥ माझीव
दवितोवाणी॥ ज्यानेंधरिलीधरणी ॥ २ ॥ जोडिलींअ
क्षरें॥ नव्हतीबुद्धीच्याविचारें॥ ३ ॥ नाहींकेलीआटी॥
कांहींमानदंभासाठीं॥ ४ ॥ कोणीभाग्यवंत ॥ तयाफ
ळेहेंउचित॥५॥तुकाम्हणेक्षरा॥ आहेमूळींचाचीखरा॥
॥ ६ ॥ ॥३५५९॥
सुराणीचीझालोंलाडकींयेकलीं ॥ वडीलधाकूलींआ
म्हीदेवा॥१॥म्हणऊनीकांहींनघडेअव्हेर॥गोमटेंउत्तर
भातुकेंही ॥ २ ॥ कांहींएकनाहींवंचिलेंवेगळें॥ मुळीं
चियामूळेंस्थिरावले॥ ३ ॥ लेवविलींअंगींआपलींभू
षणें॥ अलंकारलेणेंसकळही॥ ४ ॥ सारितांनसरेअमु
पभांडार ॥ धनाअंतपारनाहींलेखा ॥ ५ ॥ तुकाम्हणे
आम्हीआळऊंआवडी ॥ म्हणऊनीजोडीदाखविली
॥ ६ ॥ ॥३५६०॥
येकवेळेकेलेंरितेंकलेवर॥ आतांदिल्हीथारपांडुरंगा ॥
॥ १ ॥ पाळणपोषणलागलेतेसोई ॥ देहाचेतेकाईसर्व

भाव ॥ २ ॥ माझीयामरणेंझालींहेवसती ॥ लागलीते
ज्योतीअविनाश ॥ ३ ॥ झालाऐसायेकाघाययेथेंना
हीं ॥ तुकाऐसेंकांहींबोलोंनये ॥ ४ ॥ ॥ ३५६१ ॥
पावतोताडण ॥ जरीहेमोकलीतेजन ॥ १ ॥ मगमीआ
ठवितोंदुःखें ॥ देवासावकाशमुखें ॥ २ ॥ होतीअप्रति
ष्ठा ॥ होतोवरपराकष्ठा ॥ ३ ॥ तुकाम्हणेमान ॥ होता
उत्तमखंडण ॥ ४ ॥ ॥ ३५६२ ॥
धरावेंतेंभय ॥ अंतरोनीजातीपाय ॥ १ ॥ झाल्यातुटी
देवासवें ॥ कायवांचोनीकरावें ॥ २ ॥ कोणासीपारि
खें ॥ लेखूंआपणासारीखें ॥ ३ ॥ तुकाम्हणेअसो ॥ अ
थवाहेआतांनसो ॥ ४ ॥ ॥ ३५६३ ॥
आनंदाचाथारा ॥ सुखेंमोहरलाझरा ॥ १ ॥ ऐसीप्रभु
चीज्याकळा ॥ त्याच्याकोणपाहेबळा ॥ २ ॥ अंकीतऐ
सया ॥ होईलपाववीलेठायां ॥ ३ ॥ तुकाम्हणेऐसें ॥ दि
ल्हेंअभंडप्रकाशें ॥ ४ ॥ ॥ ३५६४ ॥
आम्हासीसांगाती ॥ होतीआरालेतेहोती ॥ १ ॥ येतीआ
ईकतांहाक ॥ दोनमीळोनम्हणतीयेक ॥ २ ॥ आणिकाउ
त्तरीं ॥ नसेगोवीलीवैखरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेबोला ॥ खु
णपाहातीविठ्ठला ॥ ४ ॥ ३५६५ ॥
कांहेलकडाघासकढाये ॥ खोदहिजुमीनमटवनाय ॥
॥ १ ॥ देवलवासीतरवरछाया ॥ घरघरमाईखपबर
माया ॥ २ ॥ कांछांडीयभारफेरसिरभागे ॥ मायाको
दुःखमीटलीयअंगे ॥ ३ ॥ कहेतुकातुमसुनहोसिद्धा ॥

रामबीनाऔरझुटाकछुधंदा॥ ४॥ ॥३५६६॥
आणिकपाखांडेंअसतीउदंडें ॥ तळमळीतीपीडेंआपु
लीया॥ १ ॥त्यांचीयाबोलाचानाहींहाविश्वास ॥ घा
तलीसेकासतुझ्यानामीं ॥ २ ॥ दृढयेकचित्तेंझालोंया
जीवासी ॥ लाजसर्वविसींतुम्हासीहे॥ ३॥ पीडोंनेदी
पशुआपुलेअंकित ॥ आहेजेंउचित्ततैसेंकरा ॥ ४ ॥ तु
काम्हणेकितीभाकावीकरुणा ॥ कोपनारायणायेईल
तुम्हा॥ ५॥ ॥ ३५६७॥
व्हावयाभिकारीहेंचिआम्हाकारण ॥ अंतरुनीजनजा
वेंदूरीं॥१॥ समंधुतुटावाशब्दाचाहिस्पर्श॥ म्हणऊनी
आसमोकलीली॥ २॥ तुकाम्हणेदुःखेंउबगलाजीव॥
म्हणऊनीकीवभाकीदेवा॥ ३॥ ॥ ३५६८॥
कोरडियाऐशाकायसारूंगोष्टी॥ करींउठाउठीहितआ
धीं॥१॥ खोळंबलाराहेआपुलामारग॥पाहावीतीमग
तुटीकोठें ॥ २॥ लौकिकाचाआडयेईलपसारा॥ मग
येरझारादुःखदेती ॥ ३॥ तुकाम्हणेडांखलागेअळंका
रें॥ मगनव्हेखरेंपुटेवीण॥ ४॥ ॥ ३५६९॥
ऐसेंठावेंनाहींमूढा॥ सोसकाकुलतीपुढा ॥ १ ॥ माझी
नकाजाळूंभांडीं॥ पोटींभयसोसतोंडीं॥२॥ पाहातील
यांकाळ॥ तेव्हांकायचालेबळ॥३॥ संचितातेकरी॥ न
रकाजायमेल्यावरी॥ ४॥ परउपकार॥नघडावाहावि
चार॥ ५ तुकाम्हणेलासी॥ आतांभेटोंनयेऐसी॥ ६॥
॥३५७०॥

करूनीचिंतनखेळेंभोवतालें ॥ चित्तयेथेंआलेंपायांपा
सीं ॥ १ ॥ येथेंनाहींखोटाचालतपरिहार ॥ जाणसीअं
तरपांडुरंगा ॥ २ ॥ सुखदु.खेंतुजदेऊनीसकळ ॥ नाहीं
ऐसाकाळकेलाआम्ही॥३॥ तुकाम्हणेझालादेहाचावि
सर ॥ आतांआपपरनाहींदोन्ही ॥ ४ ॥ ॥ ३५७१ ॥
करूनीयांशुद्धमन ॥ नारायणस्मरावा ॥ १ ॥ तरीचहा
तरीजेंसिधु ॥ भवबंधुतोडुनीयां ॥ २ ॥ येथेंसरेशुद्धसा
चें ॥ अंतरींचेंबीजतें ॥ ३ ॥ तुकाम्हणेलवणकळी ॥ प
डतांजळींतेंहोय ॥ ४ ॥ ॥ ३५७२ ॥
काळाचेसारिखींवाहातीनक्षत्रें ॥ करितांदुसरेंफळना
हीं ॥ १ ॥ ऐसेंकरत्यानेंठेविलेंकरून ॥ भरिलेंभरुनमा
पनेमें ॥ २ ॥ शीतउष्णकाळींमेघवरुषाव ॥ वरुषतां
वावहोयशीण ॥ ३ ॥ तुकाम्हणेविषअमृताचेकिडे ॥
पालटनघडेजिणेंतया ॥ ४ ॥ ॥ ३५७३ ॥
बोलणेंतेंआम्हीबोलोंउपयोगीं ॥ पडिलेप्रसंगींकळेऐ
सें ॥ १ ॥ जयामध्येंदेवआदिमध्यअंतीं ॥ खोलपायां
भींतिनखचेते ॥ २ ॥ करणेंतेंआम्हीकरूंयेकवेळे ॥ पुढि
लीयाबळेंवाढीखुंट ॥ ३ ॥ तुकाम्हणेअसेंआज्ञेचींधार
कें ॥ म्हणऊनीयेकेबोलेंसारूं ॥ ४ ॥ ॥ ३५७४ ॥
तुझीयाविनोदेंआम्हासीमरण ॥ सोसीयेलाशीणबहु
फेरे ॥ १ ॥ आतांआपणचियेसीतेंकरीन ॥ नामहेंधरी
नतुझेंकंठीं ॥ २ ॥ वियोगेंचिआलोंउसंतीतवनें ॥ संक
ल्पेंहेंमनेंवाहोनीयां ॥ ३ ॥ तुकाम्हणेवर्मसांपडलेंसोपें ॥

गोवीयेलोंपापेंपुण्येंहोतों ॥ ४॥ ॥३५७५॥

पाठिलागाकाळयेतसेयालागे ॥ मीमाझेंवाउगेंमध्यें ऐसें ॥ १ ॥ आतांआगीलागोऐसीयावेव्हारा ॥ तूंमाझासोयरापांडुरंगा ॥ २ ॥ वागविलामाथांनसतांचिभार ॥ नव्हेतेसाचारदेखिलेतो ॥ ३ ॥ तुकाम्हणेकेलेजवळीलदूरी ॥ मृगजळवरीआडआलें ॥४॥३५७६॥

आपुलीयेटाकी॥करीनकांहींतरीयेकी ॥ १ ॥ करीनपायांसीवोळखी ॥ करीसीतेकरीसुखी ॥ २ ॥ कायक्लेशगंगाजळ ॥ समर्पूनतुळसीदळ ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा॥ करजोडीनतेसेवा ॥ ४ ॥ ॥३५७७॥

माझेतोंस्वभावमजअनावर ॥ तुजहीदेतांभारकांहींनव्हे ॥ १ ॥ ऐसेंकळोंआलेंमजनारायणा ॥ जागृतिस्वप्नाताळनाहीं ॥ २ ॥ संपादितोंतोहाअवघाबाह्यरंग ॥ तुझानाहींसंगअभ्यंतरीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेसत्यानाहींपाठीपोट ॥ आहेतेंनिर्धोटयेकजाती ॥ ४॥ ॥३५७८॥

नव्हावातोवरामुळींचसंबंध ॥ विश्वासितोबद्धबोलीलासे ॥ १ ॥ आतांमाझेंहीतकायतेंविचारा ॥ सत्यत्वेंदातारापांडुरंगा ॥ २ ॥ नाहींभावपरीम्हणवितोंदास ॥ नकोदेऊंयासउणेंयेऊं ॥ ३ ॥ तुकाम्हणेकांहोउद्धरीतांदीन ॥ मानितसाशीणमायबापा ॥४॥ ॥३५७९॥

कायतुमचीयासवेंचतेगांठोळी ॥ माझीटाळाटाळीकरीतसा ॥ १ ॥चतुराच्यारायाअहोपांडुरंगा॥ऐसेंतरीसांगानिवडूनी ॥ २ ॥ कोणतुम्हासुखअसेयाकौतुकें ॥ भो

गितोंअनेकेंदुःखेंआम्ही ॥ ३ ॥ तुकाम्हणेकायझाला
सीनिर्गुण ॥ आम्हायेथेंकोणसोडवील ॥ ४ ॥ ३५८०
निष्ठुरयासाठींकरीतोंभाषण ॥ आहेसीसर्वज्ञजाणता
तूं ॥ १ ॥ ऐसेंकोणदुःखआहेनिवारीता ॥ तोमीजाऊं
आतांशरणत्यासी ॥ २ ॥ बैसलासीकोणकरूनीयांधी
र ॥ नाहींयेथेऊरदुसऱ्याची ॥ ३ ॥ तुकाम्हणेआलेऔ
घेचिपायांपें ॥ आतांमायबापेंनुपेक्षावें ॥ ४ ॥ ३५८१ ॥
पायांपासींचित्त ॥ तेणेंभेटीअखंडीत ॥ १ ॥ असेखेळे
भलतेठाईं ॥ प्रेमसूत्रदोरीपाईं ॥ २ ॥ केलेंसेजतन ॥
मुळींकायतेंवचन ॥ ३ ॥ तुकाम्हणेसर्वजाणा ॥ ठाईं
विचारावेंमना ॥ ४ ॥ ॥ ३५८२ ॥
तुझेंमजपाशींमन ॥ माझीतुजभूकतान ॥ १ ॥ जिव्हार
तेंयेकेठाईं ॥ दुजेबोलायाचेंकाईं ॥ २ ॥ माझीयाकौतु
कें ॥ उभापाहासीभातुकें ॥ ३ ॥ तुकाम्हणेसाचें ॥ तेथे
मागीलकईंचे ॥ ४ ॥ ॥ ३५८३ ॥
तुम्हाआम्हासरी ॥ आतांकईच्यायापरी ॥ १ ॥ स्वामी
सेवाअळंकार ॥ नाहींआवडीयेथार ॥ २ ॥ खुंटलीयावा
चा ॥ मगहाआनंदकईचा ॥ ३ ॥ तुकाम्हणेकोडें ॥ आ
म्हीनाचोंतुजपुढें ॥ ४ ॥ ॥ ३५८४ ॥
कैंचेंभांडवलखराहातींभाव ॥ कळवळ्यानेंमावदावी
तसे ॥ १ ॥ आतांमाझाअंतनकोसर्वजाणा ॥ पाहोंना
रायणानिवडुनी ॥ २ ॥ संतांचेंउच्छिष्टमागलेपंगती ॥
करावेंसंगतीलागेऐसें ॥ ३ ॥ तुकाम्हणेआलोंदाऊनी

विश्वास ॥ संचित तें नाश पावे ऐसें ॥ ४॥ ॥ ३५८५॥
थोडे तुम्ही मागें होती उद्धरिले ॥ मज ऐसे गेले वायां जीव
॥ १ ॥ आतां याचा कांहीं न मानावा भार ॥ कृपेचा साग
र आहेसी तूं ॥ २ ॥ तुज आळवितां पायांची वसती ॥ रा
हे अंगीं कीर्ति बळत्याचें ॥ ३ ॥ तुका म्हणे जैसे तारिले द
गड ॥ तैसा मी हि जड येक देवा ॥ ४ ॥ ॥ ३५८६ ॥
आम्ही म्हणों कोण्ही नाहीं तुज आड ॥ दिसतोसी भ्याड
पांडुरंगा ॥ १ ॥ हा गे माझ्या भोगें केला सींपरता ॥ विश्वं
भरी सत्ता नाहीं ऐसी ॥ २ ॥ आम्ही तुज असों देऊनी आ
धार ॥ नाम वारंवार उच्चारीतों ॥ ३ ॥ तुका म्हणे मज ध
रीयले काळें ॥ पंचभूतीं खळें करूनीयां ॥ ४ ॥ ३५८७
आहे तें सकळ प्रारब्धाचे हातीं ॥ यावें काकुलतीया सी
आतां ॥ १ ॥ ऐसा माझ्या मनें सांगितला भाव ॥ तो व
रीच देव दुजा नाहीं ॥ २ ॥ अवघीयाची जेव्हां सारावी
करकर ॥ भाव बळें थार धरूं थेसी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज
ठेवावें पुजून ॥ आणिक तो गुण नाहीं येथें ॥ ४ ॥
॥ ३५८८॥
शेवट तो होतो तुझीयानें गोड ॥ म्हणउनी चाड धरितसों
॥ १ ॥ देउनी भोगाभोग कलिवरा भार ॥ सा हो तुज था
रत्या जमर्धी ॥ २ ॥ तुझ्या बळें कांहीं खटपट काम ॥ वाढ
वावा श्रम न लगे तो ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही चेपलों या
भारें ॥ तुमचें तें खरें देवपण ॥ ४ ॥ ॥ ३५८९॥
ऐसा चीतो गोंवा ॥ न पाहिजे केला देवा ॥ १ ॥ बहु आ

लीदुरवरी ॥ वोढतहेभरोवरी ॥ २ ॥ आम्हासीनकळे ॥
तुम्हीझाकूनयेडोळे ॥ ३ ॥ तुकाम्हणेसंगें ॥ असोंयेक
येकाअंगें ॥ ४ ॥ ॥ ३५९० ॥
मायलेंकराभिन्न ॥ नाहींउत्तराचाशीण ॥ १ ॥ धाडी
धाडीवोभातुकें ॥ रंजविल्याचेकौतुकें ॥ २ ॥ करूनिन
वल ॥ याचेबोलिलोंतेबोल ३॥ तुकाम्हणेमाते॥पांडुरं
गेकृपावंते ॥॥ ४ ॥ ॥ ३५९१ ॥
आवडीकांठेऊं ॥ बैसोनियांसंगेंजेऊं ॥ १ ॥ मागेंनको
ठेऊंउरी ॥ माझीआणतुजवरी ॥ २ ॥ देखिलेप्रकार ॥
याचेपाहेनसाचार ॥ तुकाम्हणेबाळीं ॥ केलीचाहाडी
सकळीं ॥ ४ ॥ ॥ ३५९२ ॥
नव्हेसीतुलासी ॥ मायआणिकाल्याऐसी ॥ १ ॥ जेहे
वायांजातीबोल ॥ होतीनिर्फळचिफोल ॥ २ ॥ नव्हेसी
दुबळी ॥ कांहींनाहींतेजवळी ॥ ३ ॥ तुकाम्हणेखोटी ॥
कांहींनव्हेसीकरंटी ॥ ४ ॥ ॥ ३५९३ ॥
आम्हाबोललावा ॥ तुम्हाअनुचितहेदेवा ॥ १ ॥ ऐसें
सांगाकांव्यालेती ॥ कायनाहींतुम्हाहातीं ॥ २ ॥ आतां
धरादुरी ॥ वायांदवडायाथोरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेठाईं
ऐसेंविचारावेंकांहीं ॥ ४ ॥ ॥ ३५९४ ॥
मरोनियांगेलीमाय ॥ मगतयाकोणपुसे ॥ १ ॥ पोरटी
याचीदादकोण ॥ ऐसाजनाप्रवाहो ॥ २ ॥ निढळासं
निढळजोडा ॥ होयकोडाकौतुके ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा
ऐसी ॥ आहोंसरसींआपण ॥ ४ ॥ ॥ ३५९५ ॥

संसाराचीकोणगोडी॥ दिल्हीजोडीकरुनी॥१॥ निष्ठु
रतूंबहुदेवा॥पुरेहेवाम्हणऊनी॥२॥ पाहोनीयांकर्म
डोळां॥निराळातोवर्जीना॥३॥ तुकाम्हणेतुजमाझें॥
म्हणतांवोझेंफुकट॥४॥ ॥३५१६॥
नव्हतेंकळोंआलें॥तरीबोलेअबोला॥१॥ तुजमजघा
तलीतुटी॥येकाभेटीपासूनी॥२॥आतांयाचीनधरीं॥
चाड॥कांहींकोडकौतुकें॥३॥ तुकाम्हणेयावेंजावें॥
येकाभावेंखंडलें॥४॥ ॥३५१७॥
आतांदोघांमध्येंकाय॥उरलेहोयवाणीजैसे॥१॥ नि
ष्ठुरहेंकळेमन॥समाधानकरूनी॥२॥ झुरावेंतेथींच्या
परी॥घरींच्याघरींअवघिया॥३॥ तुकाम्हणेदेवपण॥
गुंडाळोनअसोंदे॥४॥ ॥३५१८॥
मागितल्यासआसकरा॥ उरीधराकांहींबाहीं॥१॥
म्हणऊनीसारिलीआस॥हातींवासमूळतें॥२॥ मा
झ्यामोहेंतुजपान्हा॥लोटेस्तनावोरसे॥३॥ तुकाम्हणे
आळवणें॥माझ्यादेणेंउत्तरा॥४॥ ॥३५१९॥
आतांबरेंघरीच्याघरीं॥आपलीउरीआपणापें॥१॥
वाईटबरेंनपडेदृष्टी॥मगकष्टीहोईजेना॥२॥ बोलाजा
तांवाढेबोल॥वायांफोलखटपट॥३॥ काकुलतीया
वेंदेवा॥तोतोंसेवाइच्छितो॥४॥ हिशोबाचेखटपटे॥
चढेतुटेघडेना॥५॥ तुकाम्हणेकळोंआलें॥दुसरेंबरेंते
नोव्हे॥६॥ ॥३६००॥
आधीसोज्वळकरावामारग॥चालतांतोमगंगोवीना

हीं ॥ १ ॥ ऐसाचालोनियांआलाशिष्टाचार ॥ गोवीं
चावेव्हारपापपुण्य ॥ २ ॥ पळणेतेपळोसांडोनियांकां
बळें ॥ उपाधीच्यामुळेंलागपावे ॥ ३ ॥ तुकाम्हणेयेथे
शूरतोनिवडे ॥ पढिलेबापुडेकाळचक्रीं ॥ ४ ॥ ३६०१ ॥
उद्धतत्याज्योती ॥ द्रव्यरंगल्याउद्धती ॥ १ ॥ म्हणउनि
बहुफार ॥ त्यासीअसावेंअंतर ॥ २ ॥ कैचेंपाठीपोट ॥
गोडविषाचिशेवट ॥ ३ ॥ तुकाम्हणेसापा ॥ नकळेकु
वाळिलेंबापा ॥ ४ ॥ ॥ ३६०२ ॥
आम्हीकथाअवश्यक ॥ येरसंपादूंलौकिक ॥ १ ॥ जैसी
तैसीमायबरी ॥ मानिल्यामानूंयेरी ॥ २ ॥ व्यालीचा
कळवळा ॥ जीवबहुतकोंवळा ॥ ३ ॥ कवतुकेंकांवा
वेरे ॥ तुकाम्हणेयाआधारें ॥ ४ ॥ ॥ ३६०३ ॥
पाळितोवचन ॥ परिबहुभितेंमन ॥ १ ॥ करितोंपाया
शींसलगी ॥ नयेंबैसोआंगसंगीं ॥ २ ॥ जोडोनियां
कर ॥ उभेअसावेसमोर ॥ ३ ॥ तुकाम्हणेसंत ॥ तुम्ही
बहुमीपतित ॥ ४ ॥ ॥ ३६०४ ॥
जैसातैसाआतां ॥ मजप्रमाणअनंता १ ॥ पायांपडणे
नसांडीं ॥ पोटींतेचिवरतोंडी ॥ २ ॥ येकाभावेंचाड ॥
आदितैसेअंतींगोड ॥ ३ ॥ तुकाम्हणेआम्हा ॥ टळणेचि
नाहींनेमा ॥ ४ ॥ ॥ ३६०५ ॥
चुकलोंयाऐशावर्मा ॥ तरीकर्मासांपडलों ॥ १ ॥ पाठी
लागेकरीनाश ॥ गर्भवासभोगवी ॥ २ ॥ माझेंतुझे
भिन्नभावें ॥ गळादावेंमोहाचें ॥ ३ ॥ तुकाम्हणेपा

ठेळकेलों ॥ नसत्याभ्यालोंछंदासी ॥ ४ ॥ ३६०६ ॥
देहप्रारब्धाशिरीं ॥ असोनिनकरीउद्वेग ॥ १ ॥ धांवघा
लींनारायणा ॥ माझ्यामनाजागवी ॥ २ ॥ ऐसींचुको
नियांवमें ॥ पिडाभ्रमेंपावला ॥ ३ ॥ तुकाम्हणेकैंचाभो
ग ॥ नव्हेरोगअंगींचा ॥ ४ ॥ ॥ ३६०७ ॥
आनंदाच्याऐकोनिकीर्ती ॥ ज्यांच्याचित्तींहरिनाम
१ ॥ उल्लंघुनिगेलेसिंधु ॥ हाभावबंधुतोहोनियां ॥ २ ॥
हळुहळूतोचिवाही ॥ चालोंकांहीअधिकारें ॥ ३ ॥ खुंटो
नियांगेलनावा ॥ नाहींयावाखोळंबला ॥ ४ ॥ नलगे
मोलद्यावारुका ॥ भावेंयेकाकारण ॥ ५ ॥ भीमातीरीं
थडवाकेला ॥ उठाचलालवलाहो ॥ ६ ॥ तुकाम्हणेपा
हातोवाट ॥ उभानीटपाउलीं ॥ ७ ॥ ॥ ३६०८ ॥
तरीचम्यांदेवा ॥ साठीकरुनियाजीवा ॥ १ ॥ येथेंबैस
लोंधरणें ॥ दृढकायावाचामनें ॥ २ ॥ आवरिल्यावृत्ति ॥
मनघेऊनियांहातीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेजरा ॥ बाहेरयेऊं
नेदीघरा ॥ ४ ॥ ॥ ३६०९ ॥
होतोंयेकसंतांठायीं ॥ लाभपायींउत्तम ॥ १ ॥ म्हणवि
तांत्याचेदास ॥ पुढेंआसउरेना ॥ २ ॥ कृपादानकेलेंसं
तीं ॥ कल्पांतींहीसरेना ॥ ३ ॥ तुकाम्हणेसंतसेवा ॥ हेचिदे
वाउचित ॥ ४ ॥ ॥ ३६१० ॥
नारायणाऐसा ॥ सेवूंनेणतीलरसा ॥ १ ॥ जेणेंभव
व्याधितुटे ॥ दुःखमागुतेंनभेटे ॥ २ ॥ नलगेकांहींआ
टी ॥ बाधाराहोंनशकेपोटीं ॥ ३ ॥ कैवल्यतेंजोडे ॥ कृपा

लवकरीघडे॥४॥ जन्ममरणदुःखआटे॥ जाळेंअवघें
चितुटे॥५॥ तुकाम्हणेझाला॥ याचागुणबहुतांला॥
॥६॥ ॥३६११॥

शरणागतझालों॥ तेणेंमीपणामुकलों॥१॥ आतांदि
ल्याचीचवाट॥ पाहोंनाहींखटपट॥२॥ नलगेउचि
त॥ कांहींपाहावेंसंचित॥३॥ तुकाम्हणेसेवा॥ मानेतै
सीकरूंदेवा॥४॥ ॥३६१२॥

अनेकदोषांचेतेकाट॥ जेजेगादलेनिघोट॥ होतीहरि
नामेंचोखट॥ क्षणयेकनलगतां॥१॥ तुम्हीहरिम्ह
णाहरिम्हणा॥ महादोषाचीछेदना॥ धृ०॥ अतिप्रीती
चाबांधला॥ नष्टचांडाळींरतझाला॥ क्षणनलगतांने
ला॥वैकुंठासींहरिम्हणतां॥२॥ अमितदोषांचेहेमळ॥
झालेवाल्मिकासींसबळ॥ झालाहरिनामेंनिर्मळ॥ गं
गाजळपैंजैसा॥३॥ हरिम्हणतांतरले॥ महादोषीउद्ध
रीले॥ गणीकेसीनेलें॥ वैकुंठासीहरिम्हणतां॥४॥ हरि
वीणनकोजन्मवाया॥ जैसीदर्पणीचिछाया॥ म्हणो
नीतुकालागेपायां॥ शरणतयाहरीसी॥५॥३६१३॥
भजनहेंनासीलेंहेंडी॥ लंडाआवडीदंभाची॥१॥ जे
वीतांनाआयतापाक॥ नाशीताकघुसळूनी॥२॥ ये
कांयेकीइहपाट॥ नेणेचाटकांजेऊं॥३॥ तुकाम्हणे
मुलाम्याचें॥ बंधनसाचेंशेवटीं॥४॥ ॥३६१४॥
जैसानिर्मळगंगाबोघ॥ तैसाभागबोगरी॥१॥ प्रेम
वाढेग्रासोग्रासीं॥ ब्रह्मरसींभोजन॥२॥ तृप्तिवरीआ

वडीउरे॥ ऐसेबरेप्रकार ॥ ३ ॥ तुकाम्हणेपाखमन ॥
नारायणतेंभोगी॥४॥ ॥३६१५॥
सुखसुखाविरजणझालें॥ तेंमथिलेंनवनीत ॥ १ ॥ हा
लेडोलेहरुपेंकाया॥ निवतीबाव्यानयन ॥ २ ॥ प्रबळ
तोनारायण॥ गुणेंगुणवाढला॥ ३ ॥ तुकाम्हणेभरली
सीग॥ वरीमगवोसंडे॥ ४ ॥ ॥३६१६॥
कांरेनभजसीहरी॥ तरीकोणअंगीकारी ॥ १ ॥ होईल
यमपुरी ॥ यमदंडयातनाथोरी ॥ २ ॥ कोणझालील
गबग॥ कायकरीसीतेथेंमग ॥३॥ कांरेभरलाताठा॥
करीओझेनेतांवाटा॥ ४ ॥ तोंडापडलीखीळणी॥ जि
व्हापिटितीवोढोनी॥ ५ ॥ कांरेपडलीजनलाज ॥ को
णसोडवीलतुज॥६॥ ॥३६१७॥
क्षरलासागरगंगावोघमिळे ॥ आपणचिखेळेआप
णासी॥ १ ॥ मधीलतेवावअवघीउपाधी ॥ तुम्हाआ
म्हामधींतेंचिपरी॥२॥घटमठझालेआकाशाचेपोटीं॥
वचनेंचितुटीतथेचिते॥ ३ ॥ तुकाम्हणेबीजबीजेंदाख
विलें॥ पत्रपुष्पआलेंगमेवायां॥४॥ ॥३६१८॥
जैसेंतैसेंबाळमातेसीआवडे ॥ बोलतेंबोबडेशब्दगो
ड॥ १ ॥ आपुलेआवडीलववीखाववी ॥ पाहोनियां
जीवींसुखवाटे ॥ २ ॥ तुकाम्हणेकायदेऊंपरिहार ॥
कायतेसाचारजाणतसा॥३॥ ॥३६१९॥
पाळूनिगोमटें॥ त्याच्याबोटेंखेळवी॥ १॥ जवळूनिन
वजेदूरी॥ लाडेंकरीकवतूक ॥ २ ॥ खूणउभाविटेवरी

कटकरींधरियेले ॥ ३ ॥ तुकाम्हणेघातलीवरी ॥ झुली
थोरीमोलाची ॥ ४ ॥ ॥३६२०॥

कायविनवावेंकोणतोनिवाड ॥ केलेंमाझेंकोडवचना
चें ॥ १ ॥ अहोकृपानिधिगुणाच्यानिधाना ॥ माझ्याअ
नुमानानयेचिहें ॥ २ ॥ बहुतकरुणाकेलेंसंभाषण ॥ येक
हिवचननाहींआलें ॥ ३ ॥ माझीकांहींसेवाहोईलपाव
ली ॥ निश्चितीमानिलीहोतीऐसी ॥ ४ ॥ तुकाम्हणेमा
झीउरलीतेआटी ॥ अभयकरकटींनदेखेची ॥ ५ ॥
॥ ३६२१ ॥

लाजोनियांकाळेंराहिलोंलिखित ॥ नेदितांहिचित्तस
माधान ॥ १ ॥ कैसेंसुखवाटेवचनाचीतुटी ॥ प्रीतीविण
भेटीरुचिनेदी ॥ २ ॥ येकाचियेभेटीयेकाचाकोंपर ॥
मावेचापदरकळोंयेतो ॥ ३ ॥ होत्याआपुल्यात्यावेचु
नियांशक्ति ॥ पुढेंझालीयुक्तिकळाहीन ॥ ४ ॥ तुकाम्हणे
तुम्हीसमर्थजीदेवा ॥ दुर्बळाचीसेवाकोठेंपावे ॥ ५ ॥
॥ ३६२२ ॥

आशाबद्धबहुअसेनिलाजोरें ॥ होयम्हणेधीरेंफळकोठे
॥ १ ॥ कारणापेंचित्तनपाहेअपमान ॥ ॥ चित्तसमाधा
नलाभासाठीं ॥ २ ॥ तुकाम्हणेहातेंलोटिलेंनकळे ॥
झांकितसोंडोळेपांडुरंगा ॥ ३ ॥ ॥३६२३॥

सातापांचातरीवचनाशेवटीं ॥ निरोपकांभेटीयेकतरी
॥ १ ॥ कांनेणेनिष्ठुरकेलानारायण ॥ नदेखेहेंमनायेतें
कांहीं ॥ २ ॥ तुकाम्हणेकेलापाहिजेनिवाड ॥ वैद्यासी

तेभीडमरणरोग्या ॥ ३ ॥ ॥ ३६२४ ॥
वायांऐसाजन्मगेला ॥ हेंविठ्ठलादुःखवाटे ॥ १ ॥ नाहीं
सरताझालोंपाई ॥ तुम्हींजईनपूसा ॥ २ ॥ कांहींजीतोस
वसारीं ॥ अद्यापिवरीभूमिभार ॥ ३ ॥ तुकाम्हणेपंढ
रीनाथा ॥ सबळव्यथाभवरोग ॥ ४ ॥ ॥ ३६२५ ॥
ऐसेंकोणपापबळी ॥ जेंजेंजवळीयेऊंनेदी ॥ १ ॥ तुम्हा
तंव होईलठावें ॥ नेदावेंहेंकळोंहे ॥ २ ॥ कोणझालाअंत
राय ॥ कांतेपायअंतरले ॥ ३ ॥ तुकाम्हणेनिमित्याचा ॥
आलासुचाअनुभव ॥ ४ ॥ ॥ ३६२६ ॥
ब्रह्मज्ञानभरोभरी ॥ सांगेआपणनकरी ॥ १ ॥ थुथुत्या
च्यातोंडावरी ॥ व्यर्थशिणविलीवैखरी ॥ २ ॥ कथाक
रीवरीवरी ॥ प्रेमनसेचिअंतरीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेकवि
त्वकरी ॥ मानलोभहेअंतरीं ॥ ४ ॥ ॥ ३६२७ ॥
दगडाच्यादेवाबगाडीनवस ॥ बाईलकथेसजाऊंने
दी ॥ १ ॥ वेचीधनराशींबांधिलेंस्मशान ॥ द्वारींवृंदा
वनद्वाडमानी ॥ २ ॥ चोरेंनागविलानकरीत्याचीखंती ॥
परिद्विजाहातींनेदीरुका ॥ ३ ॥ करीपाहुणेरव्यात्या
जांवयासीं ॥ आल्याअतिथीसीपाठीमोरा ॥ ४ ॥ तु
काम्हणेजळोधिगत्याचेंजिणें ॥ भारवाहेशिणेंधरात
ळीं ॥ ५ ॥ ॥ ३६२८ ॥
करूनिवीनवणी ॥ माथाठेवितोंचरणीं ॥ १ ॥ होंतेंतेंचिअ
सोंघावें ॥ रूपसौम्यचिबरवें ॥ २ ॥ भयाभेणेंतुमचाठाव ॥
तुमच्याकोपेंकोठेंजावें ॥ ३ ॥ तुकाम्हणेपायांलागे ॥

दानसमुदानमागे ॥ ४ ॥ ॥ ५ ॥ ॥ ५ ॥ ॥ ३६२९ ॥
प्रेमनयेसांगतांबोलतांदावितां ॥ अनुभवचित्ताचित्त
जाणे ॥ १ ॥ कांसवीचेंबाळवाढेकृपादृष्टी ॥ दुधानाहीं
भेटीअंगसंगें ॥ २ ॥ पोटामध्येंकोणेंसांगितलेंसर्पा ॥
उपजतलपाम्हणऊनी ॥ ३ ॥ बोलोंनेणेपरीजाणेगोड
क्षार ॥ अंतरींविचारत्यासीठावा ॥ ४ ॥ तुकाम्हणेबरें
विचारावेंमनीं ॥ आणिकभल्यांनींपुसोंनये ॥ ५ ॥
॥ ३६३० ॥
आतांमीपतितऐसासाचभावें ॥ कळोंअनुभवेंआलें
देवा ॥ १ ॥ कायकरावेंतेंरोकडेंचिकरी ॥ राहिलीहेउरी
नाहींधंदा ॥ २ ॥ येरयेरादृष्टीद्यावेंयाउत्तरा ॥ यासींकां
हींकरागोहीआतां ॥ ३ ॥ तुकाम्हणेमेलोंसांगतांसांग
तां ॥ तेचिआलेंआतांकळोंतुम्हा ॥ ४ ॥ ॥ ३६३१ ॥
कायतुजमाझेंनाहींजाणवलें ॥ माझेंनाहींकेलेंहितकां
हीं ॥ १ ॥ ढोळेझांकोनियांहोसीअबोलणा ॥ तेव्हांना
रायणाआतांकैसा ॥ २ ॥ नकळेउचितनसांगतांस्पष्ट ॥
ऐसाक्रियानष्टकायजाणों ॥ ३ ॥ तुकाम्हणेमाझाघात
तुम्हाठावा ॥ तरीकांआधींदेवावारूंनये ॥ ४ ॥ ३६३२ ॥
नयेऐसेंबोलोंकठिणउत्तरें ॥ सलगीलेंकुरेंकेलीपुढें ॥ १ ॥
अपराधकीजेघडलातोक्षमा ॥ शिकवाउत्तमाआमु
चिया ॥ २ ॥ धरूंधांवेअंगींपोळेलतेंनेणे ॥ वोढिलिया
होणेमातेबाळा ॥ ३ ॥ तुकाम्हणेभारज्याचाजारत्यासी ॥
प्रवीणयेविसीअसातुम्ही ॥ ४ ॥ ॥ ३६३३ ॥

लडिवाळम्हणोनिनिष्ठुरनबोला॥ परिसांभाळीलाला
गेघात॥१॥बहुवागर्वीतआणिलेंदुरूनी॥ दिसाचीपो
सणीबहुआहों॥ २॥ नाहींलागोंदिल्हाआघाताघा
वारा॥निष्ठुरउत्तराकोमेजतो॥३॥तुकाम्हणेतुम्हीकृ
पावंतहरि॥शांतवाउत्तरींअमृताच्या॥४॥३६३४॥
आत्मस्थितिमजनकोहाविचार॥ देईनिरंतरचरणसे
वा॥१॥ जन्मोजन्मींतुझादासपुरुषोत्तमा॥हेंचिगोड
आम्हादेईदेवा॥२॥कायसायुज्यतामुक्तीचीहेचाड॥
देवभक्तकोडतेथेंनाहीं॥२॥कायतेनिर्गुणपाहोंकैशा
परी॥वर्णूतुझीहरिकीर्तिकैसी॥४॥गोडचरणसेवादे
वभक्तपणें॥मजदेवाझणेंदुराविसी॥५॥जाणिवे
पासुनिसोडवींसत्वर॥देईनिरंतरचरणसेवा॥६॥तु
काम्हणेगोडागोडनलगेप्रीति॥सेवेवीणचित्तींसारना
हीं॥७॥ ॥३६३५॥
चालेदंडवतघालीनारायणा॥ आपल्याकल्याणाला
गोनियां॥१॥बैसविलापदींपुत्रराज्यकरी॥पितावा
हेशिरींआज्ञात्याची॥२॥तुकाम्हणेआहेठाईचाचीमा
न॥आतांअनुमानकायसातो॥३॥ ॥३६३६॥
यासीकोणीम्हणेनिंदेचींउत्तरें॥नागवलाखरेंतोचीये
क॥१॥आडमार्गेंजातांनीटलागेसोय॥धर्मनीतआ
हेंतेहेऐसी॥२॥नायकतांवचनकरावेंताडण॥ नाहींपा
पपुण्यबहुआहे॥३॥तुकाम्हणेनिंदर्दीधल्यावांचून॥
अंतरींचाशीणकेवीजाय॥४॥ ॥३६३७॥

समर्थाचेंबाळपांघरेवाकळ ॥ हांसतीसकळलोकको
णा ॥ १ ॥ समर्थासीलाजआपुल्यानावाची ॥शरण
आलियाचीलागेचिंता ॥ २ ॥ जरीतुजकांहींहोईलउ
चीत ॥ तरीहापतीततारीतुका ॥ ३ ॥ ॥३६३८॥
नकरीरेमनाकांहींचकल्पना॥ चितायाचरणाविठोबा
च्या ॥ १ ॥ येथेंसुखाचीयाअमूपचिराशी ॥ पुढेंकल्पने
सीठावनाहीं ॥ २ ॥ सुखाचेंओतिलेंसाजिरेंश्रीमूख ॥
शोकमोहोदुःखपाहतांनाशे ॥ ३ ॥ तुकाम्हणेयेथेंहो
ईलविसावा ॥ तुटतीलधांवापुढलीया ॥ ४ ॥
॥३६३९॥
हिरोनियांनेलामुखींचाउच्चार॥ पडिलेंअंतरजवळीच
॥ १ ॥ कायकरूंमनानागविलेंआळसें ॥ बहुतयासोसें
पीडाकेली ॥ २॥ द्वैताचियेकेसासांपडलोंहातीं ॥ बहुत
करीतीवोढावोढी ॥ ३॥ तुकाम्हणेआतांआपुलियास
वें ॥ न्यावेंमजदेवेंसोडऊनी ॥ ४ ॥ ॥३६४० ॥
नाहींदेवाचाविश्वास ॥ करीसंतांचाउपहास ॥ १ ॥ त्या
चेतोंडींपडेमाती ॥ हीनसूकराचिजाती ॥ २ ॥ घोकू
निअक्षरें ॥ वादछळणाकरीतफिरे ॥ ३ ॥ म्हणेदेवासीं
पाषाण ॥ तुकाम्हणेभावहीन ॥ ४॥ ॥३६४१॥
हेंचिसर्वसुखजपावाविठ्ठल॥नदवडापळक्षणवायां ॥
॥ १ ॥ हेंचियेकसर्वसाधनाचेंमूळ॥ आतुडेगोपाळये
णेंपंथें ॥ २ ॥ नलगतीकांहींतपाचियाराशी॥ करणेंवा
राणसीनानातीर्थें ॥ ३॥ कल्पनाहेतिळदेहींअभिमान

नयेनारायणजवळीत्या ॥ ४ ॥ तुकाम्हणेनामेंदेवनेदी
भेटी ॥ म्हणेत्याचीओंठींकुष्ठहोय ॥ ५ ॥ ॥ ३६४२ ॥
माझेविशींतुजपडतोविसर ॥ नकोधरूंदूरपांडुरंगा ॥
॥ १ ॥ तुझाम्हणवितोंहेचिलाजतुज ॥ आतांझणेंमज
विसरसी ॥ २ ॥ तुकाम्हणेतुझीमाझीझालीउरी ॥ आतां
केलीखरीदेवराया ॥ ३ ॥ ॥ ३६४३ ॥
अभक्ताचेगांवींसाधुम्हणजेकाय ॥ व्याघ्रवाडागाय
सांपडली ॥ १ ॥ कसाबाचेआळींमांडिलेंप्रमाण ॥ बस
वणाआणतयाकाई ॥ २ ॥ मोतियाचीगोणीमाळेआ
ळीनेली ॥ पुसतीकेव्हडयाकेलीपांसरीहे ॥ ३ ॥ केळीआ
णिबोरीवसतीशेजारीं ॥ संवादकोणेपरीघडेयेथें ॥ ४ ॥
तुकाम्हणेक्षीरकेलीकान्हेळाची ॥ शुद्धगोडीकेंचीवसे
तेथें ॥ ५ ॥ ॥ ३६४४ ॥
भागल्याचातूंविसावा ॥ करीननावांनिंबलोण ॥ १ ॥
परमानंदापुरुषोत्तमा ॥ हरियाश्रमापासूनी ॥ २ ॥ अ
नाथाचाअंगीकार ॥ करितांभारनमानिसी ॥ ३ ॥ तु
काम्हणेइच्छापुरे ॥ ऐसीधूरहेविठ्ठल ॥ ४ ॥ ३६४५ ॥
घालूनियांबळेंकास ॥ आलोंदानमागायास ॥ १ ॥ प्रे
मदेईपाठवूनी ॥ पांडुरंगासेवाऋणी ॥ २ ॥ होईरेशाहा
णा ॥ कळोंनेदावेंयाजना ॥ ३ ॥ तुकाम्हाणेपाई ॥ जड
लोंमगउरलेंकाई ॥ ४ ॥ ॥ ३६४६ ॥
लागेतुझीसोयऐसेंकरींकांहीं ॥ माझेविठाबाईमाउलि
ये ॥ १ ॥ पतितपावनम्हणविसीजरी ॥ अव्हेरनकरीत

रींमाझा ॥ २ ॥ नाहींतरीब्रीदटाकींसोडुनियां ॥ नधरि सीमायाजरीमाझी ॥ ३ ॥ बोलियेलाबोलकरावासाचा रें ॥ तरीलोकवरेंम्हणतील ॥ ४ ॥ करावासंसारलोक लाजेभेणें ॥ वचनासिउणेंयेऊंनेदी ॥ ५ ॥ तुम्हाआम्हा तैसेनाहींम्हणेतुका ॥ होशीलतूंसखाजीवलग ॥ ६ ॥

॥ ३६४७ ॥

भेटीलागींपंढरीनाथा ॥ जीवालागलीतळमळव्यथा ॥ १ ॥ कईंकृपाकरिसीनेणें ॥ मजदीनाचेंधांवणें ॥ २ ॥ शिणलेंमाझेंमन ॥ वाटपाहतांलोचन ॥ ३ ॥ तुकाम्हणे लागलीभूक ॥ तुझेंपाहावयामुख ॥ ४ ॥ ॥ ३६४८ ॥

सांडियेलीकाया ॥ वरीवोंवाळुनिपायां ॥ १ ॥ शरण शरणनारायणा ॥ मजअंगिकारींदीना ॥ २ ॥ आलों लोटांगणीं ॥ रुळेतुमचेचरणीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेशिर ॥ ठेवियेलेंपायांवर ॥ ४ ॥ ॥ ३६४९ ॥

तुझेदारींचाकुतरा ॥ नकोमोकलूंदातारा ॥ १ ॥ धरणेंघे तलेंदारांत ॥ नकोउठऊंधरूनीहात ॥ २ ॥ घातलीमुरकुं ड ॥ झालोंशिरोमणिलंड ॥ ३ ॥ तुकाम्हणेजगजीवना ॥ ब्रीदराखीनारायणा ॥ ४ ॥ ॥ ३६५० ॥

नकरावीटांचणी ॥ येथेंकांहींअडचणी ॥ १ ॥ अमूपजि व्हेकरींमाप ॥ अनंतपिकलामाझाबाप ॥ २ ॥ अष्टहिप्र हर ॥ बारामासनिरंतर ॥ ३ ॥ तुकाम्हणेवाणी ॥ गर्जेना हेंघेताधणीं ॥ ४ ॥ ॥ ३६५१ ॥

पडिलोंबाहेरीआपुल्याकर्तव्यें ॥ संसाराचाजीवेंविट

आला ॥ १ ॥ येकामध्येंयेकनाहींमिळोंयेत ॥ ताकनव
नीतनिवडीतां ॥ २ ॥ दोनझालींनावेंयेकाचिमंथनें ॥
भूससारगुणेंवेगळालीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेकोठेवसेमु
क्ताफळ ॥ सिंपल्याचेंस्थळखंडलीया ॥ ४ ॥३६५२॥
पाहातांहेंबरवेंझालें॥ कळोंआलेंयावरी॥ १ ॥मागिलां
चाझालाझाडा॥त्यानिवाड्यास्तवहे॥ २॥विसावलेंआं
गदिसे ॥ सरिसेंसरिसेंअनुभव ॥ ३ ॥ तुकाम्हणेबरेंझा
लें ॥ देवेंदिल्हेंगवसूनी ॥ ४ ॥ ॥३६५३॥
चक्रफेरीगळगळा ॥ होतांगोंवियेल्यामाळा ॥ १ ॥ फु
टोनियांगेलाकुंभ ॥ झालोंनिष्कामस्वयंभ ॥ २ ॥ धरी
तचिनाहींथारा ॥ ठेवीभ्रमणखोकरा ॥ ३ ॥ तुकाम्हणे
कोडें ॥ आगींकायजाणेमढें ॥ ४ ॥ ॥३६५४॥
श्रमपरिहारा ॥ मूळजाहलेदातारा ॥ १ ॥ देहनिवेदूनि
पाईं ॥ झालोंनिष्कामउतराई ॥ २ ॥ आपुलितोंसत्ता॥
येथेंअसोंनेदीआतां ॥ ३ ॥ राहिलानिराळा ॥ तुकाखट
पटेवेगळा ॥ ४ ॥ ॥३६५५॥
पाठवालतेथेंगर्जनपवाडे ॥ कांहींदेहाकडेनावलोकीं
॥ १ ॥ म्हणउनिमागेकंठींचासौरस ॥ पावतीलनाश
विघ्नेंपुढें ॥ २ ॥ रूपेंच्याकटाक्षेंनभियेकळिकाळा ॥ ये
तांयेतबळाशक्तीपुढें ॥ ३ ॥ तुकाम्हणेगुढीआणिनपा
यांपें ॥ होईलतेंसोपेंनामतुझें ॥ ४॥ ॥३६५६॥
उपजल्याकाळेंशुभकाशकुन॥ आतांआवरोनराहिले
ती ॥ १ ॥ नाहींमागितलीवचनाचीजोडी ॥ निष्काम

रोकडीवरीवरी ॥ २॥ सस्याविणकायउगीचलांबणी॥
कारयाचीवाणीयेरभूस ॥ ३ ॥ तुकाम्हणेऐसीकोणाची
तीवाणी॥ नविचारामनींपांडुरंगा॥ ४॥ ॥ ३६५७॥
नव्हेंमीआहाचआशचेबांधले ॥ जेहेटोकविलेनाराय
णें॥ १ ॥ अंतरतोतुम्हाबरेंकळोंयेतें॥ वेव्हारउचितेंचा
ळवीजे॥ २ ॥ मनानेंकल्पिलेंआवरितांपाप ॥ संकल्प
विकल्पयाचीनावें ॥ ३ ॥ तुकाम्हणेआम्हानसोसेजव
ळ॥ सिजल्यावरीजाळकढखोटा॥ ४॥ ॥ ३६५८॥
ताकेंरूपणतोजेऊंकायघाली॥ आहांचतेचालीवरीन
कळे॥ १ ॥ कायतुम्हावेंचेघातलेंसांकडें ॥ माझेंआलें
कोडेंआजिवरी॥ २ ॥ सेवेविणआम्हीनलिंपोंत्याका
र्या॥ झालादेवरायानिर्धारहा॥ ३ ॥ तुकाम्हणेतुझींरा
खावींतींब्रीदें॥ येणेअनुवादेंगर्जतसे॥ ४ ॥ ३६५९ ॥
वृत्तिवरिआम्हायेणंकशासाठीं॥ येव्हढीहीआटीसोसा
वया॥ १ ॥ जाणतसापरीनेणतेजीदेवा ॥ भ्रमचिबर
वाराखावातो॥ २॥ मोडोनिक्षरलोंअभेदाचीमूस ॥तु
म्हाकांआळसवोढवला॥ ३॥ तुकाम्हणेहोईलवकरीउ
दार॥ लांबणीचेंफारकामनाहीं॥ ४॥ ॥ ३६६० ॥
सुलभकीर्तनदिल्हेंठसाऊनी॥ करितांधरणीउरीकोण
॥ १ ॥ आतांनटळावेंकेलियानेमासीं॥उदाराचाहोसी
हीणकाय॥ २॥ येकानामेंकोठेंदुसरापालट॥ पदारतो
धीटम्हणतीत्यासी॥ ३॥ तुकाम्हणेकितीबोलसीलउणें
येकाचवचनेंखंडकरी॥ ४॥ ॥ ३६६१ ॥

जेथेंमाझीदृष्टीराहिलीबैसोन॥ तेथेंचिहेंमनगुंडाळतें॥
॥ १ ॥टाळवीतेपीडाआपुल्यापासून॥ दिठावलेंअन्न
वोकवीते॥ २॥ तुम्हासीकांकोडकोणेविषयींचें॥ नव
लावयाचेंवाटतसे॥३॥ तुकाम्हणेवेगींउभाराजीकर॥
कीर्तिमुखेंथोरगर्जवून॥ ४॥ ॥३६६२॥
इच्छेपासींआलोंफिरोनीमागुता॥ स्वामीसेवकताआ
वडीची ॥ १ ॥ द्यावेंलवकरीमागितलेंज्ञान ॥ मुळींचें
जतनकरूनिअसे॥ २॥उपायहेंकरीयेकाचिवचना॥दा
ऊनियांखुणाठायांयेतो ॥ ३ ॥ तुकाम्हणेगांठीकितीतु
जपासी॥ जगाच्यातोंडिसीचिंतनेनें ॥ ४ ॥ ३६६३ ॥
कोठेंआम्हीआतांवेचावीहेवाणी ॥ कोणमनाआणी
जाणोनियां ॥ १ ॥ नकरावीसांडीआतांटाळाटाळी॥
देईनयेकाळींहोईलमाझी॥ २ ॥ घरोघरींझाल्याज्ञाना
चियागोष्टी ॥ सत्यासवेंगांठीनपडावी ॥ ३ ॥ तुकाम्ह
णेआम्हीभाकावीकरुणा ॥ भलताचीशाहाणाशोध
काढी॥ ४ ॥ ॥ ३६६४ ॥
टगमगीमननिराशेचेगुणें ॥ हेंतोनारायणेंशांतवीजे
॥ १ ॥ धीरतूंगंभीरजीवनजगाचें ॥ जळोविभागाचे
आहाचते॥ २ ॥ भेईलजीवहेंदेखोनीकठीण॥ केलाजा
तोशीणतोतोंवायां॥ ३॥ तुकाम्हणेआवश्यकहेंवचन॥
पाळावेंचिदानसमयोआहे॥ ४॥ ॥ ३६६५॥
आम्हीपाहोंकैसोंयेकतत्वझालों ॥ राखणेलागलोंवा
सनेसी॥ १ ॥ तुम्हाविणकांहींनावडावेंजीवा॥ केला

तोचिदेवादृढपण ॥ २ ॥ वर्मनेणेपरीवृत्तिभंगूंनेदूं ॥ वें
दिलेचिवंदूंआवडीनें ॥ ३ ॥ तुकाम्हणेकेलेंनामाचेंजी
वन ॥ वार्ताहीभिन्ननेणोंआतां ॥ ४ ॥ ॥ ३६६६ ॥
आपणतोअसा ॥ समर्थजीऱ्हषीकेशा ॥ १ ॥ कराकरा
बुझावणी ॥ कायविलंबवचनीं ॥ २ ॥ हेंघ्यऐसेंम्हणा ॥
उठूनिलागेनचरणा ॥ ३ ॥ घेऊनियांसुखें ॥ नाचेतुकाक
वतुकें ॥ ४ ॥ ॥ ३६६७ ॥
घालऐसेंदिसे ॥ तुमचेंसाचपणइच्छे ॥ १ ॥ म्हणुनिनभं
गेनिर्धार ॥ केलेलोचनसादर ॥ २ ॥ मुखाचीचवास ॥ पु
रलीपाहेअवकाश ॥ ३ ॥ तुकाम्हणेकळे ॥ कायलाभ
कोणेंवेळे ॥ ४ ॥ ॥ ३६६८ ॥
आम्हीतोसदैव ॥ अधीरपणेंमाझीधांव ॥ १ ॥ जळो
आशेचेंतेंजिणें ॥ टोंकतसोदीनपणें ॥ २ ॥ येथूनिसोड
वा ॥ आतांअनुभवदेवा ॥ ३ ॥ तुकाम्हणेझाले ॥ येक
मगहेनिमाले ॥ ४ ॥ ॥ ३६६९ ॥
आम्हापासींसरेयेकशुद्धभाव ॥ चतुरायीजाणीवनलगे
कळ ॥ १ ॥ सर्वजाणेमाझास्वामीपांडुरंग ॥ तयाअंगसंम
गोपाळांसी ॥ २ ॥ तुकाम्हणेकर्मधर्मनयेहाता ॥ तया
वरीसत्ताभाविकांची ॥ ३ ॥ ॥ ३६७० ॥
कैसेंभलेंदेवाअनुभवाकांनये ॥ उशीरतोकायतुम्हापा
सीं ॥ १ ॥ आहेतोदिसतेसर्वाठायींजळीं ॥ केल्यामधीं
कळीकोणसाध्य ॥ २ ॥ नाहींसांडितमीसवेंचिमर्यादा ॥
लाविलातोधंदानित्यकरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेहातआवरि

लागुंती ॥ माझेवार्तांचित्तींनाहींदुजे ॥ ४ ॥ ३६७१ ॥
ढुडकीपिशवीहालवितोदाढी॥मनमणीओढीनिंदेचेते
॥ १ ॥ त्याचेंफळपाकींयमाचेचदंड ॥ घरकेलेंकुंडकुंभी
पाक॥ २॥क्रोधपोटींमांगआणिलाअंतरा॥ भुंकोनीकु
तराजपकरी॥३॥ तुकाम्हणेस्नानकेलेंमळमूत्रें॥ जेवि
लेंपित्रेंअमंगळ॥ ४ ॥ ॥३६७२॥
अंगींभरलाताठा ॥ नयेवळणीचेजैसामुठा ॥ १॥ कैसें
नकळेत्याडेंगा ॥ हितआदळलेंअंगा ॥ २ ॥ जीवजाते
वेळे ॥ भल्याकडेताठीडोळे ॥३॥ मुसळाचेंधनु ॥ तुका
म्हणेनव्हेआनु ॥ ४ ॥ ॥३६७३॥
करूनिकडविकड ॥ जमाघडलीलगड ॥ १ ॥ होतेंची
झालें ॥ नामठाईंचपडिलें ॥ २ ॥ उतरलेंडाई ॥ उत्तमसु
लाखतेंठाई ॥ ३॥ हिंडवितादेशोदेश ॥ तुकाम्हणेनाहीं
नाश ॥ ४ ॥ ॥३६७४॥
पडियतेमागापांडुरंगापासीं ॥ मजदुर्बळासींकायपी
डा ॥ १ ॥ याजसाठींदुरावलासवसार॥ वाटेहेअपार
मायातृष्णा ॥ २ ॥ कांहींकरितांकोठेंनव्हेसमाधान॥
विचारितांपुण्यतेंचिपाप ॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांनिश्च
ळचिभलें ॥ तुजआठविलेंपांडुरंगा ॥४॥ ॥३६७५॥
नव्हेमीशाहाणा ॥ तरीम्हणानारायणा ॥ १ ॥ तुम्हा
बोलावयाकांहीं ॥ येचभरलोंसेवाही ॥ २ ॥ आणावें
तेंरूपा ॥ कोपलेंतितरीकोपा ॥ ३ ॥ कळोनीआवडी ॥
तुकाम्हणेजातेघडी ॥ ४ ॥ ॥३६७६॥

आम्हीभाविकेंहेकायजाणोखोडी ॥ आयकोनीप्रौढी
निववीलें॥ १ ॥ नाहींयेथेंऐसेंझालेंतिअसतां ॥ वोढ
विलेंचित्ताअधिकसासे॥ २॥ नकळेचीआधीकरितां
विचार॥ नधरितांधीरआह्मचता ॥ ३ ॥ तुकाम्हणेआ
तांवचनेंवचन ॥ वाढोनलेतीक्ष्णबुद्धिझाली ॥ ४ ॥
॥ ३६७७॥
कोठेंदेवाबोलों॥ तुम्हाभीडघालूंगेलों॥ १ ॥ करावया
सत्वहानी॥ भांडवलाचीचटणी ॥ २ ॥ दुर्बळामाग
ता॥ त्याच्याप्रवर्तल्याघाता॥ ३ ॥ तुकाम्हणेनाहीं ॥
मजकळलेंऐसेंकांहीं॥ ४॥ ॥ ३६७८॥
पाहिजेतेंआतांप्रमाणप्रत्यक्ष ॥ झालीयातेसाक्षखरें
खोटें १॥ कायदिवसउचिताचाआला॥मागीलजोके
लाश्रमहोता॥ २॥ ठेवियेलीखूणकरूनिसंकेत ॥ तया
पासींचित्तलागलेंसे॥ ३॥ जाणसीगेमातेलेंकराचा
लाड॥ नयेपडेआडनिष्ठूरता॥ ४॥ ॥३६७९॥
पडिलाप्रसंगकामीऐसानेणे ॥ संकल्पतेमनेंजिरवि
ले॥ १ ॥ चेष्टविलेंतरीसांगावेंकारण॥ भक्तितेंजीवन
करावया॥ २॥ लावूनियांदृष्टिघातलीसमोरी ॥ बैस
लोंजिव्हारींबैसोनियां॥ ३ ॥ तुकाम्हणेजीवालावीये
लाचाळा॥ करावेंगोपाळाशीघ्रदान॥४॥ ॥३६८०॥
मागीलविसरूहोईलसकळ ॥ केलीतळमळदुःखाची
ते॥ १ ॥दोहींचेआईक्यघालीगडसंधी ॥ स्थिरावली
बुद्धिपायांपाशीं ॥ २॥ आह्मचत्याकेलोंदेहपरिचारें॥

तुमचेंतेंखरेंबोढानये ॥ ३ ॥ तुकाम्हणेम्हावेंलवकरी
उदार॥मीअसेंसादरप्रतिग्रहा॥४॥ ॥३६८१॥
वाढवावेपुढेंआणिकप्रकार ॥ येकचित्तेंफाररुचीनेदी
॥१ नीचनवेंलेणेंदेहहापवाडा॥ पालटरोकडावरावरी
॥ २॥ दिसंशोभिवंतसेवेनेंसेवक ॥ स्वामीचीतेलोक
त्रयींकीर्ता॥ ३॥ तुकाम्हणेआम्हीपावावासंतोष॥ क
रूनीकीर्तिघोषनामगाईं॥ ४॥ ॥३६८२॥
क्षोभआणिकृपामातेचीसमान ॥ विभागजतनकरु
निठेवी॥१॥ क्षणभंगुरताउपजलीचित्ता॥ खरीअखं
ढताआवडीची॥ २॥ सिकहजाणतेगोमटीयासाठीं॥
लोभेंझालीतुटीनिश्चयेसीं॥ ३॥ अवघेचीमिथ्यासम
याआरत॥ देतांतोउचितेंकायजाणें॥ ४॥ नकरीवेव्हा
रगांजूनेंदिकोणा ॥ भेडसावीतान्हाबाऊआला ॥
॥५॥ तुकाम्हणकरीजीवाचीजतन ॥ दचकुनिमनज
वळीआणी॥ ६॥ ॥३६८३॥
संसाराचेधांवेंवठी ॥ आवडीपोटींकेवढी॥ १ ॥ हगों
जातांदगडसांची॥ अंतरींहासंकल्प॥ २॥ लाजतेवढी
नारायणीं॥ वाकडीवाणीपोरापै॥ ३॥ तुकाम्हणेबेश्र
मा॥ वरीभ्रमापडीभरू॥ ४॥ ॥३६८४॥
मीत्यासीअनन्यतीकोणअसती॥ ऐसेतेचिचित्तींविचा
रावें॥१॥ आहेतोविचारआपणायापासीं॥कळाबिंबा
ऐसीप्रतिबिंबें॥ २॥ शुभशकुनतोशुभलाभेफळ॥ पु
ढीलतेंकळेअनुभवें॥ ३॥ तुकाम्हणेमाझाअसेलआठ

व ॥ तैसामाझाभावतुझ्यापाईं ॥ ४ ॥ ॥३६८५॥
बहुरुंपावतेंमाझीमायबापें ॥ मीमाझासंकल्पेंअंतर
लों ॥ १ ॥ संचितानेंनाहींचुकोंदिल्हीवाट ॥ लाविलेंअ
घटमजसवें ॥ २ ॥ आतांमीरुसतोंनकळतांवर्म ॥ परी
पावेंधर्मसर्वदेवा ॥ ३ ॥ तुकाम्हणेउभाराहिलानबैसे ॥
आमचियाऐसेउद्वेगत्या ॥ ४ ॥ ॥३६८६॥
कैसेंदिसोंबरी ॥ आम्हीआळवितांहरी ॥ १ ॥ नाहींसों
गअळंकार ॥ दासझालासवसार ॥ २॥ दुःखआम्हाना
हींचिंता ॥ हरीचेदासम्हणवितां ॥ ३ ॥ तुकाम्हणेदेवा॥
ऐसीजोकरितोसेवा ॥ ४ ॥ ॥३६८७॥
आतांसांडूंतरीहितनापदरीं॥ सखेसहोदरींमोकलिला
॥ १ ॥ जनाचारामध्येंउडालापातेरा ॥ झालोंमीनिला
जराम्हणऊनि ॥ २ ॥कोणाचीयादाराजावेंनसेझालें॥
म्यांचविटंबिलेंआपणासी॥३॥कोणझालामाझाबुद्धी
सीसंचार॥ माझेकोठेंथारऐसेझाले ॥ ४ ॥ तुकाम्हणे
तुझेभक्तझालेफार ॥ म्हणउनीथारनाहींयेथें ॥ ५ ॥
॥३६८८॥
जेथेंजातोंतेथेंपडतोंमतोळा ॥ नदेखेंचडोळांलाभकां
हीं ॥ १ ॥ कपाळींचीरेखाअसतीउत्तम ॥ तरीकांहोश्र
मपावतोंमी॥ २॥ नव्हेचितुम्हासीमाझाअंगीकार॥थो
तासवसारअंतरला ॥ ३ ॥ भोगवंतझालाखराभोगां
वातो ॥ भांडवलनेतोआयुष्यकाळ ॥४॥ कोठेंतुम्हकी
र्तिआयिकिलीदेवा ॥ मुकतोंकांजीवातुकाम्हणे ॥ ५॥

कांजीआम्हाहोतेंदोषाचेंदरुशन॥ तुजसमर्पूनदेहभाव ॥ १ ॥ पांडुरंगाकृपाळुवादयावंता ॥ धरिसीलसंत्तास कळही ॥ २ ॥ कांजीआम्हावरीआणिकाचीसत्ता ॥ तुम्हासीअसतांजवळीके ॥ ३ ॥ तुकाम्हणेपाईकेलें निवेदन ॥ उचिततेंदानकरीसत्ता ॥ ४ ॥ ॥ ३६९० ॥

कायऐसीवेळ ॥ वोडवलीअमंगळ ॥ १ ॥ आजीदुख वेलेंमन ॥ कथाकाळींझालाशीण ॥ २ ॥ पापाचियागुणें ॥ त्याचीयेवेळेदरुशने ॥ ३ ॥ तुकाम्हणेकानीं ॥ घालूंआलेंदुष्टवाणी ॥ ४ ॥ ॥ ३६९१ ॥

निंदावेंहेंजग ॥ ऐसाभागाआलाभोग ॥ १ ॥ होतेंतैसें आलेंफळ ॥ गेलेंनिवडूनीसकळ ॥ २ ॥ दुसऱ्याच्याम ता ॥ मिळेनासेंझालेंचित्ता ॥ ३ ॥ तुकाम्हणेझालोंसांडा ॥ विटंबतीपोरेंरांडा ॥ ४ ॥ ॥ ३६९२ ॥

माझेमाथातुझाहात ॥ तुझेपाईमाझेंचित्त ॥ १ ॥ ऐसी पडियेलीगांठी ॥ शरीरसंबंधाचीमिठी ॥ २ ॥ येरयेरा पासीं ॥ सांपडोनगेलोंऐसी ॥ ३ ॥ तुकाम्हणेसेवा ॥ माझीकृपातुझीदेवा ॥ ४ ॥ ॥ ३६९३ ॥

सत्यत्यागासीसमान ॥ नलगेवेचावेंवचन ॥ १ ॥ नारायणऐसादास ॥ येरयेराचीचआस ॥ २ ॥ मळनाहीं चित्ता ॥ तेथेंदेवाचीचसत्ता ॥ ३ ॥ तुकाम्हणेजाण ॥ तेंचीभल्याचेंवचन ॥ ४ ॥ ॥ ३६९४ ॥

माझियेबुद्धीचाखुंटलाउपाय ॥ करसीलकायपाहेनतें ॥ १ ॥ सूत्रधारीतूंहेंसकळचालविता ॥ कासयाअनंता

भारवाहों ॥२॥वाहिलेसंकल्पनपवेचसिद्धि॥ येउंद्देह बुद्धीवरीनये॥ ३॥ तुकाम्हणेदुःखीकरितीतरंग॥ चिं तूंपांडुरंगआवरुनि॥ ४॥ ॥३६९५॥

देखिलेंतेंधरीनमनें॥ समाधानेंराहेन ॥ १ ॥ भावमा झीसांठवण॥ जगजीवनकळावया ॥२॥ वळवीनये कसरें॥ उत्तरयाकरुणेच्या॥ ३ ॥ तुकाम्हणेनयोरूपा कायबापाकरिसी॥ ४ ॥ ॥३६९६॥

वायांजायऐसा॥ आतांउगवावाफांसा ॥ १ ॥ माझें परिसावेंगाऱ्हाणें॥ सुखदुःखाचींवचनें ॥ २ ॥ हाचि आम्हाठाव॥ कांहींनिरोपायाभाव ॥ ३ ॥ तुकाम्हणे जर ॥ तुझातुजदेवाभार॥ ४ ॥ ॥३६९७॥

खादलेंचिखावेंवाटे॥ भेटलेंभेटेआवडी॥ १॥ वीटना हींपांडुरंगा॥ वाढेअंगाआर्तते॥२॥ ह्रदयाचीह्रावपुरे॥ परीहेंउरेचिंतन॥ ३॥ तुकाम्हणेपोटभरे ॥ परीतेउरेभू कपुढें॥ ४॥ ॥३६९८॥

सत्यआठवितांदेव ॥ जातोभेवपळोनी॥ १ ॥ नलगे कांहींकरणेंचिंता॥ धरीसत्तासर्वतो॥ २॥ भावेंभाव राहेपाईं॥ देवतईंसन्निध॥ ३ ॥ तुकाम्हणेकृष्णनामें॥ शीतळप्रेमेंसर्वांसीं॥ ४॥ ॥३६९९॥

ब्रीदजाचेंजगदानी॥ तोचिमनींस्मरावा॥ १॥समपा यकरकटीं॥ उभातटींभिवरेच्या॥ २ ॥पाहिलियावेद लावी॥ बैसेजीवींजडोनी॥ ३॥ तुकाम्हणेभक्तीकाजा धांवेलाजालवलाहें॥ ४॥ ॥३७००॥

माझीयामनाचीबैसलीआवडी ॥ अवसानघडीयेकी नेघे॥ १ ॥पायचित्तींरूपडोळांचीबैसलें ॥ चिंतनेंगो विलेंमुखसदा ॥ २ ॥ अवघियांचाझालाविसरहामा गें॥वेधहाश्रीरंगेंलावियेला॥ ३ ॥ तुकाम्हणेकानींआ इकिलीमात॥ तोचिझालाघातजीवपणा॥४॥३७०१
वळचिंतनाची ॥ २ ॥ बैसलोयेठाईंपोकारीलाधांवा ॥
सांकडेंतेंदेवानीवारावें ॥ ३ ॥ तुकाम्हणेआम्हीवेंचिलीं
उत्तरें ॥ घेतलींउदारेंसाचभावें ॥ ४ ॥ ॥ ४१३५ ॥
लाभपुढेंकरी ॥ घातनारायणवारी ॥ १ ॥ ऐशीभक्तां
चीमाउली ॥ करीकृपेचीसाउली ॥ २ ॥ मायबाळका
सी ॥ जीवभाववेंचीतैसी ॥ ३ ॥ तुकाम्हणेनाढ ॥ नाहीं
शरणागताआड ॥ ४ ॥ ॥ ४१३६ ॥
आपुलेंसेंकरूनिघ्यावें ॥ आश्वासावेंनाभीसें ॥ १ ॥ म्ह
णउनीधरिलेपाय ॥ अहोमायविठ्ठले ॥ २ ॥ येथेजरी
उरेचिंता ॥ कोणदातायाहुनी ॥ ३ ॥ कळंलासेशीणचिं
ता ॥ शमआतांकरावा ॥ ४ ॥ तुकाम्हणेजावीवसे ॥ म

जनसेवेगळा ॥ ५ ॥ ॥ ४१३७ ॥
तुजवीणकांहीं ॥ स्थीरराहेऐसेंनाहीं ॥ १ ॥ कळोंआलें
बहुतारीती ॥ पांडुरंगामाझेचित्तीं ॥ २ ॥ मोकलीली
आस ॥ सर्वभावेंझालोंदास ॥ ३ ॥ तुकाम्हणेतूंचिखरा ॥
येरवाऊंगापसारा ॥ ४ ॥ ॥ ४१३८ ॥
खोकरीआधणहोयपाकसिद्धी ॥ हेतोघडेकधींशकेची
ना ॥ १ ॥ खापराचेअंगींघासितांपरीस ॥ नपालटेखी
सकाढीलीया ॥ २ ॥ पालथेघागरींरीचवीतांजळ ॥ तु
काम्हणेखळऐसेकथे ॥ ३ ॥ ॥ ४१३९ ॥
नागलेदेखोनीचांगलेंबोले ॥ आपलेंवेंचूनीत्यापुढेंखु
ले ॥ १ ॥ अधमाचेवोंगळगुण ॥ उचितनणेंतोधर्मको
ण ॥ २ ॥ आर्तभूतानघालीपाण्याचाचूळ ॥ नमागेत्या
सदेईसाकरगूळ ॥ ३ ॥ येकासीधडनबोलेवाचा ॥ ये
कासीम्हणेमीतुझेबांधीचा ॥ ४ ॥ येकादेखोनिलपवी
भाकरी ॥ येकाआडपडोनीहोकांरी ॥ ५ ॥ तुकाम्हणगां
वपशु ॥ लाभेंवीणकेलाआयुष्याचानाशु ॥ ६ ॥ ४१४०
पिंडपोषकांच्याजळोज्ञानगोष्टी ॥ झणीदृष्टीभेटीनहो
त्यांची ॥ १ ॥ नाहींसंतचिन्हउमटलेंअंगीं ॥ उपदेशाला
गींपात्रझाला ॥ २ ॥ पोहोंनेणेकासेलावितोआणिका ॥
म्हणावेंत्यामूर्खांकाय आतां ॥ ३ ॥ शिणलेतेगेलेशीण
लियापासीं ॥ झालीत्यादोघांसीयेकगती ॥ ४ ॥ तुका
म्हणेदेवाअहोदीनानाथा ॥ दरुशनअनंतानकोत्याचें
॥ ५ ॥ ॥ ४१४१ ॥

संतचिन्हेंलेउनीअंगीं ॥ भूषणमिरवीतीजगीं॥ १॥पडि
लेदुःखाचेसागरीं ॥ वाहावलेभवपूरीं ॥ २ ॥ कामक्रो
धलोभचित्तीं ॥ वरीदावीतीविरक्ती ॥ ३ ॥ आशापाशीं
बांधोनचित्त ॥ म्हणतीझालोंआम्हीमुक्त ॥ ४ ॥ त्याची
लागतीसंगती ॥ झालीत्याचीतेचिगती ॥ ५ ॥ तुकाम्ह
णेशब्दज्ञानें ॥ जगनाडीयेलेंतेणें ॥ ६ ॥ ॥४१४२॥
दोषकरुनीआम्हीपतीतसिद्धझालों ॥ पावनमागोंआ
लोंब्रीदतूझें ॥ १ ॥ आतांपतितताराचेकींब्रीदसोडवा
वें ॥ यांतजेंपुरवेतेंचिसांगाआम्हासी ॥ २ ॥ उद्धारतुम
च्यानेंनव्हेतोश्रीहरी ॥ सोडाझडकरीब्रीदआतां ॥ ३ ॥
तेंब्रीदघेऊनीहिंडेदारोंदारीं ॥ सांगेंतुझीहरीकीर्तिज
गा ॥ ४ ॥ देवाहरविलेंब्रीदहेंसोडीलें ॥ पतितेंजिंकीलें
आम्हीदेवा ॥५॥ तुकाम्हणेआम्हीउठोंदैनेवरी ॥ विचा
राश्रीहरीतुम्हीआतां ॥६॥ ॥४१४३॥
कळोंआलेंतूझेंजिणें ॥ देवातूंमाझेंपोषणें ॥ १ ॥ वाट
पाहासीआमुची ॥ सत्तासंपत्तीतुजकैची॥ २॥ बोलवि
तांयावेंरूपा॥सदानिर्गुणीचलपा॥ ३॥तुकाम्हणेतूंपरदे
शी ॥ येथेआम्हासंगेजीशी ॥ ४ ॥ ॥४१४४॥
कांहींयेकतरीअसावाआधार॥ कासयानेंधीरऊपजा
वा॥ १ ॥म्हणविल्यासाठींकैसेंपडेरुजू॥धनीनाहींऊजू
सन्मुखतो ॥ २ ॥ वेंचल्यादिसांचाकोणवारीलेखा ॥
घालावाहासुखासुखाआम्ही ॥ ३ ॥ नाहींमनोगततों
वरीहेदेवा॥ तुकाम्हणेसेवानेहिजेतो ॥४॥ ॥४१४५॥

रामकृष्णऐसींउच्चारितांनामें ॥ नाचेनमीप्रेमेंसंतांपुढें ॥ १ ॥ कायघडेलतेंघडोयाशेवटीं ॥ लाभआणितुटीदेवजाणें ॥ २ ॥ चिंतामोहोआशाठेउनिनिराळी ॥ देइनहाळीजीवपाई ॥ ३ ॥ तुकाम्हणेकांहींउरोंनेदीउरी ॥ सांडीनहेथोरीवोवाळूनी ॥ ४ ॥ ॥४१४६॥

देवधरीनानासोंग ॥ नामश्रेष्ठपांडुरंग ॥ १ ॥ तोहागौळियाचेघरीं ॥ नामसारीतोमुरारी ॥ २ ॥ धन्ययशोदाप्रारब्ध ॥ नाचेअंगणींगोविंद ॥ ३ ॥ ऐसिभक्तांसाठींदेवें ॥ नानाधरियेलींनावें ॥ ४ ॥ ॥४१४७॥

आइत्याभागाधणीव्हावें ॥ कोणेंघ्यावेंमस्तकीं ॥ १ ॥ केणेंआलेंपंढरपुरा ॥ उधाराचेंलाभीक ॥ २ ॥ बाखराचिकरुनिरीती ॥ भरापोतींलवलाहीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेसंतांपाडे ॥ करूंपुढेंवाखती ॥ ४ ॥ ॥४१४८॥

जन्मोजन्मींतुझादास ॥ व्हावेंहेंचिमाझीआस ॥ १ ॥ पंढरीचावारकरी ॥ वारीचुकोंनेदीहरी ॥ २ ॥ संतसमागम ॥ अंगींस्थिरावेलप्रेम ॥ ३ ॥ स्नानचंद्रभागे ॥ तुकाम्हणेहेंचिमागें ॥ ४ ॥ ॥४१४९॥

कासयावाचोनिझालोंभूमिभार ॥ तुझ्यापाईंथारनाहींतरी ॥ १ ॥ जातांभलेंकायडोळियांचेंकाम ॥ जंवपुरुषोत्तमनदेखती ॥ २ ॥ कायमुखबिळश्वापदाचेंधांव ॥ नित्यतुझेंनावनुच्चारीतां ॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांपांडुरंगावीण ॥ नवांचवतांक्षणजीवभला ॥ ४ ॥ ॥४१५०॥

कांगाकोणीनम्हणेपंढरीचीआई ॥ बोलावितेपाहींचा

लनेटे ॥ १ ॥ तेव्हांमाझ्यामनाहोयसमाधान ॥ जायस
वेंशीणजन्मांतरींचा ॥ २॥ तुकाम्हणेमाझीहोइलमाऊ
ली ॥ वोरसोनीघालीप्रेमपान्हा ॥ ३ ॥ ॥ ४१५१ ॥
वेदअनंतबोलीला ॥ अर्थइतुकाचीसाधिला ॥ १ ॥ वि
ठोबासीशरणजावें ॥ निजनिष्ठेनामघ्यावें ॥ २ ॥ सक
ळशास्त्रांचाविचार ॥ अंतींइतुकाचिनिर्धार ॥ ३ ॥ अठ
रापुराणींसिद्धांत ॥ तुकाम्हणेहेंचिमात ॥४॥४१५२॥
मायेचामारिलाअंगींनाहींघाव ॥ दुःखेंतरीलवधढध
ढी ॥ १ ॥ नलभेहाकाळनसुटेहातींचा ॥ नबोलावेवा
चावेढावली ॥ २ ॥ नपवेधांवणेनपवेचिलाग ॥ नल
गेचिमागधरावया ॥ ३ ॥ भेणेंतरीअंगालावियेल्या
राखा ॥ तरीयासीवाखाकरितसे ॥ ४ ॥ तुकाम्हणेनेदी
हाकामारूंदेवा ॥ लोकांपाठीहेदालागलासे ॥ ५ ॥
॥ ४१५३ ॥
धिगतोदुर्जननाहींभूतदया ॥ व्यर्थतयामायाप्रसव
ली ॥ १ ॥ कठिणहृदयतयाचांडाळाचें ॥ जोनेणेंपराचें
दुःखकांहीं ॥ २ ॥ आपुलाहाप्राणतैसेसकळलोक ॥ न
धरीविवेकपशुकांहीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेसुखेंकापितसे
गळा ॥ आपुलियावेळारडतसे ॥ ४ ॥ ॥ ४१५४ ॥
गरुडावरीबैसोनियेतोजगजेठी ॥ त्याचेचरणींमीठी
घालाचला ॥ १ ॥ सांवळेंरूपडेंदेखीलेंलोचनीं ॥ शंख
चक्रदोन्हीशोभताहे ॥ २ ॥ पीतांबरझळकेहेचित्याची
खुण ॥ वांकीरुणझुणकरीताती ॥ ३ ॥ गरुडाचा

पेटयेतअसेनेटे ॥ कस्तुरीमळवटशोभताहे ॥ ४ ॥ पद
कयेकावळीशोभताहेकंठीं ॥ तुकाम्हणेमीठीघालूंच
ला ॥ ५ ॥ ॥ ४१५५ ॥

नाहींपाकहोतउफराटेचाली ॥ बोलिलीतीकेलीव्हावी
नीत ॥ १ ॥ नाहींमानूंयेतवाजटाचेबोल ॥ कोरडेचि
फोलचवीनाहीं ॥ २ ॥ तरुवरामधींकोठेआहेफळ ॥
चावटाबरळम्हणात्यासी ॥ ३ ॥ तुकाम्हणेकीतीठाकलीं
तातडी ॥ गव्हानाहींगोडीमांडपुऱ्या ॥ ४ ॥ ४१५६ ॥

झालीहरीकथारंगवोरसला ॥ उचितासीआलापांडुरं
ग ॥ १ ॥ वांटिताहेप्रेमउचिताचादाता ॥ घेईरेतूंआतां
धणीवरी ॥ २ ॥ प्रेमदेउनियांअवघींसुखीकेलीं ॥ जीं
होतींरंगलींविठ्ठलींतीं ॥ ३ ॥ तुकेहेदुर्बळदेखियेलेसं
तीं ॥ म्हणउनिपुढतीआणीयेले ॥ ४ ॥ ॥ ४१५७ ॥

संकल्पिलातुजसकळदेहभाव ॥ कोणयेकठावउरला
तेथे ॥ १ ॥ इंद्रियव्यापारजेंजेंकांहींकर्म ॥ सुखदुःखधर्म
सकळतुझें ॥ २ ॥ माझेंहितफारलागलाबिचार ॥ तुज
सर्वभारचालवणे ॥ ३ ॥ जोकांहींलौकिककरीसितो
तुझा ॥ अपमानपुजाकांहींतरी ॥ ४ ॥ तुकाम्हणेमीतों
राहिलोंनिश्चिंत ॥ तुजंकळेहीततैसेंकरीं ॥ ५ ॥ ४१५८ ॥

भयनाहींभेव ॥ अनुतापीनव्हताजीव ॥ १ ॥ जेथेदेवा
चीतळमळ ॥ तेथेकशाचाविटाळ ॥ २ ॥ उच्चारितांदो
ष ॥ नाहींउरोंदेतशेष ॥ ३ ॥ तुकाम्हणेचित्ता ॥ होयआ
वडीमिश्रिता ॥ ४ ॥ ॥ ४१५९ ॥

ध्यानींध्यातांपंढरीराया ॥ मनेंसहितपालटेकाया ॥ १ ॥
तेथेबोलाकैचीउरी ॥ माझेंमीपणझालाहरि ॥ २ ॥ चित्त
चैतन्यापडतांमिठी ॥ दिसेहरिरूपअवघीसृष्टी ॥ ३ ॥
तुकाम्हणेसांगोंकाय ॥ येकायेकिहरिवृत्तिमय ॥ ४ ॥
॥ ४१६० ॥

कोणाहिकोंढावेंहाआम्हाअधर्म ॥ जोजोपावश्रमतो
तोंहेव ॥ १ ॥ म्हणउनिचित्ताशिकविलेंवोजे ॥ आतांहें
चिकुजेंनबोलावें ॥ २ ॥ बोलविलेंजरीपरउपकारें ॥ जि
व्हेपापखरेंउपाधीचें ॥ ३ ॥ तुकाम्हणेजीवप्रारब्धआ
धीन ॥ कोणवाहेशीणकरुणाशोभा ॥ ४ ॥ ४१६१ ॥

देवतिळींआला ॥ गोडगोडजीवधाला ॥ १ ॥ साधलाहा
पर्वकाळ ॥ गेलाअंतरीचामळ ॥ २ ॥ पापपुण्यगेलें ॥ येका
स्नानेंचिखंडिलें ॥ ३ ॥ तुकाम्हणेवाणी ॥ शुद्धजनार्दन
जनी ॥ ४ ॥ ॥ ४१६२ ॥

कायउणेमजपांडुरंगापाईं ॥ रिद्धिसिद्धिपाईंवोळंगती
॥ १ ॥ कोणपाहेसुखानाशिवंताकडे ॥ तृष्णेचेबापुडे
नहोआम्ही ॥ २ ॥ सर्वसुखेआम्हीकेलिपावठणी ॥ पा
पपुण्यदोन्हीउडविलीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेघरींआणिलेंवै
कुंठ ॥ वसविलीपेंठवैष्णवांची ॥ ४ ॥ ॥ ४१६३ ॥

माझेमागणेंतेंकिती ॥ दातालक्ष्मीचापती ॥ १ ॥ तान्हे
ल्यानेंपीतांपाणी ॥ तेव्हांगंगानव्हेउणी ॥ २ ॥ कल्पतरु
झालादाता ॥ तेथेंपोटाचामागता ॥ ३ ॥ तुकाम्हणेसंतां
ध्यातां ॥ परब्रह्मआलेंहाता ॥ ४ ॥ ॥ ४१६४ ॥

अर्भकाचेसाठीं ॥ पंतेंहातींधरलीपाटी ॥ १ ॥ तैसेसंतज
गीं॥क्रियाकरुनीदाविति अंगीं २॥बाळकाचेचाली॥मा
ताजाणोनिपाउलघाली॥३॥तुकाम्हणेनाव॥ जनासा
ठींउदकींठाव॥४॥ ॥४१६५॥

जन्मोजन्मीचेंसंचित ॥ भेटीझालीअकस्मात ॥ १ ॥
आतांसोडितांसुटेना ॥ तंतुप्रीतिचातुटेना ॥ २ ॥ माझें
चित्ततुझ्यापाया ॥ मिठीपडलीपंढरीराया ॥ ३ ॥ तुका
म्हणेअंतीं ॥ तुझीमाझीयेकज्योती ॥ ४॥ ॥४१६६॥

सांगपांडुरंगामजहाउपाव ॥ जेणेंतुझेपावआतूढती ॥
॥ १ ॥ नकळेनिर्धारब्रह्मादिकांपार ॥ कायसाविचार
माझातेथे ॥ २ ॥ तुकाम्हणेआतांधरुनियांधीर ॥ राहूं
कोठवरमायबापा ॥ ३ ॥ ॥४१६७॥

कायफारजरीझालोंमीशाहाणा ॥ तरीनारायणानातू
डसी ॥ १ ॥ कायझालेतरीमानितीमजजन ॥ नातुढती
चरणतुझेदेवा ॥ २ ॥ कायझालेंतरीझालोंउदासीन ॥
तरीवर्मभिन्नतुझेंदेवा ॥ ३ ॥ कायझालेंजरीकेलेम्यां
सायास ॥ म्हणवितांदासभक्ततुझा ॥ ४ ॥ तुकाम्हणेतू
जदाविल्यावांचून ॥ तुझेंवर्मकोणजाणेदेवा ॥ ५ ॥
॥४१६८॥

जातांपंढरीचामार्ग ॥ कायवर्णूसुखमग ॥ १ ॥ पदे
लाभलक्षकोटी ॥ परब्रह्मींहोइलभेटी ॥ २ ॥ नामगर्ज
तयेतीसंत ॥ त्यांच्यादर्शनेंचिमुक्त ॥ ३ ॥ जोअलक्षब्र
ह्मादिकां ॥ आलासन्निधम्हणेतुका ॥ ४ ॥ ॥४१६९

सारासारविचारकराउठाउठी ॥ नामधराकंठींविठोबा
चें॥ १ ॥तयाचेंचिंतनेंनिरसेलसंकट ॥ तरालदुरघट
भवसिंधु॥ २॥ जन्मोनियांकुळींवाचेस्मराराम॥ घरीं
हाचीनेमअहर्निसी ॥ ३॥ तुकाम्हणेकोटीकुळेंतींपुनि
त ॥ भावेंगातांगीतविठोबाचें॥ ४॥ ॥ ४१७०॥
ज्याचीजयाआस ॥ त्याचेजवळीत्याचावास ॥ १ ॥
येरजवळींतदुरी॥ वत्ससांडीधेनुघरीं॥ २गोडीप्रीयापा
सीं॥ सुखउपजेयेरासी ॥ ३ ॥ तुकाम्हणेबोल॥ घढेत
याठाईंमोल॥ ४॥ ॥४१७१॥
द्रव्यघेउनियांकथाजरीकरी॥ तरीभंगोहरीदेहमाझा॥
॥ १ ॥माझीकथाकराऐसेंम्हणेकोणा॥ तरीनारायणा
जिव्हाझडो॥ २॥ सात्यतूंझालासीकायउणेंतुपें॥ आ
णिकभूतापेंकायमागों॥ ३॥ तुकाम्हणेसर्वसिद्धीतुझे
पाईं॥ तूंमाझागोसावीपांडुरंगा॥ ४॥ ॥४१७२॥
जरीहाहोकृपाकरीनारायण॥ तरीहेंचिज्ञानब्रह्महोय॥
॥ १ ॥ कोठोनियांकांहींनलगेआणावें॥ नलगेकोठेजा
वेंतरावया॥ २॥ जरीदेवकायधरिलपैंचित्तीं ॥ तरीहे
चिहोतीदिव्यचक्षु॥ ३॥ तुकाम्हणेदेवदावीलआपणा॥
तरीजीवपणाठावनाहीं॥ ४॥ ॥४१७३॥
पांडुरंगाकृपाळुवादयावंता॥ धरिलतोसत्तासकळही॥
॥ १ ॥ कांजीआम्हावरीआणिकांचीसत्ता॥ तूंहोसीअ
सतांजवळीके ॥ २ ॥ तुकाम्हणेपाईंकेलेंनिवेदन॥ उ
चितहेंदानकरींआतां॥ ३॥ ॥४१७४॥

रात्रंदिवसआम्हायुद्धाचाप्रसंग ॥ अंतर्बाह्यजगआ
णिमन ॥ १ ॥ जीवाहिअगोजपडतीआघात ॥ येउनि
यांनित्यानित्यवारु ॥ २ ॥ तुकाम्हणेतुझ्यानामाचिया
बळें ॥ अवघियाचेंकाळेंकेलेंतोंड ॥ ३ ॥ ४१७५ ॥
होईनखडेगोटे ॥ चरणरजसानेमोठे ॥ पंढरीचेवाटे ॥ सं
तचरणींलागेन ॥ १ ॥ आणिककायदुजें देशी ॥ मीमा
गेनतुजपासीं ॥ आठवितोंसुखेंशी ॥ ज्यासीनाहींभय
नाश ॥ २ ॥ होईनमोचेवाहाणा ॥ पाईसकळसंतजना ॥
मांजरसुकरसुणा ॥ जवळीशेषघ्यावया ॥ ३ ॥ सांडो
वापायरी ॥ वोहळबावीगंगातिरीं ॥ होईनतयावरी ॥
संतसज्जनचालती ॥ ४ ॥ लागेंसंतापाईं ॥ ऐसाठेवींभ
लतेठाईं ॥ तुकाम्हणेदेई ॥ धाकनाहींजन्माचा ॥ ५ ॥
॥ ४१७६ ॥

माझीयामनाचामजनिरधार ॥ नकरीउत्तरजनासवें
॥ १ ॥ आपुलेंकारणसाधाजीविचार ॥ करावाहाधीर
धरोनियां ॥ २ ॥ कायकरावीयाआणिकांच्यायुक्ति ॥
कायनव्हेभक्तिविठोबाची ॥ ३ ॥ येकपुढेंगेलेवाटशाऊ
नियां ॥ मारगतोवायांकोणसांडी ॥ ४ ॥ तुकाम्हणेमा
झीविठोबासीचिंता ॥ भेइनासर्वथानघडेते ॥ ५ ॥
॥ ४१७७ ॥

कासयासीव्हावेंआम्हीजीवन्मुक्त ॥ सांडोनियांथितंप्रे
मसुख ॥ १ ॥ वैष्णवांचादासझालानारायण ॥ काय
त्यामिळोनअसोसुखी ॥ २ ॥ कायत्यागांठीचेंपडिलेंसु

टोन ॥ उगेचिबैसोनधीरधरूं ॥ ३ ॥ सुखआम्हासाठींके लेंहेंनिर्माण ॥ निर्दैवतोकोणहाणेलाता ॥ ४ ॥ तुकाम्ह णेमजनलगेसायोज्यता ॥राहेनयासंतांसमागमें ॥५॥

॥४१७८॥

आवडेपंढरीभीमापांडुरंग ॥ चंद्रभागालिंगपुंडलिक॥ ॥ १ ॥ कामधेनुकल्पतरुचिंतामणी ॥ आवडीचीधणी पूरवीती ॥ ४ ॥ तुकाम्हणेजीवाथोरझालेंसुख ॥ नाठवे हेभूकताहानकांहीं ॥ ३ ॥ ॥४१७९॥

लाडेंभाकितोकरुणा ॥ तूंरेउदारांचाराणा ॥ १ ॥ करि सीआमुचासांभाळ ॥ तूंरेमाऊलीस्नेहाळ ॥ २ ॥ नाहीं चिंतारेआम्हासी ॥ तूंचिभारचालविसी ॥ ३ ॥ आम्ही झालोंउदासीन ॥ तूंचिकरीसीजतन ॥ ४॥ आम्हानाहीं जीवनाश ॥ तूंचिपुरविसीआस ॥ ५॥ तुकाम्हणेभलते सवें ॥ जातांमागेंमागेंधांवे ॥ ६ ॥ ॥४१८०॥

ऐकनारायणावचनमाझेंखरें ॥ सांगतोंनिर्धारेंतुजपा सीं ॥ १ ॥ नाहींभावमजपडलीलोकलाज ॥ राहीलेंसे काजतुझेपाईं ॥ २ ॥ वरदळभक्तिकरितोंनिमित्य ॥ प रिनाहींचित्ततुझेपाईं ॥ ३ ॥ जरीतुजकांहींकरणेंउचि त॥तरीमीपतिततुकाम्हणे ॥४॥ ॥४१८१॥

प्रपंचपरमार्थसंपादीनदोन्ही ॥ येकहिनिदानीनव्हेत्या सीं ॥ १ ॥ दोहींपेंवावरीठेऊंजातांहात ॥ होयअपघात शरीराचा ॥ २ ॥ तुकाम्हणेतयादोहींकडेधक्का ॥ शेवटीं तोनरकामाजीपडे ॥ ३ ॥ ॥४१८२॥

आम्हाभयधाककोणाचारेपाहें॥काळमस्यककायमानवदे ॥ १ ॥ आम्हासीतेकायचिंतायापोटाची॥माउलीआमुचीपांडुरंग॥२॥कायकरावींहकोणाचीमान्यता॥करितांअनंताकोणवारी॥३॥नाहींशीणआम्हाझालेंकवतुक॥पुनितहालोककरावया॥४॥ तुकाम्हणेखातोंआनंदाचेलाडू॥नकाचरफडूंघ्यारेतुम्ही॥५॥

॥४१८३॥

तुझेअंगभूत॥आम्हीजाणतोंउचित॥१ ॥येरावाढतसेजना॥ गूढारसेंनारायणा ॥ २ ॥ठावाथारामारा॥घरचीयासर्वेचोरा॥३॥तुकाम्हणेभेदा॥करुनिकरीतोंसंवादा॥४॥

॥४१८४॥

तांबियाचेंनाणेंनचलेखऱ्यामोलें॥जरीहिंडविलेंदेशोदेशीं॥ १ ॥ करणीचेंकांहींनमनेंसज्जना॥यावेंलागेमनाव्रद्धांचीया॥२॥हिरीयासारीखादिसेशीरगोळा॥पारखीतेडोळांनपाहाती॥३॥देउनियांभिंगकमाविलेंमोतीं॥पारखीयाहातींदेतांनये॥४॥तुकाम्हणेकायनटोनियांव्यर्थ॥आपुलेंहेंचित्तआपणाग्वाही॥५॥

॥४१८५॥

चित्तमिळेत्याचासंगरुचिकर ॥ क्षोभवितेदूरतेचीभले॥१॥ऐसिपरंपराआलिसेचालत ॥भलत्याचीनीतत्यागावरी॥ २ ॥होकापितापुत्रबंधुकोणीतरी॥ विजातिसंग्रहींधरूंनये॥३॥तुकाम्हणेसत्यपाळावेंवचन॥अन्यथाआपणकरूंनये॥४॥ ॥४१८६॥

आपुलियाकसोटीशुद्धराखीकारण ॥ आगीनेंभूषण अधिकपुटा ॥ १ ॥ नाहींकोणासवेंबोलणेंलागत ॥ निश्चिंतीनेंचित्तसमाधान॥२॥लपविलेंतेंहिढेंकरेउमटे॥ खोटियाचेंखोटेंउरफोडी ॥ ३ ॥ तुकाम्हणेनिंदास्तुति दोन्हीवाव ॥ आपुलालाभावकळोंयेतो ॥४॥ ४१८७

आणिकांच्याघातेंमानितांसंतोष ॥ सुखदुःखदोषअंगालागे ॥ १ ॥ ऐसेंमनिवाहोंनयेतसंकल्प ॥ करूंनये पापभांडवल ॥ २ ॥ किल्बीषाचीचित्तींराहातांकाचणी॥ अंगींतेजडूनिठावजाळी ॥ ३ ॥ तुकाम्हणकोपें घडेपुण्यक्षय ॥ होणारतेंहोयप्रारब्धींचें ॥ ४ ॥

॥४१८८॥

अज्ञानाचिभक्तिइच्छितिसंपत्ती ॥ तयाचियेचित्तीं बोधकैंचा ॥ १ ॥ अज्ञानाचीपूजाकामिकभावना॥ तयाचियाध्यानादेवकैंचा ॥ २ ॥ अज्ञानाचेंकर्मफळीं ठेवीमन ॥ निष्कामसाधनतयाकैंचे ॥ ३ ॥ अज्ञानाचें ज्ञानविषयावरीध्यान ॥ ब्रह्मसनातनतयाकैंचे ॥ ४ ॥ तुकाम्हणेजळोऐसियांचेंतोंड ॥ अज्ञानाचेंबंडवाढवीती ॥ ५॥ ॥४१८९॥

गूळमाखुनियांदगडठेविला ॥ वरदिसेभलालोकाचारी ॥ १ ॥ अंतरींविषयाचेंलागलेंपैंपिसें ॥ बाहिरल्यावेषेंभुलवीलोकां ॥२॥ ऐसियादांभीकाकैसीहरिसेवा॥ मनेंचिसद्भावाकोणेंकाळीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेयेणेंकैंचा होयसंत ॥ विटाळलेंचित्तकामक्रोधें ॥ ४ ॥ ४१९० ॥

आयुष्यवेचूनिकुटुंबपोषीलें ॥ कायहितकेलेंसांगबा
पा॥१॥फुकाचाचाकरझालासिकाबाडी॥नाहींसुख
घडीभोगावया ॥ २॥ दुर्लभमनुष्यजन्मकष्टेंपावला
सी॥ दिल्हाकुटुंबासीकामभोग ॥ ३ ॥ तुकाम्हणेऐसें
आयुष्यनासलें॥पापतेंसांचलेंपतनासी॥४॥४११९
अनंतलक्षणेवानितांअपार॥संतांचेंतेंघरसांपडेना॥
॥ १ ॥ जयाघरींसंतराहातीआपण ॥ तेंतुम्हाठिकाण
आतूडेना॥ २॥ ठीकाणधरूनिपाड्यावेंतेसंत॥उगाचि
आक्रांतकरूंनय ॥ ३॥ संतहोउनियांसंतासिपाहावें॥
तरीचतरावेंतुकाम्हणे॥४॥ ॥४१२०॥
संतांचापढीयाहोकैशापरिलाहो॥ नामाचाआठवोकै
साराहे॥१॥हेचिथोरचिंतालागलीमनासीं॥निजतां
निद्रेसीनलगेडोळा॥२॥जेवितांजेवणींनलगेधडगो
ड॥वाटतेंकाबाडविषयसूख॥३॥ऐसियासंकटींपा
वरूपानिधि॥लावींसंतपदींप्रेमभाव॥४॥तुकाम्हणे
आम्हीनेणोकांहींहित॥तुजविणअनाथपांडुरंगा॥५॥
॥४१२१॥
पंढरीचावासधन्यतोचिप्राणी॥अमृताचिवाणीदिव्य
देहो ॥ १ ॥ मूढमतिहीनदुष्टअविचारी ॥ तेहोतीपंढरी
दयारूप ॥ २॥ शांतिक्षमाअंगींविरक्तिसकळ॥नैरा
श्यनिर्मळनारीनर ॥ ३॥ तुकाम्हणेनाहींवर्णअभिमा
न॥अवघेचिजीवनमुक्तलोक॥४॥ ॥४१२२॥
जेणेंतुळसीकासभावेंधरियेली॥त्याचीनाहींकेलीसांडी

देवा ॥ १ ॥ कायमाझाभोगआहेतोनकळे ॥ सुखेंतुम्ही
डोळेझांकादेवा ॥ २ ॥ रावरंकतुम्हासारिखेचिजाण ॥
नाहींथोरसानातुम्हापासीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेतुम्हीआपं
गिलेंभक्तां ॥ माझीयासंचिताकृपानये ॥ ४ ॥ ४११५ ॥
देखीचेंतेंज्ञानकरावेंतेंकाई ॥ अनुभवनाहींआपणासी
॥ १ ॥ इंद्रियाचेगोडीटिकलींबहुतें ॥ सोडिनामागुतें
आवेरना ॥ २ ॥ युक्ताचाआहारनीतीचावेव्हार ॥ वैरा
ग्यतेंसारतरावया ॥ ३ ॥ नावनावरीतां घालाघालीवर ॥
तैसातोपसरअहंतेचा ॥ ४ ॥ तुकाम्हणेबुद्धिआपुलेआ
धीन ॥ करूंनारायणआतुडेते ॥ ५ ॥ ॥ ४११६ ॥
जेणेंदेवातुम्हीकराअंगिकार ॥ हानाहींविचारमजमा
जी ॥ १ ॥ आतांदोहींपक्षींलागलेंलंछन ॥ देवभक्तपण
लाजविलें ॥ २ ॥ येकांतींयेकलेंमनहेंनिश्चळ ॥ नराहे
चपळयेकेठाईं ॥ ३ ॥ महत्वाचिपाईंपडलीश्रृंखळा ॥
बांधविलागळास्नेहाहातीं ॥ ४ ॥ शरीरसोकलेंदाविये
लेंसुखा ॥ कदान्नतेंमूखारुचिनेदी ॥ ५ ॥ तुकाम्हणेझा
लाअवगुणाचाथारा ॥ वाढविलीनिद्राआळसबहु ॥
॥ ६ ॥ ४११७ ॥
नरनारीबाळेंअवघेनारायण ॥ ऐसेंमाझेंमननकरींदेवा ॥
॥ १ ॥ नकोकामक्रोधद्वेशनिंदाद्वंद्व ॥ अवघागोविंद
निःसंदेह ॥ २ ॥ असावेंम्यांसदाविषयींविरक्त ॥ काया
वाचाचित्ततुझेपाईं ॥ ३ ॥ करूनियांसाहेपुरवींमनोर
थ ॥ व्हावेंकृपावंततुकाम्हणे ॥ ४ ॥ ॥ ४११८ ॥

आपुल्यापोटासाठीं॥करींलोकांचियागोष्टी॥१॥जेणें
घातलेंसवसारीं॥विसरलातोचिहरि॥ २ ॥पोटाघा
लीअन्न॥नम्हणेपतीतपावन॥३॥मीकोठीलआणि
कोण ॥ हेंनकळेज्यालागुन ॥ ४ ॥ तुकाम्हणेनसरेस्तु
ती॥करितोभाटत्रिजगतीं॥५॥ ॥४११९॥
स्वयेंआपणचिरिता॥रंडपुढिलांच्याहिता ॥ १ ॥सखे
हेनातैसेंझालें॥बोलणेंतितुकेंवायांगेलें॥२॥सुखसा
गरींनघेवस्ती॥अंगींज्ञानपणाचिमस्ती॥३॥तुकाम्हणे
गाढवलेंका॥जेथेजाइलतेथेठोका॥४॥ ॥४२००॥
जगींकीर्तीव्हावी॥म्हणोनिझालासीगोसावी॥१॥ब
हुकेलेंपाठांतर॥वर्मराहिलेंतेंदूर॥ २ ॥चित्तींनाहींअ
नुताप॥लटिकेंभगवेंस्वरूप॥३॥तुकाम्हणेरेसिंदळी
च्या ॥व्यर्थश्रमविलीवाचा॥४॥ ॥४२०१॥
म्हणविसीदावीनअवस्था ॥ तैसेंनकोरेअनंता॥१॥
होउनिसगुणसाकार॥रूपदाखवीसुंदर॥२॥मृगज
ळाचीयापरी॥ तैसेंनकरावेंहरी॥३॥तुकाम्हणेहरी॥
कामानयेबाल्याल्कारीं॥४॥ ॥४२०२॥
प्राक्तनाच्यायोगेंआळशावरीगंगा॥स्नानकायजगा
करूंनये ॥ १ ॥ उभीकामधेनुमांगाचेअंगणीं॥तिसी
कायब्राह्मणींवंदूंनये ॥ २ ॥ कोडीयाचेहातेंपरीसेंहोय
सोनें॥ अपवित्रम्हणोनघेऊंनये॥३॥ यातिहीनज्ञा
नागोवींचामोकाशी ॥ त्याच्यावचनासीमानूंनये॥
॥४॥श्रावारूढतुकामुद्राविठोबाची॥ नमनीतपाचीं

तोंहेंकाळीं ॥ ५ ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ॥ ४२०३ ॥
बोलिलोंउत्कर्षे ॥ प्रेमरसेंदास्यत्वें ॥ १ ॥ साचकरीना
रायणा ॥ जयाशरणगेलातो ॥ २ ॥ समर्थतोआहेऐ
सा ॥ धरिलीइच्छापुरवीतो ॥ ३ ॥ तुकाम्हणेलडिवाळा
चें ॥ द्यावेंसाचेंकरुनीयां ॥ ४ ॥ ॥ ४२०४ ॥
वीचाकेलाठोंबा ॥ म्हणोनीनामेंतोविठोबा ॥ १ ॥ कां
रेनेणात्याचेंनाव ॥ कायवेदासीनाहींठावें ॥ २ ॥ शेष
स्तुतीप्रवर्तला ॥ जिव्हाचीरुनिपलंगझाला ॥ ३ ॥ तु
काम्हणेसत्ता ॥ ज्याचिकाळाचीयेमाथा ॥ ४ ॥ ४२०५
कलयुगामाजीथोरझालेंबंड ॥ नष्टलोकलंडझालेफा
र ॥ १ ॥ नधरीतिसोयनपुसतीकोणा ॥ येतेंजैसेंमना
तैसेंचाले ॥ २ ॥ सज्जनांचावाराठेकोनेदीद्वारा ॥ ऐसी
थापामरातारीकोण ॥ ३ ॥ विश्वासतयाचाबैसेनाको
ठेंही ॥ स्तुतीनिंदापाहीजीवींधरी ॥ ४ ॥ तुकाम्हणेकैसें
केलेंनारायणें ॥ जाणावेंहेंकोणेंतयावीण ॥ ५ ॥
॥ ४२०६ ॥
गुरुम्यांकेलाघरवासी ॥ माझ्याचुकल्यादोनीम्हैशी ॥
॥ १ ॥ आपुलीबुटबुटघ्यावी ॥ माझीपरतापरतद्यावी ॥ २
तुझामंत्रघेतांकानीं ॥ माझ्यापेवांतशिरलेंपाणी ॥ ३ ॥
गुरुम्यांभाग्यासाठींकेला ॥ कांहींफळासीनाहींआला
॥ ४ ॥ तुझामंत्रनव्हेवरा ॥ माझाबैलचुकलामोरा ॥ ५
तुकाम्हणेऐशानरा ॥ परिस्नानझोंबेखापरा ॥ ६ ॥ ४२०७
करावासंकोचआपणाभोंवता ॥ होवतेबहुतासुखकी

जे ॥ १ ॥ देवाचीतेपूजाभूतांचेंपाळण ॥ मत्सरतोशीण
बहुतांचा ॥ २ ॥ रुसावेंफुगावेंआपुलीयावरी ॥ उरलातो
हरीसकळही ॥ ३ ॥ तुकाम्हणेसंतपणयाचीनावें ॥ ज
रीहोयजीवसकळांचा ॥ ४ ॥ ॥ ४२०८ ॥
भावभक्तिवादेंकरावेंकीर्तन ॥ आशाबद्धमनकरूंनये
॥ १ ॥ अन्नपाणिधनद्रव्यनारायण ॥ विठ्ठलावांचोन
बोलोंनये ॥ २ ॥ सप्रेमेंकरावेंदेवाचेंकीर्तन ॥ भयघासां
डूनशरीराचें ॥ ३ ॥ तरीमगजोडेविठ्ठलनिधान ॥ केली
याकीर्तनसिद्धीपावे ॥ ४ ॥ देवजोडलीयातयाकायउ
णें ॥ तुकाम्हणेमनधीटकरा ॥ ५ ॥ ॥ ४२०९ ॥
चोरासीचांदणेंवेश्येसीसेजार ॥ परिसेसीखापरकाय
होय ॥ १ ॥ दुधाचेओरणींवेरिलेपाषाण ॥ कदाकाळीं
जाणपाकनव्हे ॥ २ ॥ तुकाम्हणेजरीपूर्वपुण्यसिद्धी ॥
तरिचहेबुद्धीसंतसंगीं ॥ ३ ॥ ॥ ४२१० ॥
रोगियामिष्टान्नमर्कटाचंदन ॥ कांगांसिलेपनकर्पूराचें
॥ १ ॥ निर्नासीकाजैसानावडेआरीसा ॥ मूर्खालागिं
तैसाशास्त्रबोध ॥ २ ॥ दासतुकाम्हणेविठ्ठलेंउदारें ॥ अ
ज्ञानअंधारेंदूरिकेलें ॥ ३ ॥ ॥ ४२११ ॥
मथनासाठींधर्माधर्म ॥ त्याचेंवर्मनवनीत ॥ १ ॥ परि
तेंचिघाटूंनये ॥ आलेंजायनासुनी ॥ २ ॥ सांभाळावें
बरावर ॥ वर्मदूरनवजावें ॥ ३ ॥ तुकाम्हणेधालेंपोट ॥
मगबोभाटचाटणीं ॥ ४ ॥ ॥ ४२१२ ॥
माझाघातपातअथवाहितकार ॥ अवघाविचारतु

हातीं ॥ १ ॥ ठेउनिजीवभावतुझेंठाईंचित्त ॥राहिलोंनि वांतपांडुरंगा ॥ २॥ चित्ताचाचाळकबुद्धीचाजनीता॥ कायनाहींसत्तातुझेहातीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेकायकरीसि तेंपाहीन ॥ ठेविसीराहीनसुखेंतेथें ॥ ४ ॥ ४२१३ ॥

संतपावलेसाजीरी ॥ गंगाआलीआम्हावरी ॥ १ ॥ जेथे पडेरजधुळी ॥ तेथेकरावीआंघोळी ॥ २ ॥ सेतूबंदवा राणसी ॥ अवघींतीर्थेंतयापासीं ॥ ३॥ तुकाम्हणधन्य झालों ॥ संतसागरींमिळालों ॥ ४ ॥ ॥ ४२१४ ॥

नघडेमायबापाबाळकांचाघात ॥ आपणादेखतहोऊं नेदी ॥ १ ॥ कामींमनिंचिंतावाहूभयधाक ॥ कायनव्हे येककरितांतूज॥ २॥ वर्मजाणेंत्याच्याहिताचाउपाय॥ ताहानभूकवाहेकडियेखांदी ॥ ३॥ तुकाम्हणेतूंगाकृपा वंतभारी ॥ ऐसेंमजहरीकळोंआलें ॥ ४ ॥ ॥ ४२१५॥

करावेंकीर्तन ॥ मुखींगावेहरिचेगुण ॥ १ ॥ मगकांहीं नव्हेबाधा ॥ कामदुर्जनाचीक्रोधा ॥ २ ॥ शांतिखर्गहा तीं ॥ काळासीतेनागविती ॥ ३॥ तुकाम्हणेदातासखा॥ ऐसाअनंतासारिखा ॥ ४ ॥ ॥ ४२१६॥

तुझीकीर्तिसांगोंतुजपुढेंजरी ॥ ब्रह्मांडाहिवरीमाईनाते ॥ १ ॥ मेरुचिलेखणीसागराचीशाई॥ कागदहामहीनपु रेचि॥ २॥ अनंतअपारआपंगिलेभक्त॥ माझेंचिसंचित बोढवेना ॥ ३ ॥ तुकाम्हणेतुम्हाबोलनाहींदेवा ॥ पामरें म्यांसेवाकेलीनाहीं ॥ ४ ॥ ॥ ४२१७॥

माझीसर्वचिंताआहेविठोबासी ॥ मीत्याच्यापायासीं

विसंबेना ॥ १ ॥ नविसंबेंतरीक्षणयेकचित्तीं ॥ जीव
लगमूर्तिसांवळीती॥ २॥ विसरतांमूर्तिअंतरलीजोढी॥
लक्षालक्षकोडीप्राप्तनोव्हे ॥ ३ ॥ तुकाम्हणेमाझ्यावि
ठोबाचेपाय ॥ संजिवनीराहेत्दद्‌यांत ॥ ४ ॥ ४२१८ ॥
साधनाच्याकोटी ॥ केल्याआटीहोत्यात्या ॥ १ ॥ देवकृ
पाकरीजरी ॥ होयउजरीस्वरूपीं ॥ २ ॥ केलेहोतीव्यर्थ
श्रम ॥ चित्ताउपरमनहोतां ॥ ३ ॥ तुकाम्हणेकळोंआलें ॥
सर्वझालेंआपरूप ॥ ४ ॥ ॥ ४२१९ ॥
तुजकायकरूंमजयेकसार ॥ अमृतसागरनामतुझें ॥ १ ॥
कायउणेंआम्हातयाचियेपोटीं ॥ गोवितांहेकंठींकाम
धेनु ॥ २ ॥ नोळखेनान्हुलेंमायऐसीकोण ॥ बोरसेदे
खोनशोकत्याचा ॥ ३ ॥ जोनाहींदेखीलायाचकंनय
नीं ॥ तोपावेघेउनिलज्यादान ॥ ४ ॥ नामासाठींप्राणसां
डियेलारणीं ॥ शूरतेभांडणीनफीरती ॥ ५ ॥ तुकाम्हणे
आम्हीगातांगीतींभला ॥ भेटुनिविठ्ठलाकायचाड ॥ ६ ॥
॥ ४२२० ॥
कृपेचेसागरहेचिसाधुजन ॥ तिहींकृपादानकेलेंमज ॥
॥ १ ॥ बोबडेवाणीचाकेलाअंगिकार ॥ तेणेमाझास्थि
रकेलाजीव ॥ २ ॥ तेणेसुखेंमनस्थीरझालेंठाईं ॥ संतीं
दिल्हापाईंठावमज ॥ ३ ॥ नाभीनाभीऐसेंबोलिलेवच
न ॥ तेंमाझेंकल्याणसर्वस्वेंही ॥ ४ ॥ तुकाम्हणेझालों
आनंदेंनिर्भर ॥ नामनिरंतरघोषकरूं ॥ ५ ॥ ४२२१ ॥
भक्तीचेंतेंवर्मजयाचियेहातीं ॥ तयाघरींशांतीदयास

मा ॥ १ ॥ अष्टमहासिद्धीबोळंगतीद्वारीं ॥ नवजातीदू
रीदवडितां ॥ २ ॥ तेथेंदुष्टगुणनमिळेनिःशेष ॥ चैत
न्याचावासझालामाजी ॥ ३ ॥ संतुष्टहेंचित्तसदासर्व
काळ ॥ तुटलीहळहळत्रिगुणांची ॥ ४ ॥ तुकाम्हणेतेथे
कायतोसंदेह ॥ आमुचेंगौरवआम्हीकरूं ॥ ५ ॥ ४२२२
साचहाविठ्ठलसाचहेंकरणें ॥ संतजेवचनेंबोलियेले ॥
॥ १ ॥ साचतेंस्वहीतसाचतेप्रचीत ॥ साधवेदेंनीतसां
गितली ॥ २ ॥ तुकाम्हणेघेतीसाधसाचभावें ॥ लटिकें
वर्मठावेंनाहींत्यांसी ॥ ३ ॥ ॥ ४२२३ ॥
संगेंवाढशीणसंगेंवाढेभजन ॥ त्रिविधहेंजनबहुदेवा
॥ १ ॥ याचीमुळेंआलासंगाचाकंटाळा ॥ दिसतातीडो
ळांनानाछंद ॥ २ ॥ येकविधभावराहावयाठाव ॥ ने
दीहासंदेहराहोचित्तीं ॥ ३ ॥ शब्दज्ञानीहितनेणतीआपु
लें ॥ आणिकदेखिलेनावडेत्यां ॥ ४ ॥ तुकाम्हणेआतांये
कलेंचिभलें ॥ बैसोनीउगलेंराहावेंतें ॥ ५ ॥ ४२२४ ॥
तुझेंवर्मआम्हाकळोंआलेंसुखें ॥ संतांचियेमुखेंपांडुरं
गा ॥ १ ॥ अवघाचीनटवाउगाचीपसारा ॥ चेइलातूं
खरातूंचियेक ॥ २ ॥ म्हणउनिदेहबुद्धीनाशीवंत ॥ ना
तळेत्याचित्तनेदावया ॥ ३ ॥ सोयहेलागलीपुढिलांची
वाट ॥ पावलेजेनीटतूजपासीं ॥ ४ ॥ तुकाम्हणेनाहीं
कोणासवेंकाज ॥ बोलावयामजअंतरींचें ॥ ५ ॥
॥ ४२२५ ॥
पुण्यपापठावनाहींदुःखसुखा ॥ हानीलाभशंकानास

लिया ॥ १ ॥ जितामरणआलेंआपपरगेलें ॥ मूळहेंछे दिलेंसंसाराचें ॥ २ ॥ अंधःकारज्योतीकुळधर्मयात ॥ ठावनाहींसत्यअसत्यासी ॥ ३ ॥ जनवनभिन्नअचेत चळण ॥ नाहींदुजेंपणठावयासी ॥ ४ ॥ तुकाम्हणेदेह वाहिलाविठ्ठलीं ॥ तेव्हांचीघडलीसर्वपूजा ॥ ५ ॥ ४२२६

संकोचितजीवमहत्वाच्याभारें ॥ दास्यत्वचिबरेंवहुवाटे ॥ १ ॥ कळाविजीमाझीआवडीहेसंतां ॥ देणेंतरीआतांहेंचीद्यावें ॥ २ ॥ तुमचेंकरणेंपावविलोंदेवा ॥ म्हणउनिहेवाह्याचिकरीं ॥ ३ ॥ विनऊनितुकावंदितोचरण ॥ लेखारजरेणचरणींच्या ॥ ४ ॥ ॥ ४२२७ ॥

केसींवमैंआम्हाआसोनियांहातीं ॥ कांहोऊनेणतीअशाभुली ॥ १ ॥ पोटाळूनिपायकवळूनिउभा ॥ रूपापघनाआहालोंनेदी ॥ २ ॥ तुजमींआपुलेघालिनसंपुटीं ॥ श्रीमुखतेंदृष्टीन्याहाळीन ॥ ३ ॥ तुकाम्हणेबहुसांडियेलींमतें ॥ आपुल्यापुरतेंधरुनिठेलों ॥ ४ ॥ ॥ ४२२८ ॥

सारिनतेंआतांयेकाचिभोजनें ॥ वारिनमागणेंवेळोंवेळां ॥ १ ॥ शेवटींचाघासगोडकरिमाते ॥ अगेकृपावंतेपांडुरंगे ॥ २ ॥ वंचूनयेआतांकांहींचप्रकार ॥ धाकट्याचेथोरझाल्यावरी ॥ ३ ॥ तुकाम्हणेपोटींबहुझालाहाव ॥ कांहींनेदीठावउरोंमागें ॥ ४ ॥ ॥ ४२२९ ॥

देवकैंचातयादुरी ॥ भाकिवरीकरुणा ॥ १ ॥ आळेविल्यानलगेधीर ॥ मायजाणेंलेंकुरें ॥ २ ॥ नावेवरीज्याचाभार ॥ पैलपारजवळीत्या ॥ ३ ॥ जातांपरदेशी

का॥ झालालोकांवेगळा॥ ४॥ ॥४२३०॥

भक्तिज्याचिथोडी॥ पूर्णविषयाचीगोडी ॥ १ ॥ तोनर
नव्हेपाही॥ खरजाणावातोदेही ॥ २ ॥ भजनपूजनहि
नेणें॥ कायस्वरूपासीजाणे ॥ ३ ॥ तुकाम्हणेत्याला॥
भोवंडुनिबाहेरघाला॥ ४॥ ॥४२३१॥

समुद्रहापितावंधुहाचंद्रमा॥भगीनितेरमाशंखाचिया
॥१॥ मेहुणाजयाचाद्वारकेचाहरि॥ शंखदारोदारींभी
कमागे॥ २॥ दृष्टहेंजाणावेंआपुलेंसंचित ॥ तुकाम्हणे
मातऐसीआहे॥ ३॥ ॥४२३२॥

भावाचियासंगेंबहुचनाडले ॥ कळिकाळपाडिलेतों
डघसी॥ १ ॥ तयाभवसंगेंगुंतलासिवायां॥ धनपुत्र
जायांभुलोंनको॥ २॥ जेजेघडीजायतेतेकायखाय॥
प्राणतरणोपायकायकेला॥ ३ ॥ तुकाम्हणेकरीसर्वही
तूंत्याग॥ अर्पीहिंसर्वांगजगदीशीं॥ ४॥ ॥४२३३

जागाघरटीफिरती ॥ तस्कराचीदिवसराती ॥ १ ॥ नि
दसुरेंनाडती ॥ गेलीअसोमागेंकिती ॥ २ ॥ हटकरी
सकळजन॥ वस्तुकरारेजतन ॥ ३ ॥ हुशारव्हाठाईं॥
नीजनिजलियापाहीं ॥ ४॥ सावचितअसेखरा॥ ला
भघेउनिजायघरा॥५॥ तरळबोंबेउतराई॥ राखाआ
पुलियाभाई ॥६॥ हरिच्यानामेंघालुनजागा॥ तुकाम्ह
णेहुशारहोगा॥ ७॥ ॥४२३४॥

संतांनिसरताकेलोंतैसेपरी ॥ चंदनतेबोरीव्यापियेली
॥१ ॥गुणदोषयातिनविचारीकांहीं॥ ठावदिल्हापाईं

आपुलिया ॥ २ ॥ तुकाम्हणेआलेंसमर्थाच्यामना ॥ त
रिहोयराणारंकत्याचा ॥ ३ ॥ ॥ ४२३५ ॥

चित्तींतुझेपायडोळांरूपाचेंध्यान ॥ अखंडितमुखींना
मकीर्तिवर्णावेगुण ॥ १ ॥ हेंचियेकतुम्हादेवामागणेदा
तारा ॥ उचिततेंकरामाझाभावजाणोनि ॥ २ ॥ खुंटली
जाणीवमाझेंबोलणेंआतां ॥ करूंयाविकराबाळका
चिहेचिंता ॥ ३ ॥ तुकाम्हणेआतांदेऊंनकोअंतर ॥ नक
ळेपुढेंआतांकायबोलोंविचार ॥ ४ ॥ ॥ ४२३६ ॥

संतांच्यापादुकाघेइनमोचेखांदीं ॥ हातीटाळदिंडीना
चेनपुढें ॥ १ ॥ भजनविधिनेणेंसाधनउपाय ॥ सकळ
सिद्धिपायहरिदासांचे ॥ २ ॥ ध्यानगतिमतिआसनेंस
माधी ॥ हरिनामगोविंदींप्रेमसुख ॥ ३ ॥ नेणतानिर्ल
ज्जनेणोनादभेद ॥ सुखेंहागोविंदगोडगीतीं ॥ ४ ॥ स
र्वजोडीमजगोतआणिवित्त ॥ तुकाम्हणेसंतमहंतपा
य ॥ ५ ॥ ॥ ४२३७ ॥

हरिजनाप्राणविकिलीहेकाया ॥ अंकिलामीतयांघरीं
झालों ॥ १ ॥ म्हणियेसत्वरकरिनसांगतां ॥ घेइनमीदे
तांशेषत्यांचें ॥ २ ॥ आसकरुनियांराहिनअंगणीं ॥ उ
च्छिष्टाचीधणीघ्यावयासीं ॥ ३ ॥ चालतांतेमार्गींचर
णींचेरच ॥ उडतींसहजघेइनआतां ॥ ४ ॥ दुरीत्यापा
सुनिनवजेद्वडितां ॥ तुकाम्हणेलाताघेइनअंगीं ॥ ५
॥ ४२३८ ॥

पुण्यफळलेंबहुतांदिसां ॥ भाग्यउदयाचाठसा ॥ झा

लोंसन्मुखतोकैसा ॥ संतचरणापावलों ॥ १ ॥ आजि
फिटलेंमाझेंकोडें॥ भवदुःखाचेंसांकडें॥कोंदाटलेंपुढें॥
परब्रह्मसांवळें॥२॥आलिंगनेंसंतांचिया॥दिव्यझाली
माझीकाया॥मस्तकहापायां॥वरित्याच्याठेवितों॥३॥
तुकाम्हणेधन्यझालों॥ सुखेंसंतांचियाधालों ॥ लोटां
गणींआलों॥पुढेंभारदेखोनी॥ ४॥ ॥४२३९
आतांआम्हाभयनाहींबाकोणाचें ॥ बळविठोबाचेंझा
लेंअसे॥ १ ॥ धीरदिल्हाआम्हायेणेंपांडुरंगें॥ नपांगों
यापांगेसंसाराच्या॥ २॥ तुकाम्हणेमाझाकैवारीहादे
व॥ नाहींभयभवत्याच्यासंगें॥ ३॥ ॥४२४०॥
भक्तिआम्हीकेलीसांडूनिउद्वेग ॥ पावलोंहसंगेंसुखया
चे॥१॥ सुखआम्हाझालेंधरीतांयाचासंग ॥ पळाले
उद्वेगसांडूनियां॥ २॥ तुकाम्हणेसुखबहुझालेंजीवा॥
घडलीयासेवाविठोबाची॥ ३॥ ॥४२४१॥
शास्त्रज्ञहेज्ञातेअसतीबहुत ॥ परीनाहींचित्तहाताआं
लें॥१॥ क्षणयेकासाठींनधरवेधीर॥ तेणेंहारघुवीरअं
तरेतो॥ २॥ तोळाभारसोनेंरतीभाररांई॥ मेळवील्या
पाहींनाशहोतो॥ ३ ॥ हरीचेअंकीततुकाम्हणेविरळा
गेत॥ तयांसीअच्युतकृपाकरी॥ ४॥ ॥४२४२॥
इंद्रियांसीनेमनाहीं॥ मुखींराममम्हणुनिकाई ॥ १ ॥ जे
विमाशीसवेंअन्न॥सुखनेदीतेंभोजन॥२॥कीर्तनकरा
वें॥ तैसेंकरुनिदावावें॥३॥ हेतोअंगींमाझींचिन्ह॥गा
इलेंवेस्याच्याढव्यानें॥ ४॥ तुकाम्हणेरागा॥संतशिवों

नेदीअंगा ॥ ५ ॥ ॥ ४२४३ ॥
नलगेदेवातुझेंआम्हासीवैकुंठ ॥ सायुज्यतापटनलगे
मज ॥ १ ॥ देईतुझेंनामसदासर्वकाळीं ॥ मागणेंवनमा
ळीहेंचितुज ॥ २ ॥ नारदतुंबरउद्धवप्रल्हाद ॥ बळिरुक्मां
गदनामध्याती ॥ ३ ॥ सिद्धमुनिगणगंधर्वकिन्नर ॥
करितातीगजररामनामीं ॥ ४ ॥ तुकाम्हणेहरिदेईतुझें
नाम ॥ अखंडितप्रेमहेंचिद्यावें ॥ ५ ॥ ॥ ४२४४ ॥
पावलोंप्रसादइच्छाकेलीतैसी ॥ झालेंयाचित्तासीस
माधान ॥ १ ॥ मायबापमाझाउभाकृपादानीं ॥ विठेस
मजोडोनिपादांबुजें ॥ २ ॥ सांभाळासियेऊंनेदीहाउणि
व ॥ अधिकारगौरवराखेतैसें ॥ ३ ॥ तुकाम्हणेसर्वअंत
र्बाह्यआहे ॥ जयातैसाराहेकवटाळुनि ॥ ४ ॥ ४२४५ ॥
होतेंतैसेंपाईकेलेंनिवेदन ॥ अंतरलादीनबहुतहोतो ॥
॥ १ ॥ संबोखोनिकेलेंसमाधानचित्त ॥ वोगरुनिभा
तेंप्रेमरस ॥ २ ॥ नामरत्नमणिकरुनिभूषण ॥ अळंका
रमंडणमाळादिल्ही ॥ ३ ॥ तुकाम्हणेसुखझालेंनिराम
य ॥ नामीनामसोयनिमग्नता ॥ ४ ॥ ॥ ४२४६ ॥
स्थीरावलीवृत्तीपांगुळलाप्राण ॥ अंतरीचिखुणपाऊ
नियां ॥ १ ॥ पुंजाळलेनेत्रझालेआर्धोन्मिलित ॥ कंठ
सद्गदीतरोमांचआले ॥ २ ॥ चित्तचाकाटलेंस्वरूपामाझा
री ॥ ननिघेबाहेरीसुखावलें ॥ ३ ॥ सुनीळप्रकाशउद
यझालादीन ॥ अमृताचेंपानजीवनकळा ॥ ४ ॥ शशि
सूर्याझालिजीवेंबोवाळणी ॥ आनंददाटणीआनंदा

षि ॥ ५ ॥ तुकाम्हणेसुखेंप्रेमेसींडुल्लत ॥ विरालोंनिश्चिं
तनिश्चितीनें ॥ ६ ॥ ॥४२४७॥

संसाराचीकोणगोडी ॥ दिल्हीजोडीकरूनि ॥ १ ॥ नि
ष्ठुरतूंबहूदेवा ॥ पुरेहेवानम्हणवी ॥ २ ॥ पाहोनियांक
मंडोळां ॥ निराळातोवर्जिना ॥ ३ ॥ तुकाम्हणेतुजमा
झें ॥ म्हणतांवोझेंफुकट ॥ ४ ॥ ॥ ४२४८ ॥

बौध्यअवतारमाझीयाअदृष्टा ॥ मौनसुखेंनिष्ठाधरि
येली ॥ १ ॥ लोकाचियेसाठींशामचतुर्भूज ॥ संतांसवें
गूजबोलतसा ॥ २ ॥ आलेंकलियूगमाझीयासंचिता ॥
ढाळांहाकलितांनपढसी ॥ ३ ॥ म्यांचितुझेंकायकेलें
नारायणा ॥ कांनयेकरुणातुकाम्हणे ॥ ४ ॥ ४२४९ ॥

मुखींविठ्ठलाचेंनाम ॥ मगकैंचाभवश्रम ॥ १ ॥ चाल
तांबोलतां ॥ खातांजेवितांनिद्राकरितां ॥ २ ॥ सुखेंअ
सावेंसंसारीं ॥ मगजवळीचहरी ॥ ३ ॥ मुक्तिवरीलभ
क्तिजाण ॥ अखंडमुखींनारायण ॥ ४ ॥ मगदेवभक्त
झाला ॥ तुकातुकीउतरला ॥ ५ ॥ ॥ ४२५० ॥

अपराधीमाझेंकरुनियाजिणें ॥ सांडीकोण्यागुणेंकेली
देवा ॥ १ ॥ उदारहेकीर्तिआहेजगामाजी ॥ तेकांअसे
आजीपालटली ॥ २ ॥ आळवितोंपरीनपुरेचिधांव ॥
डंचितहेंदेवनाहींआम्हा ॥ ३ ॥ तुकाम्हणेकांबामुळिंच
व्यालासी ॥ ऐसेंकांनेणसीपांडुरंगा ॥ ४ ॥ ४२५१ ॥

प्रेमजडलेंतुझेपाईं ॥ आणिकनसुचेमजलाकांहीं ॥ १ ॥
रात्रिदिवसतुझेंध्यान ॥ तेंचिमाझेंअनुष्ठान ॥ २ ॥ ना

मापरतेंनेणेदुजें ॥ ऐसेंकळलेंमजलानिज ॥ ३ ॥ तुका म्हणेअंतकाळीं ॥ आम्हासोढवींतात्काळीं ॥ ४ ॥

॥४२५२॥

तुझेपायमाझीकाशी॥ कोणजायमाझेंकाशी॥१॥तुझें रूपतेंचीध्यान॥ तेंचिमाझेंअनुष्ठान ॥ २ ॥तुझेचरणते चिगया ॥झालेंगयावर्जनदेहा॥३॥तुकाम्हणेसकळती र्थं ॥ तुझेपाईंवसतियेथें ॥ ४ ॥ ॥४२५३॥

क्षुधातृषाकांहींसर्वथानावडे ॥ पाहावयाधांवेकोल्हा टासी ॥ १ ॥ कथेसिसाक्षेपेंपाचारीलेंजरी ॥ म्हणेमा झ्याघरींकोणीनाहीं ॥ २ ॥ बळात्कारेंजरीआणिलेंकथे सी॥ निद्राघेलोडासीटेंकोनियां ॥ ३ ॥ तुकाम्हणेथुंका त्याच्यातोंडावरी॥जातोयमपूरीभोगावया॥ ४ ॥

॥४२५४॥

श्रीरामसखाऐसाधरीभाव॥ मीपणाचाठावपुसीमना ॥१॥ शरणनिरंतरम्हणेतूंगोविंदा ॥ वाचेलावीधंदाना रायण ॥ २॥यापरीतेंसोपेंनाहींरेसाधन ॥ व्हाहातसेआ णतुझीमना ॥ ३॥ नकोकांहींकरूंआळसअंतरीं ॥ जपीं निरंतरींरघुपति ॥ ४॥ तुकाम्हणेमोठालाभनरदेहीं ॥ दे हिचविदेहीहोतीनामें ॥ ५॥ ॥४२५५॥

सर्वांपरीतुझेगुणगाऊंउत्तम ॥ तुझेठाईंप्रेमराहोमाझें ॥ १ ॥ माउलीपरीसआहेसीउदार ॥ तरीकांनिष्ठुरमन केलें ॥ २ ॥ गजेंद्राकारणेंकेलेंत्वांधांवणें ॥ तरीकांनि र्वाणपाहातोसी ॥ ३ ॥ प्रल्हादासंकटींरक्षीलेंत्वांदेवा ॥

तरीकांकेशवासांडीकेली ॥ ४ ॥ अन्याईअजामीळतो झालापावन ॥ ऐसेंहेंपुराणहाकामारी ॥ ५ ॥ तुकाम्हणे माझेथोरअपराध ॥ नामकरीछेदक्षणमात्रें ॥ ६ ॥

॥४२५६॥

आतांवाटोंनेदीआपुलेंहेंमन ॥ नसोडीचरणविठोबाचे ॥ १ ॥ दुजयाचासंगलागोंनेदीवारा ॥ आपुल्याशरीरावरूनियां ॥ २ ॥ यावेंजावेंआम्हीदेवाचिसांगातें ॥ मागुनिकरीतहेंचीआलों ॥ ३ ॥ कायवायांगेलोंकरुनिउद्वेग ॥ उभापांडुरंगमागेंपुढें ॥ ४ ॥ तुकाम्हणेप्रेममागतोंआगळें ॥ येथेभोगूंफळेंवैकुंठींचीं ॥ ५ ॥

॥४२५७॥

आतांजावेंपंढरीसी ॥ दंडवतविठोबासी ॥ १ ॥ चंद्रभागातीरीं ॥ आम्हीनाचोंपंढरपुरीं ॥ २ ॥ जेथेसंतांचीदाटणी ॥ त्याचेघेऊंपायवणी ॥ ३ ॥ तुकाम्हणेआम्हीबळी ॥ जीवदिल्हापायांतळीं ॥ ४ ॥

॥४२५८॥

आम्हानरकाजातां ॥ काययेइलतुझ्याहातां ॥ १ ॥ शरणआलियाचेंकायहेंचिफळ ॥ विचारादयाळकृपानिधी ॥ २ ॥ तुझेंपावनपणनचलेआम्हासी ॥ ऐसेंहृषिकेशीकळोंआलें ॥ ३ ॥ आम्हीदुःखपावोंजन्ममरणव्यथा ॥ कायतुझ्याहातायेतअसे ॥ ४ ॥ तुकाम्हणेतुम्हीखादलीहोरडी ॥ आम्हीधरलीशेंडीनाम[illegible] ॥ ५ ॥

४२५९॥

पांडुरंगापाहाखादलीसेरंडी ॥ परीना[illegible]सोडीधरिलीआ

म्ही ॥ १ ॥ आतांसंतांनींकरावीपंचाईत ॥ कोणहाफ
जितखोरयेथे॥ २॥ कोणाचाअन्याययेथेआहेस्वामी॥
गर्जतसोंआम्हीपातकीही ॥ ३ ॥ याचेंपावनपणसोड
वाजीतुम्ही ॥ पतितपावनआम्हीआहोंखरे ॥ ४ ॥ आ
म्हीतंवआहोंअन्याईसर्वथा ॥ याचीपावनकथाकैसी
आहे ॥ ५ ॥ तुकाम्हणेआम्हीमेलोंतरीजाणा ॥ परीतु
मच्याचरणानसोडावें ॥ ६ ॥ ॥ ४२६० ॥
घालुनियांमध्यवर्ती ॥ दाटुनियांउपदेशदेती ॥ १ ॥ ऐ
सेपोटभरूसंत ॥ तयांकईंचाभगवंत ॥ २ ॥ रांडापो
रांतेगोविती ॥ वर्षासनेंतेलाविती ॥ ३ ॥ जैसेबोलती
निरोपणी ॥ तैसीनकरितीकरणी ॥ ४ ॥ तुकाम्हणेत
यां ॥ तमोगुणीयांचीक्रिया ॥ ५ ॥ ॥ ४२६१ ॥
वैभवतेंराज्यसंपत्तिटाकावी ॥ उदरार्थमागावीमधोक
री ॥ १ ॥ आपुलेंतेंआधींकरावेंस्वहित ॥ ऐसीआहेनीत
स्वधर्माची॥ २॥ वर्णकूळयातीयाचाअभिमान॥ त्यजा
वासन्मानलौकीकाचा ॥ ३ ॥ तुकाम्हणेराहेयेकाकी
निःशंक ॥ देऊनियांहाकंकंठींकाळ ॥ ४ ॥ ॥ ४२६२॥
हातपायमिळोनीमेळा ॥ चलाम्हणतीपाहोंडोळा॥ १॥
देखणीनव्हेदेखणीकैसी ॥ सकळाचादेखणाडोळाचि
असे ॥ २ ॥ डोळ्यांचाडोळापाहोंगेला ॥ तुकाम्हणेतो
पाहोंठेला ॥ ३ ॥ ॥ ४२६३ ॥
कीर्तिचराचरींआहेतैसीआहे ॥ भेटोनित्वांकायघ्या
वेंआम्हा ॥ १ ॥ बैऊनियांबैसतीउपवासी ॥ हाहट

आम्हासीनाहींवेसा ॥ २॥ तातडीतयांनींकेलीविटंब
णा॥आम्हानारायणाकायउणे ॥ ३॥ नाहींमुक्तिचा
डवासवैकुंठींचा॥पिकलीसेवाचारामनामें ॥ ४॥ तु
काम्हणेकायव्हावेंउतराई ॥ जीवठेऊंपाईंसंतांचिया
॥५॥ ॥४२६४॥

धावोनियांआलोंपाहायाश्रीमुख ॥ गेलेंमाझेंदुःखज
न्मांतरींचें॥१॥ऐकिलेंहोतेंजेंतैसेंचिपाहिलें॥मनस्थी
रावलेंतुझ्यापाईं ॥ २ ॥ तुकाम्हणेमाझीइच्छापूर्णझा
ली॥कांहींनराहिलीवासनाहे॥ ३॥ ॥४२६५॥

गांवलौकिकाहिलावियेलेंपिसें ॥ कायसांगोंऐसेंतुज
पासीं॥ १॥ तोंडकाळेंकेलेंफिरविलेंमज ॥ नाहींधरी
लीलाजपांडुरंगा ॥ २॥ कायतुजपाशींसांगोंहेंगाऱ्हा
णें॥मगकायजीणेंतुझेंमाझें॥ ३॥ कोणासाठींआतां
करावासंसार॥कलिवारावारआणीकांची ॥ ४ ॥ तु
काम्हणेआम्हीमोडलाघरचार॥ धरियेलाधीरतुझेपा
ई॥ ५॥ ॥४२६६॥

जीवेंजीवनेणेपापिसारीखाची॥ नळीदुजियाचीकापु[illegible]॥ १॥आम्हानारायणसर्वांघटींआहे ॥ पशु
[illegible]कायकळोंनये॥२॥देखताहीजीवहुंबरेवरडत ॥
निष्ठुराचेहातवाहातीकैसे ॥ ३ ॥ तुकाम्हणेतयांचांडा
ळासीनर्क॥भोगितीअनेकमहादुःखें॥४॥४२६७॥

साधनाचेकष्टमोठे॥भयवाटेथोर[illegible]॥ मुखेंगावें
भावेंगीत॥सर्वहीतबैसल्या ॥ २॥ [illegible]कर्मदा

न ॥ तनमननिश्चळ ॥ ३ ॥ तुकाम्हणेआत्मनिष्ठा ॥ मा
गेचेष्टामनाची ॥ ४ ॥ ॥४२६८॥

आणिकनकाकरूंचेष्टा ॥ व्हालकष्टावरपडे ॥ १ ॥ सुखें
कराहरिकथा ॥ सर्वथाहेतारील ॥ २ ॥ अनाथाचाना
थदेव ॥ अनुभवसत्यहा ॥ ३ ॥ तुकाम्हणेबहुतारीति ॥
धराचित्तींसकळ ॥ ४ ॥ ॥४२६९॥

मनींभावआहेकांहीं ॥ तेथेंदेवयेतीपाईं ॥ १ ॥ पाहा
जनाईसुंदरी ॥ तेथेंदेवपाणीभरी ॥ २ ॥ शुद्धपाहोनि
यांभाव ॥ त्याचेह्रदईंवसेदेव ॥ ३ ॥ तुकाम्हणेविठोबा
सी ॥ ठावदेईचरणापाशीं ॥ ४ ॥ ॥४२७० ॥

भागल्याचेंतारुंशिणल्यासाउली ॥ भुकेलियाघालीप्रे
मपान्हा ॥ १ ॥ ऐसीहेमाउलीअनाथाचेविशीं ॥ सुखा
चीचराशीपांडुरंग ॥ २ ॥ सकळांसन्मुखकृपेचीयादृष्टी ॥
पाहेनबहुभेटीउतावीळ ॥ ३ ॥ तुकाम्हणेयेथेआतांउर
कैंचा ॥ अनंतांजन्मींचाशीणभाग ॥ ४ ॥ ४२७१ ॥

कायपुण्यआहेसांगा ॥ पांडुरंगातुम्हापें ॥ १ ॥ आमुचि
तोंनपुरेइच्छा ॥ पिताऐसामस्तकीं ॥ २ ॥ कैसि[illegible]होय
सांडी ॥ करुणातोंडींउच्चारे ॥ ३ ॥ आश्चिर्यंचि[illegible]का
येनायकावैकुंठींच्या ॥ ४ ॥ ॥४२[illegible]॥

चित्तगुंतलेंप्रपंचें ॥ झोलेयेदममतेचे ॥ १ ॥ आतांसो
डवींपांडुरंगा ॥ आलेनिवारितेअंगा ॥ २ ॥ गुंतलीचा
वटी ॥ नाभि[illegible]ळीतुटी ॥ ३ ॥ तुकाम्हणेचाली ॥ पु
ढेंवाटखोळं[illegible] ॥ ४ ॥ ॥४२७३॥

कितीयेकादिवसीं ॥ बुद्धिझालीहोतीऐसी ॥ १ ॥ कांहीं
करावेंस्वहित ॥ तोहेंनघडेउचित ॥ २ ॥ अवलंबुनीभी
क ॥ लाजसांडिलीलौकिक ॥ ३ ॥ तुकाम्हणेदीन ॥ झा
लोंमश्यकपणेंहीन ॥ ४ ॥ ॥ ४२७४ ॥
आतांबरेंझालें ॥ सकळिचकळोंआलें ॥ १ ॥ मजठेवीं
इहलोकीं ॥ आलोंतेव्हांझालीचुकी ॥ २ ॥ युगमहिमा
ठावा ॥ नव्हताऐसापुढेंदेवा ॥ ३ ॥ तुकाम्हणठेवी ॥ भो
गासाठींनिरयगावीं ॥ ४ ॥ ॥ ४२७५ ॥
आतांमजतरीसांगशीलभावें ॥ कायम्यांकरावेंऐसेंद
वा ॥ १ ॥ वर्मचुकलीयानव्हेतेंकारण ॥ केलाहोयशीण
अवघाची ॥ २ ॥ तुकाम्हणेनकोपाहोंहेंनिर्वाण ॥ देईंकृ
पादानयाचकासी ॥ ३ ॥ ॥ ४२७६ ॥
परीआतांमाझीपरिसावीविनंती ॥ रुखुमाईच्यापती
पांडुरंगा ॥ १ ॥ चुकलीयाबाळानमारवेजीवें ॥ हिततें
करावेंमायबापीं ॥ २ ॥ तुकाम्हणेतूझाम्हणतातिमज ॥
आतांआहेलाजहेचीतुम्हा ॥ ३ ॥ ॥ ४२७७ ॥
पापाचीयामूळें ॥ झालेंसत्याचेंवाटोळें ॥ १ ॥ दोषझाले
बळीवंत ॥ नाहींऐसीझालीनीत ॥ २ ॥ मेघपडोभिती ॥
पिकेंसांडियेलीक्षिती ॥ ३ ॥ तुकाम्हणेकांहीं ॥ वेदावी
र्यशक्तीनाहीं ॥ ४ ॥ ॥ ४२७८ ॥
ऐसादुस्तरभवसागर ॥ नेणेंकैसाउतरूंपार ॥ १ ॥ काम
क्रोधादिसावजेंथोर ॥ दिसतातिभयंकर ॥ २ ॥ वास.
नेच्यालहरीयेती ॥ उद्वेगहेलावेवैसती ॥ ३ ॥ मायमम

तेचेभोंवरे ॥ घेति भयानकफेरे ॥ ४ ॥ तरावयायेकयु
क्तिअसे ॥ तुकानाम नावेमधींबैसे ॥ ५ ॥ ॥ ४२७९ ॥
कासवीचेंबाळवाढेरूपादृष्टी ॥ दुधानाहींभेटीअंगसं
ग ॥ १ ॥ नयेदाखवितांप्रेमबोलतांसांगतां ॥ अनुभ
वीचित्ताचित्तजाणें ॥ २ ॥ पोठामध्येंकोणेंसांगितलेंस
र्पा ॥ उपजतलपाम्हणउनी ॥ ३ ॥ सांगोंनेणेंपरीजाणे
गोढक्षार ॥ अंतरींविचारत्यासीठावा ॥ ४ ॥ तुकाम्ह
णेहेंतोंविचारावेंमनीं ॥ आणिकभल्यांनीपुसोंनये ॥
॥ ५ ॥ ॥ ४२८० ॥
देवजडलाजाइनाअंगा ॥ यासिकायकरूंसांगा ॥ १ ॥
वरकडदेवयेतीजाती ॥ हादेवजन्माचासांगाती ॥ २ ॥ अं
गिभरलेंदेवाचेंवारें ॥ देवजगचीदिसेसारें ॥ ३ ॥ भूतन
बोलेनिरुतें ॥ कांहींकेल्यानसुटेतें ॥ ४ ॥ जीवखादला
दैवतें ॥ माझायेणेंमहाभूतें ॥ ५ ॥ तुकाम्हणेवाडेकोडे ॥
उभेपुंडलिकापुढें ॥ ६ ॥ ॥ ४२८१ ॥
हरिदासांचियेघरीं ॥ मजउपजवाजन्मांतरीं ॥ १ ॥ म्ह
णसिकांहींमागा ॥ हेंचिदेगापांडुरंगा ॥ २ ॥ संतांलोटां
गणीं ॥ जातांलाजोंनकामनीं ॥ ३ ॥ तुकाम्हणेअंगीं ॥
शक्तिदेईनाचेरंगीं ॥ ४ ॥ ॥ ४२८२ ॥
लटिक्याचेआवतणेंजेविलीयासाच ॥ कायत्यावि
श्वासतोचीखरा ॥ १ ॥ कोल्हाटिणीलागेआकाशींखे
ळत ॥ तेकायपावेलअमरपद ॥ २ ॥ जळमंडपाचेघो
डेराऊतनाचती ॥ तेकायत्गतीयुद्धालागीं ॥ ३ ॥ तुका

म्हणेतैसेमतवादियाचेंजीणें ॥ दिसेलाजिरवाणेंबोल
तांची ॥ ४ ॥ ॥ ४२८३ ॥
येकम्हणतिआम्हीदेवचीपैझालों ॥ ऐसेंनकाबोलोंप
डालपतनीं ॥ १ ॥ येकम्हणतिआम्हीदेवाचींपैंरूपें ॥ त
रीतुमचियाबापेंनचुकेजन्म ॥ २ ॥ देवेंउचलिलीसशि
ळामेदिनी ॥ तुमचेनीगोणीनुचलवे ॥ ३ ॥ देवेंमारीयेले
दैत्यदानवमोठे ॥ तुमचेनीनतुटेतृणमात्र ॥ ४ ॥ राया
विठोबाचेंपदजोअभिलाषी ॥ पातकाचीराशीतुकाम्ह
णे ॥ ५ ॥ ॥ ४२८४ ॥
कायआम्हीकेलेंऐसें ॥ नुद्धरिसेंसांगावें ॥ १ ॥ हरण
कोल्हीवैकुंठवासि ॥ कोणत्यासीअधिकार ॥ २ ॥ ग
जानांव्या सरोवरी ॥ नाहींउरीविचारिलें ॥ ३ ॥ तुका
म्हणेगणिकानष्ट ॥ माझेकष्टत्याहुनी ॥ ४ ॥ ४२८५ ॥
पांडुरंगाआतांएकहेविनंती ॥ बहुमाझेचित्तींभयवाटे
॥ १ ॥ नाहींआइकिलेंसंतांचियामुखें ॥ तेंयामजलोकें
भेडसाविलें ॥ २ ॥ विष्णुदासागतिनाहींतरावया ॥ म्ह
णतीलवायांव्यर्थगेले ॥ ३ ॥ धिक्कारीतीमजकरितांकी
र्तन ॥ तेकाळींचासीणकायसांगों ॥ ४ ॥ तुकाम्हणेमज
वाटतेंउदास ॥ कायकरूंयासपांडुरंगा ॥ ५ ॥ ४२८६ ॥
गुणाआलाविटेवरी ॥ पीतांबरधारिसुंदर ॥ १ ॥ डोळे
कानत्याचेठाईं ॥ मनपाईंराहोहें ॥ २ ॥ निवारोनिजाय
माया ॥ ऐसीछायाजयाची ॥ ३ ॥ तुकाम्हणेसमध्या
न ॥ तेहेचरणसकुमार ॥ ४ ॥ ॥ ४२८७ ॥

रंगीं रंगे नारयणा ॥ उभा करितों कीर्तना ॥ १ ॥ हातीं
घेऊनी यांविणा ॥ कंठिं राहें नारायणा ॥ २ ॥ देखिली
जे मूर्ति ॥ माझ्या हृदईं ची विश्रांति ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा ॥
देईं कीर्तनाचा हेवा ॥ ४ ॥ ॥ ४२८८ ॥

तुझा भरंवसा आम्हा ॥ फार होता पुरुषोत्तमा ॥ १ ॥ भव
सागरसंकटीं ॥ तारिसील जगजेठी ॥ २ ॥ नाम आ
दित्याचें झाड ॥ त्याचा नपडे उजेड ॥ ३ ॥ सील गणीचें
सोनें ॥ त्यासि गाहण ठेवी कोण ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा ॥
ब्रीद सोडुनियां ठेवा ॥ ५ ॥ ॥ ४२८९ ॥

आवडी धरोनि आलेती आकारा ॥ केला हा पसारा ज
यासाठीं ॥ १ ॥ तें मी तुझें नाम गाईन आवडी ॥ क्षणयेक
घडी विसंबेना ॥ २ ॥ वर्म जाणावें हा मुख्य धर्म सार ॥ अ
वघे प्रकार तया पोटीं ॥ ३ ॥ वेगळ्या विचारें वेगळा
ले भाव ॥ धरावया ठाव बहु नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे घा
लूं इच्छेचिये पोटीं ॥ कवळूं धाकुटी मूर्ति जीवें ॥ ५ ॥
॥ ४२९० ॥

जयासी नावडे संतांचा तो संग ॥ जाण तो मांग ज
न्मांतरींचा ॥ १ ॥ अपवित्र वाचा जातीचा अधम ॥
आचरण धर्म नाहीं तया ॥ २ ॥ मंजुळ वदनीं बचनागा
वी कांडी ॥ शेवटीची घडि जीवप्राणा ॥ ३ ॥ तुका म्हणे
ज्याचा पिता नाहीं शुद्ध ॥ ययासी गोविंद अंतरला ॥ ४
॥ ४२९१ ॥

थोरालागलीसेचट्ट ॥ धरीवाटदेउळाची ॥ १ ॥ सांगि
तलेंनेघेकानीं ॥ दुर्जेमनींविठ्ठल ॥ २ ॥ कामघरींनक
रींधंदा ॥ येथेसदादुश्चित ॥ ३ ॥ आमुचेकुळींनव्हतेऐ
से ॥ हेचिपिसेनिवडले ॥ ४ ॥ लौकिकाचीनाहींलाज ॥
माझेमजपारिखे ॥ ५ ॥ तुकाम्हणेनकांजाणे ॥ त्याव
चनेंदुष्टाचे ॥ ६ ॥ ॥ ४२९२ ॥
देवाबोलेंआतांबोला ॥ त्वांकांधरिलाअबोला ॥ १ ॥
भेऊंनकोदेईंभेटी ॥ तुकापडिलासेसंकटीं ॥ २ ॥ तुझ्या
जीवींचेंमीजाणे ॥ म्हणसिमुक्तिआम्हादेणे ॥ ३ ॥ तु
काम्हणेनलगेकांहीं ॥ चित्तराहेतुझेपाईं ॥ ४ ॥ ४२९३ ॥
यमधर्मआणिब्रह्मादिकदेव ॥ त्यांचापूर्णभावतुझे
पाईं ॥ १ ॥ करितीस्मरणपार्वतीशंकर ॥ तेथेमीकिंक
रकोणीकडे ॥ २ ॥ सहस्रमुखेंसीघोषफणिवराचा ॥
मजकिंकराचापाडकाय ॥ ३ ॥ चंद्रसूर्यआणिसर्वता
रांगणें ॥ करितीभ्रमणप्रदक्षीणा ॥ ४ ॥ तुकाम्हणेत्यां
सीस्वरूपकळेना ॥ तेथेमजदीनाकोणपुसे ॥ ५ ॥
॥ ४२९४ ॥
विठोबाचेपाईंजीवम्यांठेविला ॥ भक्तिभावेंकेलादेव
ऋणी ॥ १ ॥ देवमाझाऋणीआहेसाहाकारी ॥ परस्परें
वारीभवभय ॥ २ ॥ भवभयडोहींबुडोंनेदीपाहीं ॥ धरू
नियांबाहीतारीमज ॥ ३ ॥ तारियेलेदासपडिल्यासंक
टीं ॥ विषकेलेंपोटींअमृतमय ॥ ४ ॥ अमृतातेंसेवीतसे.
नामरसा ॥ तोडीयेलाफासाभवबंधाचा ॥ ५ ॥ बंधना

चाफासाआम्हीकायनेणों ॥ पायतुझेजाणोंपद्मनाभ ॥ ६ ॥ पद्मनाभानाभीकमळींब्रह्मादिक ॥ त्रैलोक्यनाथ कम्हणविसी ॥ ७ ॥ म्हणविसीदेवादासांचाअंकित ॥ मनाचासंकेतपाहोनियां ॥ ८ ॥ पाहोनियांदृढनिश्चय तयाचा ॥ तोचिदाससाचाकवळिक ॥ ९ ॥ जवळिक झालाब्रह्मीसुखावले ॥ मार्गदाखविलेमूढजना ॥ १० मूढजनामाजीदासतुझामूढ ॥ कासतुझीदृढधरियेली ॥ ११ ॥ धरीयेलेतुझेपायरेविठ्ठला ॥ तुकासुखीझाला तुझ्यानामें ॥ १२ ॥ ॥ ४२९५ ॥

बहुक्लेशीझालोंयाहोनरदेहीं ॥ रूपादृष्टीपाहींपांडुरंगा ॥ ॥ १ ॥ पांडुरंगासर्वदेवांचीयादेवा ॥ घ्यावीमाझीसेवा दीनानाथा ॥ २ ॥ दीनानाथब्रीदत्रिभुवनींतुझें ॥ माय बापावोझेंउतरावें ॥ ३ ॥ उतरींसत्वरपैलथडीनेई ॥ पूर्ण सुखदेईपायापाशीं ॥ ४ ॥ पायापाशींमजठेवींनिरंतर ॥ आशातुझीफारदिवसकेली ॥ ५ ॥ केलीआसतुझीवाट मीपाहातों ॥ निशीदीनींध्यातोंनामतुझें ॥ ६ ॥ नामतु झेंगोडस्वभक्तांआवडे ॥ भक्तांलागींकडेखांदाघेसी ॥ ॥ ७ ॥ घेसीखांद्यावरीखेळविसीलोभें ॥ पाउलतेंशो भेविटेवरी ॥ ८ ॥ विटेवरीउभादेखिलासीडोळां ॥ मना चासोहळापुरविसी ॥ ९ ॥ पुरविसीसत्वत्रैलोक्यस्वा मिया ॥ मिठीघालीपायांतुकाभावें ॥ १० ॥ ४२९६ ॥

येकवेळेतरीजाईनमाहेरा ॥ बहुजन्मफेराझाल्यावरी ॥ ॥ १ ॥ चित्ताहेबैसलीअविटआवडी ॥ पालटती घडी न

येकिती ॥ २ ॥ करावेंतेंकरीकारणशरीर ॥ अंतरींत्या
धीरजीवनाचा ॥ ३ ॥ तुकाम्हणेतरीहोईलविलंब ॥ प
रिमाझालाभरवराझाला ॥ ४ ॥ ॥ ४२९७॥
सांगत्वांकोणासितारिलें ॥ संतांवेगळेंउद्धरिलें ॥ १ ॥
संतशब्दउपदेशी ॥ मगतूंहोम्हणसी ॥ २॥ तुकाम्हणेना
हींतुझाउपकार ॥ संतांचाउच्चारकरुंआतां ॥ ३ ॥
॥ ४२९८॥
उमारमायेकसरी ॥ वाराणसीतेपंढरी ॥ १ ॥ दोघेसारि
खेसारिखे ॥ विश्वनाथविठ्ठलसखे ॥ २ ॥ तेथेअसेभा
गीरथी ॥ येथेजाणाभीमरथी ॥ ३ ॥ वाराणसीत्रिशु
ळावरी ॥ सुदर्शनावरीपंढरी ॥ ४ ॥ मनकर्णिकामनो
हर ॥ चंद्रभागासरोवर ॥ ५ ॥ वाराणसीभैरवकाळ ॥
पुंडलिकक्षेत्रपाळ ॥ ६ ॥ धुंडिराजदंडपाणी ॥ उभाग
रुडकरजोडोनी ॥ ७॥ गयातेंचिगोपाळपुर ॥ प्रयाग
निरानरसिंगपुर ॥ ८ ॥ तेथेअसतिगयावळ ॥ येथेगाई
आणिगोपाळ ॥ ९॥ शमीपत्रींपिंडदेती ॥ येथेकालानि
जसुखप्राप्ति ॥ १० ॥ संतसज्जनींकेलाकाला ॥ तुकाप्र
सादलाधला ॥ ११ ॥ ॥ ४२९९ ॥
फळ्याचेबडबडेचवीनासंवाद ॥ आपलाचिवादआप
णासी ॥ १ ॥ कोणेंयामरावेंशब्दाचेचघाणी ॥ अंतरींशा
हाणीराहीजेहो ॥ २ ॥ गाढवाचीभूकऐकतांतेकानीं ॥
कायकोडवाणीऐसीयेचें ॥ ३ ॥ तुकाम्हणेयासिकरावें
वचन ॥ त्याचेयेतीगुणआंगासीते ॥ ४ ॥ ४३०० ॥

दिवसाव्यापारचावटी ॥ रात्रिकुटुंबचिंतामोठी ॥ १ ॥ कायकरूंयामनासी ॥ नाठवेहृषीकेशी ॥ २ ॥ वेश्ये पाशींरात्रींजागे॥ हरीकीर्तनींनिद्रालागे ॥ ३ ॥ तुका म्हणेकायझालासी ॥ वृथासंसाराआलासी ॥ ४ ॥

॥४३०१॥

निंदकतोपरउपकारी ॥ कायवर्णूंत्याचीथोरी ॥ रजका हुनिभलापरी ॥ सर्वगुणेंआगळा ॥ १ ॥ नेघेमोलधुतो फुका ॥ पापवरीच्यावरीदेखा ॥ करीतसेसाधका ॥ शुद्धसरतेतीहींलोकीं ॥ २ ॥ मुखसंदणीसांगातें ॥ अवघे सांठविलेतेथें ॥ जिव्हासाबणीनिरुतें॥दोषकाटीजन्मा चे ॥ ३ ॥ तूंयाठावयमपुरीं ॥ वासकरणेंअघोरीं ॥ त्या सीदंडकरी ॥ तुकाम्हणेन्हाणीते ॥ ४ ॥ ॥४३०२॥

विद्याअल्पपरीगर्वशिरोमणी ॥मजहुनिकोणीतरीआहे॥ १ ॥ अंगींभरलाताठाकोणातेंमानीना ॥ साधूची छळणास्वयेंकरी ॥ २॥ साधूच्यादेहाचामानीजोविटाळ ॥ त्रैलोकींचांढाळतोचियेक॥३ ॥ संतांचीजोनिंदा करीतोयामुखें ॥ खतेलासकळपापेंतोचीयेक ॥ ४॥ तुकाम्हणेऐसेमावेचेमईद॥त्यांपासीगोविंदनाहीं [illegible] ॥ ५॥ ॥४३०३॥

प्रपंचाचीपीडासोसितोआघोरी ॥ जयाक्षणभरीनाम नये ॥ १ ॥ नाअआठवितीआत्मयारामाचें ॥ धीगजी णेत्यांचेंभवामूळ ॥ २ ॥ मूळतेंपापाचेंआचरणतयां चें ॥नाहींराघवाचेंस्मरणत्या॥३॥स्मरणभजननावडे

तयासी ॥ आंदणीयादासीयमदूतां ॥ ४ ॥ चिंतनरामा
चेंनकरीतोदोषी ॥ येकांततयासीबोलोंनये ॥ ५ ॥ नये
त्याचासंगधरूंम्हणेतुका॥धरितापातकावाटेकरी॥६॥
॥४३०४॥
अर्थावीणपाठांतरकासयाकरावे ॥ व्यर्थचिमरावेंघो
कूनीयां ॥ १ ॥ घोकुनियांकायवेगीअर्थपाहे ॥ अर्थ
रूपराहेहोउनीयां ॥ २ ॥ तुकाम्हणेज्यालाअर्थीआहेभे
टी ॥ नाहींतरीगोष्टीबोलोंनका ॥ ३ ॥ ॥४३०५॥
अंगींभरलाताठा ॥ वळणिनयेजैसाखुंटा ॥ १ ॥ की
तिसांगावेंत्याडेंगा ॥ हीतआदळेनाअंगा ॥ २ ॥ तुका
म्हणेआणु ॥ मूसळाचेनव्हेकणु ॥ ३ ॥ ॥४३०६॥
बैसतांचोरापाशींतैसीहोयबुद्धी ॥ देखतांचिचिंधीमन
धांवे ॥ १ ॥ व्यभीचारिपाशींबैसतांक्षणभरी॥देखतांची
नारीमनधांवे ॥ २ ॥ प्रपंचाचाछंदटाकोनीयांगोंवा ॥
धरावेकेशवाव्हदयांत॥३॥सांडोनीयांदेईसंसाराचीवे
ढी॥कीर्तनाचीगोडीधरावीगां ॥ ४ ॥ तुकाम्हणेतुजसां
गतोंमीयेक॥रुक्मिणीनायकमनींगावा॥५॥४३०७
मस्तकिंसाहावेंटाकियासीजाण ॥ तेव्हांदेवपणभोगा
वेंगा ॥ १ ॥ आपुलियेस्तुतिनिंदाआणीमान॥टाकावा
थुंकोनपैलीकडे ॥ २ ॥ सद्गुरुसेवनतेंचिअमृतपान ॥
करूनिप्राशनकरावेंगा॥३॥ आपुल्यामस्तकींपडोतडों
गर ॥ सुखाचेंमाहेरटाकूंनये ॥ ४ ॥तुकाम्हणेआतांसां
गोंतुलाकीती॥ जीण्याचिफजितीकरूंनये॥५॥४३०८

स्वामिसेवागोड॥मातेबाळकाचेंकोड॥१॥जेंजेंमागा
वें भातुकें ॥ तेंतेंपुरवीकवतुकें॥ २ ॥ खेळविलेकोडें॥
हारुषेंबोलेकींबोबडे॥ ३॥ तुकाम्हणेलाड॥येथेपुरेंमा
झेंकोड॥ ४॥ ॥४३०९॥

तुझेनामपंढरिनाथा॥ भावेवीणनयेहाता॥ १ ॥ दाहां
नयेविसांनये॥ पंन्नासांहींसाठींनये॥ २॥ शतांनयेस
हस्रांनये॥ लक्षादिकींकोटींनये॥ ३ ॥ तुकाम्हणेपंढरि
नाथा॥ भावेंवीणनयेहाता॥ ४॥ ॥४३१०॥

संतांपाईविन्मुखझाला॥ तोजरिसंगतिमागोंआला॥
॥ १ ॥ ॥ तरित्याहुनिदूरींजावें ॥ सुखेंयेकांतींबैसावें॥
॥२॥आत्मचर्चानाहींजेथे॥आगिलाउनिदाविनेथें॥३
तुकाम्हणेनाहीं॥ चित्तासमाधानकांहीं॥४॥४३११॥

हिराठेवितांकाळेगहन॥ मोलनतुटेदुकाळींजाण॥१॥
तैसेसंतजनापाही॥ विनटलेश्रीहरिपाईं॥२॥तुकाम्हणे
तैसेभक्त॥ तयांसिजनहेंनिंदीत॥ ३॥ ॥४३१२॥

परिसेगेसुनेबाई॥ नकोवेंचूंदुधदही॥ १ ॥ आवाचा
लिलीपंढरपुरा॥वेसीपासुनिआलीघरा॥२॥ऐकगोष्टी
सादरबाळे॥करिजतनफुटकेंपाळें॥ ३॥ माझेहातींचा
कलवडू॥मजवांचूननकोफोडूं॥४॥बाळकांसिराचेलिं
पण॥ नकोफोडूंमजवांचून॥५॥ उखळमुसळजातें॥
माझेंमनगुंतलेंतेथें॥६॥भक्षीपरिमीतआहारु॥ नंको
फारसीवरोसारु॥ ७॥ सुनम्हणेबहुतनिकें॥ तुम्हीया
त्रेसजावेंसुखें॥८॥ सासुबाईस्वहितजोडा॥ सर्वमा

गीलआससोडा॥ ९ ॥ सुनमुर्खींचेंवचनकानीं ॥ ऐ
कोनिसासूविवंचीमनीं ॥ १०॥ सवतीचेचाळेखोटे॥
त्यांजावेंसेंइलावाटे॥ ११ ॥ आतांकांयात्रेसीजाऊं॥
कायजाऊनितेथेंपाहूं॥ १२॥मुलेंलेंकरेंघरदार ॥ माझें
येथेचिपंढरपूर ॥ १३ ॥ तुकाम्हणेऐसेजन ॥ गोविलेहे
मायेंकरून ॥ १४ ॥ ॥४३१३॥

येकतेगाढवमनुष्याचेवेषें ॥ हालवितीपुसेपुढेंदाढी॥ १
निंदाहेभोजनजेवणतयांसी ॥ जोडीघररासीपातका
च्या ॥ २ ॥ तुकाम्हणेसुखेंबैसोनियांखाती ॥कुंभपाकीं
हातीनर्कवासी ॥ ३ ॥ ॥४३१४॥

मगत्याचिटाळाटाळी॥झिजावोढूनिकपाळीं॥ १ ॥ ऐ
सातवमोळा॥तुमचानसेगोपाळा॥ २॥नसेलनानवे॥
ऐसेंधरीयेलेंदेवें॥ ३ ॥ तुकाम्हणेआला॥ उसीरनाहीं
नोविठ्ठला ॥ ४ ॥ ॥४३१५॥

संसारकरितीमोठ्यामहत्वानें ॥ दिसेलकांऊणेंनकळे
त्या ॥ १ ॥ पवित्रपणआपलेघरच्यासीदिसे ॥ बाहेरउ
दासनिंदीताती ॥ २ ॥ आपणाकळेनाआपलाअवगु
ण ॥ पुढीलाचागुणवाखाणिती ॥ ३ ॥ विषयाचेधाकें
जगबांधीयेलें ॥ म्हणोनिलागलेजन्ममृत्यु ॥ ४ ॥ तुका
म्हणेमाझेकपाळींचेरासे ॥ देवाजीचेपीसेसहजगुण ॥
॥ ५ ॥ ॥४३१६॥

गव्हाराचेंज्ञानअवघारजोगुण ॥ सुखवासीहोऊनवि
षयभोगी ॥ १ ॥ त्यासीज्ञानेउपदेशजरीकेला ॥ संगेंवी

णत्यालाराहावेना॥ २॥ तुकाम्हणेसंगउत्तमअसावा॥ याहूनीऊपावाकायसांगूं॥ ३॥ ॥४३१७॥

भाग्यालागींलांचावले॥ देवधर्मतेराहीले॥ १॥ कथे जातांआळसेमन॥ प्रपंच्याचेंमोठेंज्ञान॥ २॥ अखंड प्रितीजाया॥ नेणेभोजनाच्याठाया॥ ३॥ कथाकीर्त नधनाचे॥ सर्वकाळविषयींनाचे॥ ४॥ तुकाम्हणेपंढ रीराया॥ ऐसेजन्मविलेवायां॥ ५॥ ॥४३१८॥

पतिव्रतातीचीकीर्तीवाखाणीता॥ सिंदळीचेमाथां तीडीकउठे॥ १॥ आमुचेंतेंआहेसहजबोलणें॥ नाहीं विचारणाकेलीकोणी॥ २॥ अगींउणेत्याच्यावैसेंटाळ क्यांत॥ ठिणग्याबहुतगाळीतसे॥ ३॥ तुकाम्हणेआ म्हीकायकरणेत्यासी॥ धक्काखवंदासीलागतसे॥ ॥ ४॥ ॥४३१९॥

आहेऐसादेववदवावीवाणी॥ नाहींऐसामनींअनुभव॥ १॥ आवडीआवडीकलीवरांकलीवरी॥ वरीलअंत रींटाळीपडे॥ २॥ अपूर्वदर्शनमातेपुत्राभेटी॥ रडूंमा गेतुटीहारुषयोगे॥ ३॥ तुकाम्हणेयेकेकळतेदुसरे॥ ब रीयानेंवरेआहाचेआहाच॥ ४॥ ॥४३२०॥

देउनियांप्रेममागित्तलेंचित्त॥ झालीफिटाफिटतुम्हा आम्हा॥ १॥ कासीयानेंतुजउदारम्हणावें॥ येकदेशी स्वभावेंदेशीयेक॥ २॥ देऊनियांथोडेंनेतोसीतूंफार॥ खुंटीसीविचारअवघीयांचा॥ ३॥ तुकाम्हणेआम्हा भांडवलचित्त॥ नेउनिदुश्चीत्तपाडीयेलें॥ ४॥४३२१

हेंचिमाझेंचित्तीं ॥ राहोभावप्रीती ॥ विठ्ठलसुषुमीं ॥
जागृतींस्वप्नीं ॥ १ ॥ आणिकनाहींदुजेंमागणें ॥ राज्य
चाडसंपत्तीधन ॥ जिव्हेसुखतेणे ॥ घेतांदेहींनामतुझें
॥ २ ॥ रूपसर्वांठायीं ॥ देखेऐसेंप्रेमदेई ॥ ठेवावापाईं ॥
अनुभवचित्ताचा ॥ ३ ॥ जन्ममरणाचाबाध ॥ समुळु
नितुटेकंद ॥ लागोहाचिछंद ॥ हरीगोविंदवाचेसी ॥
॥४॥ कायापालटेदरुशनें ॥ अवघेंकोंदाटेचैतन्य ॥ जी
वशीवखंडण ॥ होयतेरेंचिंतीतां ॥ ५ ॥ तुकाम्हणेयाचि
भावें ॥ आम्हीधालोंतुझ्यानावें ॥ सुखेंहोतोजीवें ॥ भ
लतेयातीभलतैसे ॥ ६ ॥ ॥ ४३२२ ॥
मौनकांधरिलेंविश्वाच्याजीवना ॥ उत्तरवचनादेईमा
झ्या ॥ १ ॥ तूंमाझेंसंचिततूंचिपूर्वपुण्य ॥ तूंमाझेप्राचीन
पांडुरंगा ॥ २ ॥ तूंमाझेंसत्कर्मतूंमाझेस्वधर्म ॥ तूंचीनि
त्यनेमनारायणा ॥ ३ ॥ कृपावचनाचीवाटपाहातसे ॥
करुणावोरसेबोलकांहीं ॥ ४ ॥ तुकाम्हणेप्रेमळाच्या
प्रियोत्तमा ॥ बोलसर्वोत्तमामजसवें ॥ ५ ॥ ४३२३ ॥
कायकरूंआतांधरुनियांभीड ॥ निःशंकहेंतोंडवाज
वीलें ॥ १ ॥ नव्हेकोणीजगींमुकियाचाजाण ॥ सार्थ
कलाजोननव्हेहीत ॥ २ ॥ आलेंतेंउत्तरबोलोंस्वामीस
वें ॥ धीटनीटजीवेंहोउनीयां ॥ ३ ॥ तुकाम्हणेमनासम
र्थासिगांठी ॥ घालावीहेमांढीथापटोनी ॥ ४ ॥ ४३२४ ॥
माझीयातोजीवेंघेतलासेसोस ॥ पाहेतुझीवासभेटा
वया ॥ १ ॥ मातेवीणबाळनमानीआणिका ॥ सर्वका

ळधोकास्तनपानीं ॥ २ ॥ वोसंगानिघाल्यावांचोनिन
राहे ॥ त्याचेआर्तमानपुरवीतसे ॥ ३ ॥ तुकाम्हणेमाते
भक्तांतूंकृपाळ ॥ गिळीयेलेज्वाळवनांतरीं ॥ ४ ॥

॥ ४३२५ ॥

ऐसामीपामरपारनाहींअंत ॥ परीकृपावंतभावीकां
चा ॥ १ ॥ दुर्जनांचांडाळांकरींनिर्दळण ॥ करींसंरक्ष
णअंकिताचें ॥ २ ॥ भक्तमाझेसखेजिवलगसांगाती॥
सर्वांगत्याप्रतीवाढवीन ॥ ३ ॥ पीतांबरछायाकरीन
त्यांवरी ॥ सदात्यांचेंघरींदारींउभा॥ ४॥ माझेभक्तमज
सदाजेरातले ॥ त्यांघरींघेतलेधरणेम्यां ॥ ५ ॥ कोठेंहें
वचनठेविलेंयेवेळे ॥ तुकाम्हणेडोळेझांकीयेले ॥६॥

॥ ४३२६ ॥

भ्रतारासीभार्याबोलेगुजगोष्टी ॥ मजऐसीकष्टीनाहीं
दुजी ॥ १ ॥ अखंडतुमचेधंद्यावरीमन ॥ माझेतोहेळ
णकरितिसर्व ॥ २ ॥ जोडितसातुम्हीखातियेरचोरे ॥
माझींतवपोरेंहळहळिती ॥ ३ ॥ तुम्हाव्यालीमाझेडाइ
होपेटली ॥ सदादुष्टबोलीसोसवेना ॥ ४ ॥ दुष्टतीनण
दुलीसदाद्वेषकरी ॥ नांदोंमीसंसारींकोण्यासुखें ॥ ५ ॥
भावादीरकांहींधडहीनबोले ॥ नांदोंकोणाखालेंकैसी
आतां ॥६॥ माझ्याअंगसंगेंतुम्हासिविश्रांती ॥ मगध
डगतीनाहींतुमचि ॥ ७ ॥ ठाकतठमकतजीवमुठीधरू
नी ॥ परितुम्हीअझुनीनधरालाज ॥ ८ ॥ वेगळेनिघ
तांसंसारकरीन ॥ नाहींतरीप्राणदेतेंआतां ॥ ९ ॥ तुका

म्हणेझालाकामाचाअंकित॥ सांगेमनोगततैसावर्ते॥
॥१०॥ ॥४३२७॥
कामाचाअंकितकातितेंप्रार्थीत ॥ तूंकांवोदुश्चितनीरं
तर॥ १ ॥माझेमायबापबंधुहोबहीण॥तुजकरितिशी
णत्यागीनमी॥२॥त्यांचेंजरीतोंडपाहेनमागुता॥तरीम
जहत्याघडोतुझी ॥ ३ ॥ सकाळींउठोनवेगळानिघेन॥
वाहातोंतुझीआणनिश्चयेसी ॥ ४॥वेगळानिघतांघडि
नदोरेचूडा॥तूंतवमाझाजोडाजन्माचाकीं॥५॥तायीत
सांखळीगळ्याचीदुल्लडी॥बाजुबंदजोडीहातसर ॥६॥
वेणीचेहिनगसर्वहीकरीन ॥ नकोधरूंशीणमनींकां
हीं॥ ७॥ नेसावयासाडीसेलारीचुनडी ॥ अंगाचीकां
चोळीजाळियाफुलें ॥ ८॥ तुकाम्हणेकेलारांडेनेंगाढ
व ॥ मनासर्वधांवघालीतसे ॥ ९ ॥ ॥४३२८॥
उजळीताउजळदीपकाचीवाती ॥ स्वयंभतेज्योतीहीर
याअंगीं॥१॥येकींमहाकष्टेंमेळविलेंधन॥येकासीजत
नदैवयोगें ॥ २ ॥ परिमळेंकेलेंचंदनाचेंचिह्न ॥ निवडी
तेभिन्नगाढवतो॥३॥ तुकाम्हणेजयाअंगींनामठसा॥
तोतरेसहसाबंधहोय॥४॥ ॥४३२९॥
बारावर्षेंबाळपण ॥ तेंहीवेंचीलेंअज्ञान॥ १॥ तैसाज
न्मगेलावायां॥नभजतांपंढरीराया॥ २॥बाकीराहिली
अठ्याऐंसी ॥ तीसवेंचलेकामासी ॥ ३ ॥ बाकीउर
लीअठ्ठावीस ॥ देहगेहविसरलास ॥ ४॥ तुकाम्हणेऐ
साझाडा॥ संसारहाआहेथोडा॥५॥ ॥४३३०॥

सोबळातोझाला ॥ अंगिकारदेवेंकेला ॥ १ ॥ येरकरी
